# माणूस

विशेषांक

ऑगस्ट १९७०, ८० पैसे



८ ऑगस्ट १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : दहावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार...

श्री. ग. माजगावकर, संपादक 'माणूस' यांस

ताज्या 'साधने'त श्री. यदुनाथ थत्ते यांचा माझ्यावर आग पाखडणारा लेख वाचला. 'माणूस'मधील माझ्या 'अंगार फरिश्ता'वरील टीकेची त्यात मला प्रतिक्रिया दिसते. पारगांवकर आणि हिदायतखान एकच असे श्री. थत्ते म्हणतात. पण मला तर वाटते 'अंगार फरिश्ता' आणि थत्तेच एक असावेत.

परंतु हा लेख साधनेत का यावा? आग 'माणूस'मध्ये आणि बंब साधनेत का? अर्थात खरी आग साधनेतच आहे हे थत्ते यांच्या लिखाणावरून दिसते! सर्व शिष्टाचाराचा आणि टीकेतील संकेताचा भंग करून लिहिलेला हा लेख वैचारिक भूमिकेवरून तर काही कार्यसिद्धी करू शकेल असे मला वाटत नाही. साधनेच्या लोकांची हीच का साधनशुचिता?

२८ जुलै, ७० वि. शं. पारगावकर

''बंब' साधनेत का?' याचा एक खुलासा साधनेतील लेखाच्या शिरोभागी असलेल्या टीपेत आहे. या टीपेत म्हटले आहे, 'पारगावकराच्या लेखाला श्री. यदुनाथ थत्ते यानी एक उत्तर लिहून ते 'माणूस'च्या सपादकाकडे पाठविले व ते काटछाट न करता प्रसिद्ध व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. परतु या अंकात जागा कमी

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

असल्यामुळे हा लेख पूर्णपणे छापणे शक्य नाही असे त्यानी कळवले. वास्तविक वृत्तपत्रीय सकेत लक्षात घेता ज्या नियतकालिकात एखाद्या लेखासबंधी उलटसुलट प्रतिक्रिया सुरू होतात, त्याच नियतकालिकात त्याचा समारोप होणे आवश्यक होते. परंतु हा सकेत झुगारून ' माणूस 'कारानी श्री. थत्ते याचा पूर्ण लेख छापण्याचे नाकारल्यामुळे तो ' साधने 'त छापत आहोत !'

हा खुलासा गैरसमज निर्माण करणारा आहे.

नियतकालिकाकडे उलटसुलट अनेक प्रतिक्रिया येतात. त्यातल्या कोणत्या छापायच्या, कोणत्या वगळायच्या याबाबत निवड करावीच लागते. थत्ते याची प्रतिक्रिया पूर्ण जरी वगळायची ठरवली असती तरी त्यात वृत्तपत्रीय सकेताचा भंग वगैरे काहीही झाला नसता. सगळे दृष्टिकोन व्यक्त व्हावेत असे या निवडीबाबत ' माणूस 'चे एक सर्वसाधारण सूत्र म्हणून सागता येईल.

' अगार फरिश्ता ' या नावाने जर प्रतिक्रिया आली असती तर यापेक्षा थोडा वेगळा विचार करावा लागला असता. मूळ लेखकाला, आपल्यावरील आक्षेपांना उत्तर देण्यासाठी थोडा अधिक वाव दिला जावा, हा सकेत ' माणूस 'ला अर्थातच मान्य आहे.

आता ' काटछाट ' प्रकरणी खुलासा. थत्ते याचा लेख मला मिळाल्यावर नेहमीचे मैत्रीचे संबध लक्षात घेता, मी त्यांना आपणहून फोन केला. फोनवर झालेल्या समाषणाचा गोषवारा असा –

' लेख आताच मिळाला. थोडा लहान करून पाठवा. ' मी.

' पुढच्या अकात छापा ' थत्ते.

' हा विषय याच अकात सपवायचा आहे. ' मी.

' मी गावाला निघण्याच्या गडबडीत आहे. तुम्हीच तो लहान करून छापा म्हणजे झाले. ' थत्ते.

' हरकत नाही. कमी महत्त्वाचा पहिला भाग गाळतो. पुढचा ठेवतो. ' मी.

' छे : छे : पहिलाच महत्त्वाचा आहे. पुढच्यातील काही कमी केले तरी चालेल ' थत्ते.

' अहो ! हिदायतखान यांनी अमुक एका सभेत भाषण केले की नाही, पारगावकर– हिदायतखान वेगवेगळे की एकच, याचा मूळ लेखातील चर्चेशी संबध काय ?' मी.

' मला तो आहे असे वाटते ' थत्ते.

' मतभेदाचा प्रश्न आला. लेख मीच लहान करून घ्यावा अशी अपेक्षा असेल तर तो मी माझ्या मताप्रमाणे करीन. नाही तर तुम्ही तो तुम्हाला हवा तसा लहान करून पाठवा. ' मी.

' मग तुम्ही तो परत पाठवून द्या. ' थत्ते.

' ठीक आहे. पाठवतो. ' मी.

मी लेख परत पाठविला. ' साधने 'त तो नंतर छापून आला.

चर्चा तूर्त वाढवायची नसल्याने माझा खुलासा मी ' वृत्तपत्रीय संकेताचा भग ' या एकाच मुद्द्यापुरता मर्यादित ठेवला आहे.

श्री. ग. माजगावकर

# मुंबई दिनांक २९ जुलै

परवा सांताक्रूझ विमानतळावर मजा आली. अशी मजा क्वचितच येते. लोकसभेत, विधानसभांमध्ये वगैरे ठिकाणी येते. पण विमानतळावर क्वचितच. एका बाजूला जनसंघ, स्वतंत्र पार्टीचे लोक आणि दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट, सहप्रवासी आणि सत्ताधारी कॉंग्रेस वगैरे. ही हाणामारी ! चक्क दगडफेक, घोषणा, काळे झेंडे वगैरे. शेवटी पोलिसांची मध्यस्थीही आलीच. म्हणजे सध्या आपल्या देशात राजकीय पातळीवर जे चालू आहे तेच सांताक्रूझ विमानतळावर सामान्य पातळीवर झालं. कदाचित असे प्रसंग आता वारंवार येतील, मोठ्या प्रमाणावर येतील. कुणी सांगावं. पण तेव्हा परवासारखी मजा वाटणार नाही.

परवाच्या मारामारीचं कारण काय म्हणाल तर अगदीच क्षुल्लक. क्षुल्लक म्हणजे पाच फूट, एक-दोन इंच उंचीची एक किरकोळ व्यक्ती. किरकोळ पण ताठ. अंगावर बंदुकीतून सुटलेल्या गोळ्या झेललेली, वर्षानुवर्षं रानावनात, हालअपेष्टात दिवस काढल्याच्या खुणा चेहऱ्यावर असलेली, करारी पण स्त्री-सुलभ मृदुत्वाची खूण पटविणारी आणि एकदम हसरी – मादाम न्गुयेन थी बिन्ह.

मादाम बिन्हच्या स्वागतासाठी बरीच मंडळी जमली होती. पण बिन्हविरोधी निदर्शनं करणारी सुमारे शंभर एक मंडळी विमानतळावर आली होती. बिन्हबाई यायच्या अगोदर दोन्ही बाजूच्या घोषणा सुरु झाल्या. जवळच एक दगडाचा ढीग होता. म्हणून दगडांची देवाण-घेवाणही झाली. पोलिसांनी रीतसर छडीमारही केला. दोन्ही गटांना बाजूला करण्यात आलं. ठरलेल्या वेळी मादाम बिन्हचं विमान अलगद उतरलं. पुढारी मंडळींनी स्वागताचे हार बिन्हबाईंच्या गळ्यात टाकले. स्वागतासाठी जमलेल्या लोकांनी विमानतळावरच भाषणांचा वगैरे प्रोग्राम ठेवला होता. पण ही मंडळी जिथे उभी होती तिथून बिन्हबाईंची गाडीदेखील गेली नाही. उगाच कटकट नको म्हणून पोलिसांनी हा स्वागताचा कार्यक्रम परस्पर रद्द केला. मंडळी हाती हारतुरे घेऊन आणि खिशात भाषणाची भेंडोळी ठेवून तशीच परतली.

काळे झेंडे दाखवणाऱ्या निदर्शकांना मात्र बिन्हबाईंची गाडी जाताना दिसली. त्यांनी जोरदार घोषणा दिल्या.

जगातील सर्वशक्तिमान अशा महाबलाढ्य अमेरिकेला पाच-सात वर्षे सातत्याने यशस्वीपणे तोंड देणाऱ्या दक्षिण व्हिएतनामच्या क्रांतिकारक सरकारच्या मादाम बिन्ह या मंत्री आहेत. या क्रांतिकारक सरकारजवळ सायगावसारखी मोठी राजधानी नाही, सायगावच्या सरकारसारख्या मोठमोठ्या इमारती नाहीत किंवा लांबसडक मोटारीही नाहीत. पण तरीही दक्षिण व्हिएतनामचा ८० टक्के भूभाग या क्रांतिकारक सरकारच्या अधिपत्याखाली आहे. हे सरकार गेली दहा वर्षे सतत अमेरिकनांशी लढत आहे. अमेरिकेने स्थापन केलेल्या सायगाव सरकारशी लढतं आहे. सततच्या बाँब वर्षावाला जिद्दीनं तोंड देऊन उभं आहे.

अशा या क्रांतिकारक सरकारच्या मादाम बिन्ह या मंत्री आहेत. सारं जग मादाम बिन्ह म्हणून त्यांना ओळखतं. त्यांचा निषेध झाला. कशाला निषेध झाला? त्या कम्युनिस्ट म्हणून, माओवादी म्हणून, अमेरिका-वादी सायगाव सरकार उलथून पाडण्यासाठी निर्माण झालेल्या क्रांतिकारक सरकारच्या प्रतिनिधी म्हणून.

आपण स्पष्ट सांगतो. आपण त्या बाईला पाह्यलं. तिची ती जाडे भरडे कपडे घातलेली ठेंगणीशी किरकोळ मूर्ती काही फारशी इंप्रेसिव्ह नाही. तिची भाषा समजत नाही. पण बोलण्यातला आवेश समजतो. तिच्या निष्ठेची प्रखरता जाणवते. गेली बारा-पंधरा वर्षे सोसलेल्या जाचामुळे तिच्यात एक प्रकारचा कठोरपणा आलेला आहे. तोही लक्षात येतो. मुख्य म्हणजे तिची प्रामाणिकता, तळमळ आणि जिद्द चटकन हृदयाला हात घालते. आपण स्पष्ट सांगतो. आपण इंप्रेस होतो.

कोण कम्युनिस्ट आणि कोण भांडवलवादी याच्याशी आपणास कर्तव्य नाही. आपण



कम्युनिस्टही नाही आणि भांडवलवादीही नाही. मनात आणलं तर कम्युनिस्ट सहज होऊ शकतो. कारण तेवढा कफल्लकपणा आपल्यात आहे. मनात आणल्या आणल्या भांडवलवादी होता येते का ? होता आलं असतं तर काय मौज आली असती. असो, तर काय की आपण निव्वळ एक माणूस आहोत. आणि म्हणूनच आपणाला बाईचा निव्वळ एक माणूस म्हणून आदर वाटतो. ज्या व्हिएटनामी जनतेचं बाई प्रतिनिधित्व करतात त्या जनतेच्या अपूर्व शौर्याबद्दल, त्याच्या चिकाटीबद्दल, सहनशीलतेबद्दल आदर वाटतो. भययुक्त आदर वाटतो. दहा वर्षं अमेरिकनाशी सतत लढत राहणं म्हणजे काय चेष्टा आहे महाराज ? आपण बावीस दिवस पाकिस्तानशी लढलो आणि त्याच्या आधी चिन्याशी, त्यामुळे माहिती आहे. शिवाय सायगाव सरकारजवळ रणगाडे आहेत, विमान आहेत, हेलीकॉप्टर्स आहेत, गॅसेस आहेत. या क्रांतिकारक सरकारजवळ काय आहे ? लोक, पळवलेली अमेरिकन शस्त्रं आणि उत्तर व्हिएतनाममधून मदत म्हणून आलेली रशियन आणि चिनी शस्त्रं.

आता लोक म्हणतात रशियन आणि चिनी शस्त्रांच्या जोरावर व्हिएटनामी लढताहेत. असेल बुवा. पण किती रशियन आणि चिनी शस्त्रं उत्तर व्हिएटनाम-मधून दक्षिणेत अमेरिकनांच्या बाँब-वर्षावातून वाचून पोचतात हे स्पष्ट सांगण कठीण आहे. आता शस्त्राविषयीच म्हणाल तर रशिया काय अरबाना कमी शस्त्र पुरवितो ? असो, तो नाजूक विषय आहे. तर काय की शस्त्रांपेक्षा लढणाऱ्या लोकाचे नीतिधैर्य आणि चिकाटी ही महत्त्वाची असते.

हे क्रांतिकारक सरकार माओवादी आहे ? हो ची मिन्ह कधीच माओवादी नव्हता. १९४५ साली व्हिएटनामच्या क्रांतिकारक सैन्यात दियेन बिऐन फू इथं


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

अद्ययावत फ्रेंच सैन्याचं कंबरडं मोडलं तेव्हा माओ कुठे होता हो? बहुतकरून येतानच्या गुहेमध्ये! त्यानतर चार वर्षांनी माओ सत्तेवर आला. तेव्हा पंडित नेहरूंना माओवादी म्हणणं जेवढं अपमानास्पद तेवढंच हो ची मिन्हला म्हणणंही.

समजा यदाकदाचित दक्षिण व्हिएटनाम आणि उत्तर व्हिएटनाम एक झाले तर काय होईल? व्हिएटनाम हे आग्नेय आशियातलं एक सर्वात प्रबळ राष्ट्र बनेल. आपल्या शौर्यानं व्हिएटनामी जनतेन हे सिद्ध केलं आहे.

असो, तर हे विषयांतर झालं. थोडं कम्युनिस्टी प्रचारासारखं झालं. हो! कारण आजकाल तुमच्याजवळ लेनिनच चरित्र जरी सापडलं तरी तुम्हाला नक्षलवादी म्हणून शिक्का बसण्याचा संभव आहे. परवा मुंबईत तसंच झालं. आता फोर्टातल्या फूटपाथवर आणि बुकस्टॉल्समध्ये माओच्या विचारांची पुस्तकं पोतं भरभरून विकत मिळतील ही गोष्ट वेगळी. ही पुस्तक अर्थात अमेरिकन लेखकांचीच. अमेरिकन लायब्ररीमध्ये तर माओ विषयीची आणि माओच्या प्रेमानं लिहिलेली एवढी पुस्तकं आहेत की खरं म्हणजे त्या लायब्ररीवर बंदीच घातली पाहिजे. भारतात कोणी माओवादी उपजलेच तर ते अमेरिकन लायब्ररीवरच पोसले जातील याची आपल्याला खात्री आहे. नाही तरी सध्या मुबईतल्या श्रीमंत कॉलेज तरुणांमध्ये गांजा, चरस, अफू, भांग याप्रमाणे माओच्या विचाराची पारायण करणं ही एक फॅशनच झाली आहे.

तर पुन्हा हे विषयांतर. तर मुख्य मुद्दा हा की त्या बाईंविषयी आदर वाटला. अर्थात बाईंचा निषेध करणाऱ्यांचं आणि स्वागत करणाऱ्या भोंदू लोकांचंही हसू आलं. निषेध करणाऱ्यांचं एक आर्ग्युमेंट मात्र अगदी बिनतोड. समजा नक्षलवादी क्रांतिकारकाचा असा एखादा मत्री दुसऱ्या देशात गेला आणि तिथे त्याचा सत्कार झाला तर? बाप हो! नक्षलवाद्यांच्या हाती व्हिएटकाँगप्रमाणे ८० टक्के भारताचा भूभाग गेला तर आम्ही इथे लिहायला न् तुम्ही वाचायला कोण बसणार? बॉम्ब्स् उडवून देशात गोंधळ माजविणाऱ्या नक्षलवाद्यांची आणि दहा वर्षे पद्धतशीरपणे अमेरिकेशी लढणाऱ्या व्हिएटकाँगच्या लोकसेनेशी तुलना करणं आपल्याला अन्यायाचं आणि अप्रामाणिकपणाचं वाटतं. कदाचित आपण चुकत असू.

असो, तर विमानतळावर ज्याप्रमाणे स्वागतासाठी रशियन पैशांवर पोसलेले लोक होते त्याचप्रमाणे निषेधासाठी सी. आय. ए. च्या पाठिंब्यावर आलेली मंडळीही होती म्हणे. कुणास ठाऊक. आरोप-प्रत्यारोपात आपण भाग घ्यायचा नाही. आपण आपलं दुरून बाईंना बघायचं, काय असेल ते मनातल्या मनात मत बनवायचं आणि थर्ड-क्लासमधून घरी परतायचं. काळा झेंडा दाखवायला किंवा हार घालायला पैसे कुठून आणायचे. किंवा काळा झेडा दाखवण्याइतपत चीडही वाटत नाही न् हार घालावासा वाटण्याएवढं प्रेमही उतू जात नाही.

— अरुण गोसावी

## मुक्ताफळे

ग्यानबा

## समाजवादी चिखलांतील कमळे

'उद्या जमीनवाल्यांच्या छातीवर पिस्तुल रोखलं जाणार आहे ! मी तुम्हाला जागे करायला आलो आहे. ईश्वराची दोन रूपे असतात. शिवरूप आणि रुद्ररूप. आज ईश्वर शिवरूपात आला आहे. जर तुम्ही त्याला ओळखले नाही, तर मग तो रुद्ररूपात अवतरेल. ईश्वराचे ते भयंकर रूप तुम्ही सहन करू शकणार नाही.'

भूदान मागत फिरताना, विनोबा असे सांगत होते. याला खूप खूप वर्ष झाली. एकटया राजेंद्रबाबूंनी शेतीविषयक २४० कायद्यांवर सह्या केल्या.. यानंतर तीन राष्ट्रपती झाले. सगळे सह्या करतातच आहेत, परंतु काही लोकांना हे दिसत नाही. त्यांना घाई झाली आहे. १ जुलै ७० ला मॉस्को माळकरी लालभाईंनी जमिनी ताब्यात घेण्याचा चळवळीला सुरुवात केली. आता ९ ऑगस्टपासून संयुक्त समाजवादी, डावे कम्युनिस्ट व उरले सुरले प्रजासमाजवादी, हेदेखील अशीच चळवळ करणार आहेत.

तिकडे हिंदी भाषिक प्रदेशात नक्षलवादी भूमिहीनांना हाताशी धरून हिंसाचार करीत आहेत. उत्तर बंगाल, आसाम, बिहार, उत्तरप्रदेश या प्रांतात जमीनदारांचे खून पडत आहेत. बिहारातील मुजफरपूर व दरभंगा जिल्हे, उत्तरप्रदेशातील लखिमपूर भाग, असामातील महाराणी, जिपुरा, गोलपारा, काचर ही ठिकाणे आणि सिलिगुरी, जलपैगुरी ही पश्चिम बंगालातील क्षेत्रे एवढ्या ठिकाणी सध्या हिंसाचार वाढत्या प्रमाणात चालू आहे. आपण शांततेसाठी अणू वापरतो परंतु कुठे शांतता मात्र आणूमात्रही नाही, याला कारण हे सर्व विरोधी पक्ष होत...इंदिरा गांधींचे शांततेसाठी अणू वापरण्याचे काम मुळीच थांबलेले नाही.

पण आम्ही म्हणतो तिकडे उत्तरेत जमिनीचा प्रश्न भयानक तरी आहे. सालाह नावाचे मुझफरपूरमधील एक खेडे घेऊ. या खेड्यात २४८ एकर शेतजमीन आहे आणि १२२ कुटुंबे आहेत. यातल्या एका कुटुंबाकडे यातली १०५ एकर शेतजमीन आहे आणि उरलेल्या १२१ कुटुंबाकडे मिळून १४३ एकर जमीन आहे. इतर सर्वत्र हीच परिस्थिती आहे. तरीसुद्धा आम्ही असेच म्हणू की १०५ एकरवाल्याचे हृदयपरीवर्तन करून त्याच्याकडून भूदान मिळेपर्यंत लोकांनी वाट पाहिली पाहिजे.

हिंसाचार करून गुड म्हणून मरण्यापेक्षा भुकेल्यापोटी अहिंसक राहून सज्जनांनी आत्मसमर्पण करावे.

ही तिकडली परिस्थिती सागितली, परंतु महाराष्ट्रातील जमिनी बळकावण्याची चळवळ जी दिशा घेत आहे ती अतिशय चिंताजनक आहे. पन्नालाल सुराणा हे संयुक्त समाजवादी पुढारी म्हणाले–

सत्याग्रह उरळी काचनला होणार आहे. तिथे यशवतराव चव्हाणांनी आपल्या पत्नीच्या नावे जमीन घेतली आहे आणि यवतला वसतराव नाईकानीही आपल्या पत्नीच्या नावे जमीन घेतली आहे तिकडे मागली येथे उपशिक्षणमंत्री देवताळे याची शेकडो एकर जमीन आहे...तिकडेही आम्ही जाणार आहोत.

अरे बापरे ! ही काय जमिन बळकावण्याची पद्धत झाली ? सयुक्त समाजवाद्यांचे एक कॉंग्रेसवाल्याशी हाडवैर आहे म्हणून ते असे बोलतात, पण महाराष्ट्र प्रजा-समाजवादी पक्षाचे चिटणीस नाना सावत हेदेखील सुराणाच्या पत्रकार बैठकीत हजर असून त्यानी याला विरोध केला नाही याला काय म्हणावे ? अरे, नानासाहेब गोरे राज्यसभेवर ज्याच्या औदार्याने गेले त्याची काही चाड ठेवायला हवी की नको ? म्हणजे कॉंग्रेसवाल्याची मते हवीत–मत्र्याचा पाठिंबा हवा आणि त्याच्या जमिनी मात्र डोळ्यात खुपतात काय ?

तुम्हाला जमीनच वळकावयाची असली तर बिर्लांची घ्या. देशात एकाद्या बिर्लांची ५० हजार एकर जमीन आहे यातली फक्त केरळात २० हजार एकर आहे ही सर्व मडळी तिकडे का जात नाहीत ? म्हणजे बाबू जगजीवनराम, अण्णासाहेब शिंदे, यशवतराव मोहिते ही सर्व मडळी तुम्हाला नैतिक पाठिंबादेखील देतील काही झाले तरी सगळे समाजवादीच आहेत.

पण महाराष्ट्रात सगळेच मत्री अस्वस्थ झालेले आहेत. ज्यानी यशवंतराव–वसतरावाच्या जमिनीला हात घातला ते काय आपल्याला सोडतील, या भितीने यशवतराव मोहिते व अण्णासाहेब शिंदे यानी लगेच खबरदारी घेतली आहे. कुणीही हेच करील.

आम्हाला यशवतराव मोहिते याचे उद्‌गार फार आवडले. ते म्हणतात–

" पिढ्यान् पिढ्या शेतकरी असलेल्या कुटुबात माझा जन्म झाला. माझ्या कुटुबात पाच माणसे असून शेतीव्यतिरिक्त माझा कोणताही धदा नाही. माझ्याकडे फक्त ६४ एकर जमीन आहे. माझ्या मार्गात जमीनधारणेची कमाल मर्यादा ८० एकर आहे. एवढी जमीन मी घेऊ शकतो परतु मी ते करीत नाही. माझी अप्रतिष्ठा करण्याचा कम्युनिस्टांचा डाव आहे. "

माझा इतर कोणताही धदा नाही हे स्पष्टपणे सागून मत्रिपद ही सेवा आहे ही गोष्ट यशवतराव मोहिते यानी स्पष्ट केली आहे. मूळ कोकणातील परंतु मुंबईत नोकऱ्या करणारांची जमीन सरकारने कूळकायद्याखाली ताब्यात घेतली कारण

ही मडळी मुबईत सेवा करीत नसून नोकरी करीत होती. यशवंतराव मोहिते हे मुबईत सेवा करतात आणि गावाकडे शेती ! ८० एकर जमीन ही जर कमाल जमीन धारणेची महाराष्ट्रातील सरकारी मर्यादा असेल, तर तिकडे बिहारात एका कुटुबाकडे १०५ एकर जमीन असल्यामुळे लोकानी जमीन मालकाचा खून पाडला तरी असला हिंसाचार महाराष्ट्रात करण्याची मुळीच गरज नाही. कमाल मर्यादा सर्वांनी पाळली पाहिजे. आता तुम्ही म्हणाल सर्वांनी कमाल मर्यादेपर्यंत जमीन बाळगायची ठरवली तर ? एकदर जमीन थोडी आहे परंतु मत्रीही थोडेच आहेत ही गोष्ट सर्वांनी ध्यानी घ्यावी.

आता केंद्रमंत्री अण्णासाहेब शिंदे याना यशवतराव मोहित्याचे उद्गार वाचून सहाजिकच धक्का बसला. कारण ज्याची जमीन कमाल मर्यादेपर्यंत आहे त्याच्याकडे आधी जा असे मोहिते सागतात असे त्याना वाटले. त्यानी लगेच श्रीरामपूरला जाहीर केले.–

"खबरदार कुणी माझ्या जमिनीत घुसेल तर ! माझी जमीन कमाल धारणा मर्यादेत आहे आणि गेली २० वर्षे मी ती स्वत. कशीत आहे !"

शिवाय दिल्लीत जनसेवा आहेच !


बाबू जगजीवनराम–कॉंग्रेस अध्यक्षपद आणि शिवाय केद्रिय जनसेवा–याचा तर लोकाना आदेशच आहे–"भूमिहीनानी सरकारी जमिनी ताब्यात घेऊन त्या कसाव्या !"

याचा अर्थ लोकानी असा केला की मत्र्यांच्या जमिनी लोकानी ताब्यात घ्याव्या ! हे चूक आहे मत्र्याची प्रतिष्ठा, त्याचा समाजवादी जीवनक्रम, हे सर्व लक्षात घेऊन जनतेने वागले पाहिजे. समाजवादी चिखलातील ही कमळे होत. त्याना नाही हो कुणी हात लावायचा !

जमिनीची कमाल मर्यादा महाराष्ट्र सरकारने निश्चित केली आहे. फक्त ८० एकर ! दारिद्र्याची आणि भुकेची कमाल मर्यादा ठरलेली नाही. अशा रीतीने दरिद्री भुकेकगाल भूमिहीनानी चळवळी कराव्या की काय ? कुठे ती कमळे आणि कुठे ही रानफुले !

ऐसी फुले फुलती । फुलोनिया सुकोनी जाती ।
कोणी त्याची मिती गणती । ठेविली आहे ?

□ □ □



**विजय तेंडुलकर**

# हिरा कोल्हापूरकरीण

हिरा कोल्हापूरकरीण ! कोणीतरी आपला विश्वासू रसिक शिफारस करतो – नो नो, यू मस्ट सी हर !

तसे तमाशे ऊर्फ लोकनाटचे आपल्या नजरे-खालून गेलेली असतात – त्यातल्या 'करणीं' सकट. या मंडळीत मुद्दाम जाऊन पहाण्यासारखे काही असते असे आपल्या पांढरपेशा नजरेला खरोखर दिसलेले नसते. सिनेमातल्या कोल्हाटणी थोड्याफार अपवाद.

पण पुन्हा दुसरे कुणी आवर्जून म्हणते, लाजवाब ! जिंदगीमे ऐसा कुछ देखाही नही था. बस्स, ही एकच ! आय हाय हाय हाय हाय... वगैरे.

आणखी तिसरी एक उत्साहाने शीळ घालून सांगते, म्हणजे मी तर बाई आहे ना ? पण मलासुद्धा खूपच अपील झाली. नो, यू मस्ट गो अँड सी हर, यू मस्ट !

एवढे झाल्यावर मात्र आपली नजर चाळवते. इतकी अफलातून अशी ही कोल्हापूरकरीण आहे तरी कोण आणि कशी ? पाहिलीच पाहिजे.

आपण सगीत बाऱ्याचा प्रतिष्ठित नाटचगृहात लागलेला पुढचा कार्यक्रम लक्ष ठेवून हेरतो. यात ती नाचते. माहितगार मित्र सागतो, लौकर उगीच जाऊ नको. हिरा दहा साडेदहानतर स्टेजवर येते आरामात जेवून खाऊन विडा चघळीत पोचायचे

हेच आता आपण उत्साहाने, जाऊ तिथे पोहचवू लागतो. हिरा कोल्हापूर-करीण ! ला जवाब ! यू मस्ट सी हर् ! बाई असूनसुद्धा त्या ह्यांना त्यांना अपील झाली. उगीच लौकर जाऊ नका, साडेदहानतर तिची बारी येते. आरामात जेवून-खाऊन पोचले तरी चालेल... हो तर ! मी जाणार आहे ना. शुअर शुअर ! ...

त्या दिवशी ऑफिसातून सुटल्यावर दुसरे मध्ये काहीच फारसे करण्यासारखे नसल्याने – आणि तिकीट काढायचेही असतेच – आपण रात्री साडेआठला थिएटरवर पोचतो. कार्यक्रमाला चागलीच गर्दी असते. प्रतिष्ठित नाटचगृहात कधीही न दिसणारे कितीतरी आणि अप्रतिष्ठित कार्यक्रमाकडे सहसा न फिरकणारे कोणी कोणी उत्साहाने अगदी सहकुटुंबदेखील आलेले दिसतात – (आपण मनाशी म्हणतो) हिरा कोल्हापूरकरणीसाठी.

तिकीट काढून होते. जरा मागलेच मिळते. आत्ताच कुठे आत पहिली बारी सुरू झाल्याचे तिकिटविक्रीवाला सागतो. म्हणजे कोल्हापूरकरणीने रंगमचावर पदार्पण करण्याला अजून दीड तास तरी असतो. मग आपण तिथेच जरा रेंगाळत नाटकाचे फलक न्याहाळतो. यातली अनेक नाटके – अगदी लोकप्रियदेखील – पहायची बाकी असताना आपण या तमाशाच्या सगीत बाऱ्याना कटाक्षाने पोचावे, या सास्कृतिक योगाचे आपणच कौतुक करतो. फलक न्याहाळीत आपण स्वत.ला समजावतो की कोणी कोणी रंगमचावर धडाडत जाणारी आगगाडी पहाण्यासाठी गर्दी करतात त्या मानाने हिरा कोल्हापूरकरीण इज नॉट अ बॅड चॉइस अॅट ऑल ! काय म्हणाला होता तो हा ? (उसासा सोडून) ब्रेथटेकिंग, आय टेल यू ! च्यायला बास ! ती एक आणि बाकी सगळी बाईची जात दुसरीकडे...

आपण पलीकडच्या पानाच्या ठेल्याशी एक मसाला पान घेतो. मग आजच्या प्रसगाचे स्मरण होऊन् आणखी दोन पाने बाधून घेतो. तरी बराच वेळ असतो म्हणून वरच्या कँटीनमध्ये जाऊन चहा पितो. तरी दहाला पुष्कळच वेळ असतो आणि कँटीनमध्ये प्रेक्षागृहाकडून येणाऱ्या आवाजावरून ताडायचे तर अजून पहिलीच बारी चालू असते.

रेंगाळून वेळ सपत नाही. कुठे जायचे तर तब्बेतीने गप्पा कराव्या इतका वेळही मध्ये नाही. आपण नाइलाजानेच प्रेक्षागृहात शिरतो, झाले.

पहिली बारीच चालू असते. एक बरी बाई आणि तिच्याबरोबर एक बरी नसलेली बाई एका ढाल्या गाण्याच्या लयीवर ढोलकीच्या साथीत नाचत असतात. बरी बाई उगीच जयश्री गडकरची आठवण करून देते आणि बरी नसलेली बाई बऱ्या नसलेल्या अनेक बायांची आठवण करून देते. फक्त संकोच कमी. कमी म्हणजे जवळ जवळ नाहीच. मागे आणखी बाया गाण्याचे ध्रुपद निर्विकार मुद्रांनी आळवीत विंगात वगैरे पहात उभ्या असतात. ध्रुपदापुरत्याच जणू त्या जिवंत होतात आणि बाकी 'पार्श्वभूमी' असतात. डावीकडे कीर्तन वाजवून आलेला वाटणारा गोरा ब्राह्मणी वळणाचा पायपेटीवाला, त्याच्या बाजूला लग्नातल्या सनईवाल्याची आठवण देण्याइतक्या गालांच्या पुऱ्या फुगवून क्लॅरिओनेट फुंकणारा त्याचा काळाकुट्ट साथीदार, उजवीकडे नाकावर जाड भिंगांचा चष्मा ठेवून उघड्या तोंडाने तबला वाजवणारा तबलजी (हा कुठल्या तरी वाण्याच्या दुकानाच्या गल्ल्यावर केव्हातरी पाहिल्यासारखा उगीच वाटतो) आणि दोन पायांच्या कमानी-




वर झुलत राक्षसी त्वेषाने ढोलकी घुमवणारा फाटक्या अंगाचा ढोलकीवाला. या उजव्या डाव्यात मुक्त फिरणारा सोंगाड्या आणि त्याचा साथीदार. गाणे संपवून डायलाग सुरू होतो नाचगाण्याचा 'पोग्राम' ठरवण्यासाठी सोंगाड्या आणि त्याचा साथीदार बॉम्बेमधी फिरताहेत. एकमेकाना एकसे एक थापा मारण्याचा त्याचा एक 'जोक' सुरु होतो एक बोटीच्या धुराड्यावाटे येणाऱ्या धुराला लोंब-कळून अमेरिकेत पोचलेला असतो तर दुसरा रॉकेटचा धूर पकडून चद्रावर जातो. शब्दापेक्षा अवसानालाच हशे मिळतात आपल्याला हसू येण्याआत इतर हसून मोकळेदेखील होतात. मग आपण 'बेटर लेट दॅन नेव्हर' असे ठरवून हसू लागतो. आणि काय आश्चर्य! आपणदेखील अगदी विनाकारण विनासायास हसू लागतो. आजूबाजूला समिश्र वास फिरत असतात काही देशी, काही विलायती आणि काही नुसतेच मोगऱ्याच्या नाहीतर सायलीच्या गजऱ्याचे. विनोद – काही खरे, काही खोटे, काही नवे, काही जुने, आणि काही साधेच अश्लील वगैरे भासणारे.

बाई दिसते बरी, नाचते ठीक पण आपण मुळी यासाठी आलेलोच नसतो. हिरा कोल्हापूरकरीण – बस्स! तोवर वेळ काढायचा ती आली की मग खरे.

पहिली बारी संपते. प्रेक्षकाबरोबर आपण बाहेर येतो जवळचे एक पान तोंडात भरतो. एकजण परिचयाचाच झुकत येऊन गाठतो. म्हणतो, नो गुड! कोल्हापूरला चला. आपण नेतो. काय? तो खरा तमाशा. साले काय करतात! तुम्ही चलाच. आपण नेतो. नाही, तुम्ही चला तर खरे–

लगेच निघायचे अशा थाटात तो आपली बाही देखील धरतो आणि एकदम आपल्या लक्षात येते की आपण अद्याप निघत नसलो आणि निघणार देखील नसलो तरी तो केव्हाच पोचला आहे! आपण त्याला हलकेच बगल मारतो.

प्रेक्षागृहात शिरतो तेव्हा दुसरी बारी चालू झालेली असते. आदल्या बारीतला तब्बलजी आता ढोलकीवाला होतो. आदल्या बारीतला सोंगाड्या याही बारीत सोंगाड्या म्हणून त्याच्या सहजतेने येऊन हाजिर होतो या बारीत कोणी नगर-करीण असल्याची कुजबुज आसपास होते ही नगरकरीण रंगमचावर पावणे सहा फूट तरी उंच वाटते. ती कसून नऊवारी नेसलेली; त्यामुळे आणखीच ताडमाड भासते. या उचीची दुसरी बाई नाचेल तर काय पण एरवी चालेल देखील पोक काढून, उंची लपवीत. पण ही नगरकरीण विनादिक्कत नाचते. आपल्या ताडमाड उंचीनिशी नृत्याचे सारे ठरीव विभ्रम करते सोंगाड्याबरोबर विनोद हाणते. कुठेही संकोच नाही. आता विनोद रिपीट होऊ लागतात. तोच, नाचगाण्याची पार्टी पोग्रामसाठी शोधायला निघालेला सोंगाड्या आणि त्याचा साथीदार त्याच एक-मेकाना मागे ओढून आपण पुढे धडपडत जाऊन केलेल्या नसत्या चौकशा आणि तेच त्यावरचे नाचणारणीचे तारस्वरातले जबाब. यात नाचणारी कानडी बोलते. लोक न कळताही हसतात. इथे येऊन पोटभर हसायचेच असते. खुलायचे असते. सहजगत्या

नाही झाले तर प्रयत्नपूर्वक. पैसे वसूल करण्याच्या हट्टाने.

वेगळी गाणी, पण तेच नाच. मध्येच डोळे मोडणे. ढोलकीच्या समेवर एक पाय दणकवून कमरेत, मानेत मोडणे आणि तडातड चाळ छुमछुमवीत रंगमचभर मोकळी फेरी घालणे. नाचणारी साथीदारीण, ढोलकीवाला सोंगाड्या, मागे उभ्या असलेल्या गाणारणी यात हा अगदी मनमोकळा वावरणारा उंच उफाड्याचा स्त्री-देह सुंदर न वाटूनही नजर ओढून धरतोच. शारीरिक व्यंगाचेही इथे भांडवल झाले आहे !

अर्थात आपण यात तसे गुंतलेले नसतोच. बहुधा यानंतर हिरा कोल्हापूरकरीण येईल. बारी संपताच बाहेर आल्यावर, आपण शिफारस केल्याने 'पोग्राम' बघायला मुद्दाम आलेले दोघे भेटतात. आपल्या सूचनेप्रमाणे ते उशीरा झुकत येऊन पोचलेले असतात. आता तीच ना ? एकजण विचारतो. आपण पानाचा तोबरा चघळीत अधिकारवाणीने त्याची चिंता मिटवतो, अजून दोन आहेत. लगेचचीच बहुधा—

आता जावे तर कळते, ही ही ती नव्हेच. या बारीत एक हाडकुळी नाचकाम करते आणि एक वयस्क आपल्या खर सुटलेल्या भयंकर जाड्या स्वरात बिनदिक्कत गाते. लोक ओरडतात. पुरे म्हणतात. म्हातारे, गाऊ नको म्हणतात. पण गाणारी गातेच. न कचरता, चांगली पुढे येऊन, स्वरासाठी पुढे वाकून, कानावर पंजा धर-धरून गाते. तबियतीने गाते. प्रेक्षागृहातून वैतागलेले शेरे उठत रहातात. क्वचित बीभत्स. पण रंगमंचावर जणू ते पोचतच नाहीत. नाचणारी कुरूप नाचते, गाणारी म्हातारी गाते. सोंगाड्याचे पुन्हा तेच ठरीव विनोदाचे दळण. या खेपेस प्रेक्षक उरलेला विनोद ओरडून पुरा करतात. सोंगाड्याही रस्त्यावरचा कोणी धरून आणल्यासारखा कळकट, मळकट. त्यात म्हातारा. पार कळा गेलेल्या तोंडाचा. एक की दोन सोडून बाकी सगळे दात पडलेला. तो विनोदासाठीही उजळत नाही. त्याचा साथीदार आणखीच सपक. सपेल सपेल म्हणता ही बारी साग्रसंगीत आपली चालू राहते आणि प्रेक्षकाचा दम उखडत राहतो.

तेवढ्यात सोंगाड्या एक शेर म्हणतो गळ्यावर म्हणतो. त्यासरशी सगळे थेटर हादरते. काय गोड, उंच आवाज ! स्वच्छ, ठाशीव शब्दोच्चार. साजेसे हावभाव. टाळ्या पडतात. मग दुसरा शेर. मग तिसरा. चौथा. सोंगाड्या आता थेटर अक्षरशः डोक्यावर घेतो. वैतागलेले प्रेक्षक हुरळून जातात. त्या मलीन, जीर्ण शरीरात तो विलक्षण सुरीला, गोड गळा ! वृद्ध, वातड मनात शृंगाराचा टवटवीत फुलोरा ! दात पडलेल्या बोळक्यावाटे स्वच्छ, रसीले शब्द आणि सुरकुतल्या मानेला मधूनच यौवनाच्या ऐन उभारीतला हलका झटका—हाय रामा !

सारे थेटर एकदम टवटवते. टाळ्यांचे गजरावर गजर चालतात. ठायी ठायी दाद मिळते. ती हाडकुळी नाचणारी, ती वयस्क गाणारी, साथीच्या त्या कुरूप, आणि तो सोंगाड्या नामक भयंकरच कळकट वातड म्हातारा देह—सारे जणू त्या

गोड कंठाच्या जादूने अल्प काळच पण कसे नवे नि सुदर होते आणि मग बघता-बघता पुन्हा ते जुने, नकोसे वाटू लागले. शेर चालतात पण टाळ्या ओसरतात. दाद ओसरते. म्हातारा जास्तच केविलवाणा वाटू लागतो. अशीच केव्हा तरी हीही बारी संपते. रात्रीचे पावणे अकरावाजून जात असतात. जवळची मसाला पाने संपलेली असतात.

जांभया देत बाहेर येताना हिशेब लागतो, आता बारी उरली एकच. म्हणजे यात आता हिरा कोल्हापूरकरीण नक्की. ग्रँड अॅट्रक्शन! मग कँटीनमधला आणखी एक कप चहा होतो. यानतर जागे राहिलेच पाहिजे. आताच तर खरे पहायचे! हुशार होऊन, नवी दोन पाने खरीदून प्रेक्षागृहात जाऊन तयारीने आसनस्थ व्हावे तर आसपास कोणीतरी म्हणते, कोल्हापूरकरीण नाही, रोशन सातारकरीण! आता ती! सातारकरीण! तमाशा कलेतली प्रतिलता!

आपण अस्वस्थ होतो. च्यायला म्हणजे मग हिरा कोल्हापूरकरीण केव्हा?

पृष्ठ १०० वर

# द्विसाप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

२२ ऑगस्ट १९७० या अंकापासून 'माणूस' द्विसाप्ताहिक होत आहे. बुधवार व शनिवार या दिवशी नियमितपणे अंक प्रसिद्ध होत राहतील. द्विसाप्ताहिकाचे सर्व अंक वर्गणीदारांना, त्यांची वर्गणीची दिलेली मुदत संपेपर्यंत पूर्वीप्रमाणेच पाठविले जातील. अंकांची संख्या दुपटीने वाढली तरी वर्गणीची दिलेली मुदत कमी होणार नाही, याची वर्गणीदारांनी कृपया नोंद घ्यावी.

२२ ऑगस्ट ७० पर्यंत वर्गणीदार होणाऱ्यांसाठी वार्षिक वर्गणी पूर्वी इतकीच, म्हणजे केवळ वीस रुपये राहील. यानंतर वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे—

| | |
|---|---|
| ५ वर्षे – रुपये १००/– | सहामाही – रुपये १६/– |
| ३ वर्षे – रुपये ७५/– | वार्षिक – रुपये ३०/– |
| २ वर्षे – रुपये ५५/– | परदेश – वा. व. रु. ६०/– |




भंडारदऱ्याचा परिसर.

सह्याद्रीने गिरबिटलेल्या डोंगरदेषा.

इर्दगिर्द उधळलेली पोपटीजर्द अक्षरे.

झुबकेदार फांदोफांदी गर्द हिरवे हिंदोळे.

तर पाऊसपाणी पिऊन भेलकांडणारी पाऊलवाट.

## भंडारदऱ्याचं युद्ध आपण दोन्ही आघाड्यांवर जिंकले आहे. पण शासन आजवर झोपून का राहिले ?

याच वाटेने पुढे पुढे,
वळशावळशाने वहाणारी प्रवरा.
नाकासमोर जाणारे सथ पाणी.
नदीत पुढे पाणी. मागे नदीत पाणी
वाटेत रंधा-धबधबा.
शुभ्रतर्र फेसाळत, बेहिशेबी कोसळत.
बेभान गाणी गाणारे पाणी.
इथूनच पुढे पाच-सहा मैलावर ही प्रवरा,
भंडारदऱ्याजवळ सह्याद्रीच्या कभिन्न पत्थर-ओजळीतून वहाणारी.
ही प्रवरा मोठी अवखळ, फार हट्टी.
पावसाळ्यात वहायची ती अशी दुथडी भरून की खेडीच्या खेडी गळाभर पाण्यात !
अन् उन्हाळ्यात अशी मुरकुडी मारायची की
घोटभरसुद्धा पाणी मिळायचं नाही ! !
अशी कामचुकार ! ! !
हिला वेठीलाच धरायला हव होतं कुठंतरी.
पूर्वीच्या काळी शिवाजीमहाराजाना सह्याद्रीनेच
आपल्या बलदंड बाहूंनी आवातनं दिलं होत
अगाखाद्यावर युद्ध खेळण्याचं.

हाच सह्याद्री माणसाना खुणावत होता, 'अरे, बघ ही इथे माझ्या पत्थर-ओजळीतून वहातीय; बेसावधपणे ! अडव तिला इथे अन् लाव तिचा थेंब न् थेंब तुला हव्या असलेल्या कामाला ! '

माणसाला खूण पटली.

त्यावेळेस गोरासाहेब राज्य करत होता.

भंडारदऱ्याच्या परिसरात धरण बाधायचं घाटल.

धरणाच्या बाधकामास अगदी आदर्श जागा होती ती. दोन्ही बाजूला कभिन्न दगडाचे बळकट पंजे अन् भक्कम सलग असा पत्थरी पाया. धरणाच्या मागे खूप खोल व कमी पसलेला डोगरदरा. त्यामुळे कमीतकमी पसाऱ्यांत जास्तीत जास्त पाणी अडवून धरले जात होते. शिवाय फारच थोडी खेडी धरणाच्या पाण्याखाली जात होती. धरणाची जागा मुक्रर केली गेली. १९०६ साली धरणाच्या बाधकामास सुरवात झाली. असख्य कामगार रोजावर लागले. दगडावर दगड रचला गेला. खडोगणती चुना घोटला गेला. दिसामासी वर्षाकाठी धरण उभं होत होतं.

...१९१०, ..१९१४,...१९१६,...१९२६ !

१९२६ साली सपूर्ण धरण उभं राहिलं. पायापासून २७० फूट उच. १६०० फूट रुद, समुद्रसपाटीपासून ५००० फूट उचीवर ! १०० चौरस मैलाच्या पाणलोटाचे क्षेत्र काबीज केले गेले. दिडदोन मैलाच्या पाणपसाऱ्यांत (Backwater) ११११८० दशलक्ष घनफूट पाणी अडवले. प्रवरेचा थेंब न् थेंब वेठीला धरला.

धरण तर बाधून झालं, पण धरणाचं 'बारस' झाल नव्हतं. मोठी गमतीशीर गोष्ट आहे ही ! आज उपलब्ध झालेल्या धरणासबंधीच्या कागदपत्रातील पत्रव्यवहारात अस आढळत की धरणाच्या बाधकामावर असलेल्या मुख्य अभियंता (Chief Engineer) आर्थर हीलसाहेवाचा हट्ट होता की माझेच नाव या धरणाला द्या. पण त्यावेळच्या गव्हर्नर विल्सनसाहेबाची इच्छा होती की आपल्याच नावाने हे धरण ओळखलं जावं ! (...म्हणजे ५१ रुपड्याची देणगी देऊन पायरीवर नाव कोरून घेणाऱ्या आपल्या लोकाना काही हसायला नको !) शेवटी धरणाला नाव दिलं विल्सन साहेबाचं आणि मागच्या जलाशयाला नाव दिलं ऑर्थर हिल साहेबाच ! दोघही खुष !! पुढं मग साहेब गेला अन् दोन्ही नाव नामशेष झाली. लोक धरणाला 'भडारदरा धरण' म्हणू लागले.

धरण बाधून झालं. भंडारदरा, शेंडी आणि काही थोडचा खेड्यांना हौतात्म्य पत्कराव लागलं, पण बेबंद प्रवरा गुलामासारखी राबू लागली, पाटाकालव्यातून, शेतामळ्यातून ! माणसं सुखेनैव उपभोग घेत होती. जिराईत शेती बागायती झाली, उसाचे तुरे मळ्यातून डौलाने डोलू लागले. एवढ्याशा भागात सहा साखरकारखाने उभे राहिले. १५ कोटीच्यावर उत्पन्न देणारा छोटा भाग म्हणून लौकीक झाला. निसर्गरम्य भंडारदरा धरण म्हणजे तर सहलीचे ठिकाणच झाले.

लोक असे मश्गुल होते. धरणावर देखरेख ठेवण्यासाठी, धरण तपासणीसाठी कोणी ठेवलेले नव्हते. हवे तेव्हा गुलाम (पाणी) पाठविण्यासाठी फक्त एक साधा ओव्हरसिअर आणि त्याच्या हाताखाली दहा पंधरा माणसे, बस ! असा गाफील

कारभार. अन् तिकडे दुखावलेली स्वच्छंदी प्रवरा धरणाच्या भितीशी झुंज घेत होती. आघाडीचे दगड फितूर होत होते.

गेली पन्नास वर्षे खिंडीत थोपवून धरलेला गनीम जोर करत होता.

शत्रूने गनिमी कावा करून आघाडीची फळी फोडलेली होती.

दहा सप्टेंबर एकोणिसशे एकूणसत्तर.

कराल दाढा दाखवित, अक्राळविक्राळ हास्य करत गनीम वीस फूट झेपावत होता.

हे आमच्या धुरंधरांच्या लक्षात आले.

आता थांबून भागणार नव्हते.

कोणताही चिरा फितूर होऊन चालणार नव्हते.

प्रत्येक चिरा न् चिरा सांधून शत्रू थोपवायलाच पाहिजे होता, नाहीतर...

नाहीतर या लालगढूळ 'साम्राज्यवादी' गनीमाने खालचा मुलूख तख्ताराज करून बेचिराग करून टाकला असता!

हे युद्ध फत्ते करायलाच हवे होते.

अन् ते सुद्धा—

पॅराशुटसारख्या उतरणाऱ्या ढगांतून

जादा सैन्याची कुमक येण्याच्या आत!

भंडारदरा धरणाबद्दल ऑगस्टपासूनच काहीच्या काही बातम्या उठत होत्या. एकदा तर भंडारदरा धरण फुटल्याची अफवा 'छापली' होती. 'भंडारदरा धरणाला २ फूट रुंदीची भेग पडली' असा मथळा टांगला गेला; पुढे मग दोन फुटाचे दोन सेंटीमीटर झाले. म्हणजे विशेष काही नाही फक्त एफ्. पी. एस्. ऐवजी एम्. के. एस्. (दशमान पद्धती) वापरली! 'थापाथापी' केली गेली. धरण दुरुस्तीसाठी डागडुजी विभागाची (Maintainance & Repairs division) साधी तुकडी पाठविली. पण उपयोग नव्हता. गनीम जोर करत होता. पाणमुसंड्या मारत होता.

एकोणिसशे एकुणसत्तरच्या सप्टेंबरचा दुसरा आठवडा. दहा सप्टेंबर. धरणातच बांधलेल्या ओळंब्याच्या विहीरीतून (Plumbbob shaft) निघालेल्या पाईपमधून धरणाच्या खालच्या बाजूस वीस फूट लांबीचा जलझोत रोंरावत, फुंफावत झेपावत होता. नुसती कल्पना करा, अंगावर शहारे येतील! ही ओळंब्याची विहीर. इंजीनीअर्सना पहिल्यापासून माहीत असलेली! बातमीदारांनी हिचा 'शोध' (?) लावला!! यामध्ये धरण बांधल्यापासून कधी ओळंबा टांगला असेल असा पुरावा उपलब्ध नाही. (कारणे काही असोत) कुठलेही धरण पाणीबंद (watertight) नसते. धरणाच्या भितीत व क्वचित भितीतून बाहेर थोडेफार पाणी पाझरतच असते. त्याला इंग्लीशमध्ये Dam is weeping असे म्हणतात. म्हणजे मराठीत 'नक्राश्रु'च म्हणाना. स्वच्छंदी नदीला भरभक्कमपणे अडवायचं अन् वर मुस-

घुसून रडायच ! तर विहीरीत येणाऱ्या अशा पाण्याला धरणाबाहेर वाट देण्यासाठी हा आठदहा से. मी. व्यासाचा नळा. पण त्यातून एवढा प्रचंड पाणलोट ? धरणाला एवढं ओक्साबोक्शी रडायला झालं होतं तरी काय ? हे काही तरी आक्रीतच होतं. जबर दगाफटका झाला होता खास ! आणखीन काही दिवसांनी धरणाच्या कडेला, भितीच्या खालच्या बाजूने पाण्याचे पाट (sheet of water) उसळया घेऊ लागले. आघाडीची फळी फोडली म्हणून गनीमाला किती आनंद झाला होता ! आता ही शिकार साध्या माचीवरून होण्यातली नव्हती. त्यासाठी सशस्त्र नव्हे पण 'सशास्त्र' डाव आखायला पाहिजे होते. बुद्धीचे मोर्चे डागायला पाहिजे होते !

युद्धाची छावणी धरणावर पडली. खास नवीन डिव्हीजन पाठविण्यात आली. एक अधिक्षक अभियंता, चार कार्यकारी अभियंते, बारा उप-अभियते, अनेक कनिष्ठ अभियंते आणि असंख्य मजूर, कामगार एका जिद्दीने आले. धरणावरील सुटीची सहलगृहे बद केली. त्यांत काही इजिनिअर्स राहिले, पण सगळ्यांची गरज भागली नाही. राहायला जागा नव्हती, जेवायची सोय नव्हती पण आमचे बहाद्दर डरले नाहीत. कामाला सुरुवात झाली तोपर्यंत डिसेंबर उजाडला हौता !

सर्वश्री चाफेकर, मूर्ति व राव यांसारख्या अनुभवी व धुरंधर इंजिनीअर्सची समिती स्थापन झाली. समितीने धरणाचा सर्वांगीण अभ्यास केला व धरण-दोषांची संभाव्य कारणे व उपाय ठरविले. धरणाच्या भितीखालून पाण्याचे पाट उसळत असल्याने धरण पायापासून सुटून सरकले असण्याची शक्यता होती. (Sliding failure). धरणाच्या भितीतच तडा गेला असण्याची दुसरी शक्यता होती. सी. एस्. आय. च्या श्री. जैन यांनी कोयना-भूकपामुळे धरणाचा पाया खचला (Subside) असण्याची शक्यता व्यक्त केली होती. पण सलग व खोलपर्यंत भर-भक्कम पत्थरी पायाच्या बाबतीत हे अशक्यच होते. धरणाखालून जाणाऱ्या भित्ती-खडका (Dyke) विषयी शंका घेतली गेली होती पण ती चांगल्या चिरेबंद अवस्थेत होती.

धरणाच्या पायाचा व भितीचा संबंध (Bond) जर सुटलेला असेल तर तो पुनर्प्रस्थापित करणे आवश्यक होते. त्यासाठी हा संबंध प्रस्थापित करून मग तराफ्यांच्यामध्ये वाळू, खडी, सिमेंटचे मिश्रण भरून ते धरणाच्या मागे तळाशी बुडविण्याची योजना केली गेली. त्यामुळे धरणाखालून येणारे पाणी बंद झाले असते. या योजनेच्या खर्चाचा अंदाजही करण्यात आला. पस्तीस हजाराचा एक, असे अनेक तराफे तयार करावे लागणार होते. खर्च अचाट होता. कल्पना अफाट होती !

याच वेळेस धरण पायापासून सुटले आहे किवा नाही हे ठरविण्यासाठी धरणाच्या भितीवरून पायापर्यंत निरीक्षण-छिद्रे घेतली जात होती. ही छिद्रे Water jetting पद्धतीने घेतली जात होती. या पद्धतीत छिद्र पाडत असताना वरून पाण्याचा उपयोग करतात. वरून घातलेले पाणी परत छिद्रातून बाहेर येते. अशाप्रकारे

छिद्रे पाडण्याचे काम जोरात चालू होते. धरणाच्या भिंतीच्या वरील पृष्ठभागापासून शंभर फूट खालपर्यंत छिद्रे पाडून झाली, वापरलेले सर्व पाणी वर येत होते. सर्व काही ठीक होते. छिद्रे १२५' फुटापर्यंत गेली. आलबेल! छिद्रे १४० फुटापर्यंत गेली आणि...

आणि काय चमत्कार!

छिद्रांसाठी वरून वापरलेले प्रचंड पाणी खालच्या खाली गायब!!

या छिद्र-मालिके अलीकडेच परत दुसरी छिद्रे घेतली.

परत तोच प्रकार.

१४२–१४५ फुटावर वापरलेले सर्व पाणी खालच्या
खाली गायब!

तिऱ्हाईत वाचक म्हणून वाचतांना काही वाटणार नाही ..पण त्यावेळेस इंजीनीअर्सच्या तोंडचे पाणी पळालें...पण पाय लटपटले नाहीत! धरण पायापासून सुटले आहे ही शंका आणि १४० ते १४५ फुटावर तडा असल्याचा धडधडीत पुरावा. नुसता विचार करा...जीवाचा थरकाप उडेल! आणि याच वेळेस बातम्या उठत होत्या 'पहिला प्रयोग फसला!' मुंबईच्या एका प्रतिष्ठित वृत्तपत्राने तर भंडारदरा धरण मातीचे असून मजबुतीसाठी दहा फूट मातीचा थर दिला जात असल्याची विनोदी बातमी 'पिकवली' होती. पण या बातम्यांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता...प्रत्येक क्षण पृथ्वीमोलाचा होता!


प्रथमतः धरण पायापासून सुटले आहे किंवा कसे याची छाननी तावडतोबीने होणे आवश्यक होते. त्यासाठी १४०–१४५ फुटावरचा तडा बुजविणे आवश्यक होते. नेहमीची ग्राऊटींगची पद्धत वापरली. पण सर्वच्या सर्व ग्राऊट-मिश्रण (सीमेंट व पाणी ४:१०) वाहून जात होते अन् ते कुठे ..तर धरणाच्या भिंतीखालून येणाऱ्या पाण्याबरोबर! याचा अर्थ धरणाच्या मागपासून पुढपर्यंत सलग तडा होता. धाबे दणाणले पण धीर खचला नाही!! जास्त घट्ट ग्राऊट-मिश्रण वापरले तरी ते ठरत नव्हते. मग वाळू, सिमेंट व पाणी यांच्या मिश्रणाचा वापर केला पण त्याचाही निभाव लागला नाही. शेवटी मग कोल-ग्राऊटीग (Col-grouting) पद्धत वापरली आणि तिने योग्य कौल दिला! तड्याचा थोडा भाग सील-बंद करून परत Water jetting पद्धतीने धरणाच्या भिंतीवरून थेट पायापर्यंत निरीक्षण छिद्रे घेतली आणि...

आणि 'पायातील दगडाचे' आभार मानावेत अशी गोष्ट!


पायातील दगडांचा त्याग बावनकशी होता!!

धरण पायापासून सुटून सरकलेले नव्हते!!!

आता यापुढचे पाऊल म्हणजे शत्रूने गनिमी कावा करून फोडलेल्या मार्गाचा मागोवा घेणे! धरणाच्या वरील पृष्ठभागापासून १४०–१४५' वर सुरू होऊन



धरणाच्या तळाशी उतरणाऱ्या गनीम-पथाचा छडा लावणे आता अवघड नव्हते पण वेळ थोडा होता. त्यासाठी तडा-शोधन अभ्यास (Crack tracer study) सुरू केला. फारच मनोरंजक आहे तो. धरणाच्या माथ्यावर, मध्यभागी काही विशिष्ट अंतरावर विचलीत (Staggered) छिद्रमालिका घेतल्या. एकावेळेस एक याप्रमाणे प्रत्येक छिद्रातून निरनिराळया रंगाचे पाणी सोडले. वरून सोडलेल्या रंगीत पाण्यास धरणाच्या खालच्या बाजूस यायला किती वेळ लागतो तो घड्याळ लावून मोजला, व तो रंग कुठे येतो ते नोंद केले. याचप्रमाणे धरणाच्या पुढच्या बाजूने निरनिराळ्या अंतरावर व निरनिराळ्या अंशात तिरक्या, विचलीत छिद्रमालिका तड्यापर्यंत घेतल्या. (Water jetting पद्धतीने छिद्रे पाडत असल्यामुळे ज्यावेळेस पाणी 'गायब' होईल तेव्हा छिद्र तड्यापर्यंत पोहोचले असे समजायचे.) या तिरक्या-छिद्रमालिकांतून रंगीतपाणी सोडून याप्रकारे वेळ मोजला. नंतर वेळ, अंतर व पाणी सोडलेल्या छिद्राची जागा यावरून कागदावर आखलेल्या धरणाच्या आडव्या छेदक दृश्यावर (Cross section) सर्व बिंदू निश्चित केले व हे बिंदू जोडणारी रेषा म्हणजे गनीम-पथ! हा तडा आकृती १ व २ मध्ये



दाखविल्याप्रमाणे धरणाच्या मध्यभागी, धरण-माथ्यापासून खाली सरासरी १४० ते १४५ फुटावर ४४० फूट लांबीचा आडवा असा सुरू होऊन धरणाच्या पोटातून पायथ्यापर्यंत तिरका असा होता.


एवढा मोठा तडा जाऊनही धरण वाचलं. खरंच वाचलं ! कसं वाचलं ? याचं कारण धरणाचा वक्राकार आणि सह्याद्रीचे बळकट पंजे ! धरण सुमारे ६०० फूट त्रिज्येचे वक्राकार आहे. या वक्राकारामुळे धरणावर येणाऱ्या बराचशा अधिक-प्रेरणा (forces) थोड्या-फार कमान-तत्त्व किंवा धनुषतत्त्वा (Arch-action) च्या सहाय्याने धरणाच्या दोन्ही टोकाला विभागल्या गेल्या. या प्रेरणा दगडी-पंजांनी (Rocky abutments) समर्थपणे झेलल्या आणि धरण उभे राह्यले ! पण एवढा मोठा तडा पडला तरी कसा याचे कुतूहल उरतेच ! हल्ली एक सर्वांत सोपे कारण झाले आहे, कोयना-भूकंपाचे ! पण भंडारदरा धरणासाठी कोयनेचे त्रैराशिक उपयोगी पडत नाही. इथली कारणे वेगळीच आहेत. मुख्य कारण म्हणजे धरणाच्या प्रचंड आकारमानानुसार, धरणातर्गत वाटा ठेवल्या नव्हत्या... [इंग्लीश-मध्ये त्याला drainage galleries म्हणतात, आपण मराठीत 'नक्राश्रु सज्जे' म्हणू ] धरणातर्गत पाझरणाऱ्या पाण्यास जर सुलभ वाट काढून दिली नाही तर या पाण्याचा उद्धारक दाब (Uplift force) धरणावर खालून वर (Vertically upwards) येतो. ही कल्पना १९१५–१६ च्या पुढची आहे. धरणाच्या डिझाईन-मध्ये ती १९४० च्या पुढे वापरात आली. भंडारदऱ्यासारख्या जुन्या धरणाच्या डिझाईनमध्ये त्याचा वापर करून प्रतिबंधक उपाय योजले नसतील तर नवल नव्हे. आज या उद्धारक दाबा (Uplift force)च्या उपस्थितीत, धरणाच्या आडव्या छेद-कावर (Cross-section) कार्यरत असलेल्या प्रेरणाचा अभ्यास केला तर असे आढळते की त्यामुळे धरणामध्ये १३५ ते १५० फुटामध्ये ताण-प्रदेश (Tension zone) निर्माण होतो. या ताणप्रदेशात ५० ते ७० पौंड / चौ. इंच इतका ताण दगडी बाधकामावर येत होता. अन् दगडी बाधकाम वस्तुत: (Theoritically) काहीही ताण सहन करू शकत नाही ! चुनेगच्चीत केलेले दगडी बाधकाम संमिश्रित (Heterogenous) असते. ते थोडाफार ताण सहन करू शकते, नाही असे नाही,

पण तो निश्चित व भरवशाचा नसतो. आणिक भरीस भर म्हणून की काय १९१६. सालचा बांधकाम-जोड तो कमकुवत आहे असे दिसते. Stage-construction joint) १४५–१५६ फुटावर आहे शिवाय पाण्याचा दीर्घकालीन परिणाम बांधकाम चुन्यावर तो कमकुवत होण्यात होतो, त्यास Lime leaching म्हणतात. या तीन कारणाचा प्रामुख्याने परिणाम होऊन आघाडीची फळी सरासरी १४० ते १४५ फुटावर फुटली ऑणि प्रत्येक पातळीवर वरील तीनही कारणामुळे हळूहळू हा तडा वाढत गेला. हे किती वर्षांत झाल ? अहो, विचारता काय हे— सांगून येतो तो पाहुणा अन् न सागता चोरपावलांने धाड घालतो तो शत्रू ! गनिम !!

शत्रूचा मार्ग होता खरा जबर पण आता—येरागबाळयाशी गाठ नव्हती ! पण तोपर्यंत एकोणिसशे सत्तर सालचा फेब्रुवारी महिना उजाडला होता. लढाई हात-घाईवर आली होती. जून यायला जेमतेम चार महिने होते. कामं तर अजून खूप उरकायची होती. पधरा जूनच्या आत धरण-मजबुतीचे काम संपायलाच हवे होते.

आपल्या तज्ज्ञ-समितीच्या निष्कर्ष योजनेनुसार पूर्वप्रतिबलीन तारखंड (Prestressed cables) वापरून ताणप्रदेश 'सोडवायचा' होता ! शिवाय पडलेला तडा योग्य प्रमणात बुजवून, पिळाच्या सळयानी बांधून घेणे आवश्यक होते. प्रथमतः चित्र क्रमाक ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे अ, ब, क या विचलीत छिद्रमालिकातून क्रमाक्रमाने ग्राऊटीग केले. 'अ' ही छिद्रमालिका धरणाच्या पायाखाली सरासरी पन्नास फूट खोल आहे. या मालिकेला ग्राऊट वाहून जाण्याचा त्रास झाला पण नेहमीपेक्षा जास्त घट्ट मिश्रण (सिमेंट व पणी) वापरल्यावर सुरळीतपणे काम झाले. 'ब' मालिकेला त्यामानाने कमी त्रास झाला तर 'क' मालिकेला अजिबात त्रास झाला नाही. धरणाच्या समोरच्या बाजूने, चित्र क्रमाक चारमध्ये दाखविल्याप्रमाणे पायापासून ५५ फूट, ८५ फूट व १२८ फुटावर खालच्या बाजूला तिरक्या अशा छिद्रमालिका घेण्यात आल्या. यापैकी १२८ फुटावरील छिद्रमालिकातून ग्राऊटीग व पिळाच्या जोड-सळया (Dowels) वापरण्यात आल्या. ८५ फुटावरील फक्त 'ग' या छिद्रमालिकेत वरीलप्रमाणेच ग्राऊटीग व जोड-सळयाकाम (Dowelling) करण्यात आले. ८५ फुटावरील 'ग' या मालिकेत व ५५ फुटावरील 'य' आणि 'र' या मालिकेतून ग्राऊटीग करण्यात आले नाही, कारण मग 'नक्राश्रूचे कढ' आतल्या आत दाबले गेले असते आणि विनाकारण उद्धारक दाब निर्माण होऊन ताणप्रदेशाचे साम्राज्य पसरले असते ! एवढ्यासाठी या तीन मालिकातून फक्त जोड-सळया वापरण्यात आल्या आणि तड्याचा खालचा भाग मोकळा ठेवण्यात आला. याच कारणाकरता वरील तीनही पातळ्यांवरून जमिन-समांतर आडव्या अशा क्ष, य, ज्ञ या पाझर-छिद्र मालिका (Drainage-holes) पाडण्यात आल्या.

अतिशय महत्त्वाचे व खूप वेळ खाणारे काम म्हणजे पूर्वप्रतिबलीत तारखंड



चित्र क्र. ४


वापरून धरणावर वरून सरळ खाली (Vertically downwards) दाब देण्याचे होते. जून तर तोंडावर येऊ लागला होता. जेमतेम चार-साडेचार महिन्यात हे पूर्ण करायचे होते. ' सिमेंटेशन ' कंपनीने हे आव्हान स्वीकारलं. कामाला सुरुवात झाली. धरण संपूर्णपणे पूर्वप्रतिबलीत तारखंड वापरून मजबूत करायचे तर त्यासाठी धरणावर दर फुटाला ११० टन अधोदाब देणे आवश्यक होते. पण पुरेशी यंत्र-सामुग्री उपलब्ध नव्हती आणि धरण संपूर्णतः अशाप्रकारे मजबूत करावे असं मतही नव्हतं. म्हणून दर ५५ टन फुटाला एवढा अधोदाब देण्याचे ठरले. त्यासाठीही बरीच यंत्रसामुग्री लागत होती. त्यांतील काही आपल्या देशात मिळत नव्हती. वेळ थोडा होता. परदेशातून विमानाने काही यंत्रे आणली. तारखंड तयार करण्यासाठी

लागणारे पोलाद आपल्या इथे होत नव्हते म्हणून सुरुवातीच्या कामापुरते पोलाद आयात केले. कामाला धडाक्याने सुरुवात झाली. सारा आसमंत दणाणून गेला.

कामाच्या पहाणीसाठी दोन अमेरीकन तज्ञ–कोपेन व श्री. लोगेन् यांना पाचारण करण्यात आले. लोकांत विश्वास निर्माण करण्यासाठी काढलेल्या दौऱ्यात मंत्री सांगत होते 'आम्ही देशातीलच काय पण परदेशातीलही तज्ञ बोलावले आहेत' पण याच कोपेन, लोगेन ना कुतुहल म्हणून विचारण्यात आलं 'तुमच्या देशात अशाप्रकारची धरणं कशी मजबूत करण्यात येतात?' ...तर त्यांनी काय उत्तर द्यावं? रक्त तापून उठावं असे शब्द... **'We do not make such foolish mistakes and then rectify them !!'**

मध्यंतरीच्या काळात आपल्या भारतात या तारखंडासाठी लागणारे पोलाद भद्रावतीला तयार करण्यात येऊ लागले, मुकुंद आयर्न अॅन्ड स्टील कंपनीने पोलादी तारा तयार करून द्यायला सुरुवात झाली आणि लागणारे पोलादी तारखंड आपल्या इथे होऊ लागले! हा एक–एक पोलादी–तारखंड म्हणजे अत्युच्च पोलादा (High-tensile steel)पासून तयार करण्यात आलेल्या ७ मि. मि. व्यासाची एक अशा ७२ तारांचा जुडगा. हा धरणावरच बांधला जात असे. या तारखडांची लांबी सरासरी ३८० ते ३१६ फूट होती. सबंध जगात पहिल्यांदाच एवढया लाबीच्या तारांचे पूर्वप्रतिबलन (Prestressing) करण्यात येत होते!

आकृती क्रमांक चारमध्ये दाखविल्याप्रमाणे धरण–माथ्यावर, दोन छिद्रमालिका घेण्यात आल्या. प्रत्येक छिद्राचा व्यास पावणेपाच इच होता. ही सर्व छिद्रे २८० ते २१६ फूट खोल होती म्हणजे धरणाच्या मध्यभागी सुमारे ४०' ते ५०' फूट धरणाच्या पायाखाली खोल! आता या छिद्रांतून धरणावर तयार केलेला तारखड आत सोडायचा आणि वरून विशिष्ट पूर्वप्रतिबलकाने (Prestressing head) ताणून घ्यायचा. पण वरून ताणायचं तर खाली पक्की पकड तर हवी ना! त्यासाठी या छिद्रातून प्रथमतः सिमेंट कॉंक्रीट ओतण्यात येत असे ते इतके की तारखंडाचे शेवटचे २० फूट त्यात पक्के रोवले जावे. पण एकदा हे सिमेंट–कॉंक्रीट आत ओतले की पंधरा–वीस मिनिटांच्या आत (सिमेंट–कॉंक्रीट घट्ट होण्यापूर्वी,) तारखंड छिद्रातून खाली आतपर्यंत गेला पाहिजे! अगदी लग्नाचा मुहूर्त गाठावा तसा!! एकदा का हा तारखड वेळेवर आत पोहोचला की मग तीन दिवसांनी सिमेंट–कॉंक्रीट घट्ट होऊन तारखंड आपले पाय पक्के रोवायचा–तानाजीच्या घोरपडीसारखे! मग कितीही जबर वजनाचा ताण येईना का—! जाम हलणार नाही जागचा!! अशी खालची पकड पक्की झाली की मग तारखडाच्या वरच्या टोकाला विशिष्ट प्रकारचा व्ही. एस्. एल्. प्रतिबलक (V. S. L. Prestressing head) बसवून तारखड वर ताणून घ्यायचा. तारखंड धरणमाथ्यावर पक्का केला जात असे. या सर्व क्रियांना प्रत्येक तारखंड २७० टन वजनापर्यंत




चित्र क्र. ३

ताणला होता. आणि अशाच ताणलल्या स्थितीत तारखंड धरणमाथ्यावर पक्का केला जात असे. या सर्व क्रियाना तारखडाचे पूर्वप्रतिबलन (Cable Prestessing म्हणतात.

तुमची शंका आमच्या लक्षात आलीय बरं का –? तुमचं काय म्हणणं, या तारा वर ताणल्यावर धरणावर अधोदाब कसा येणार? हे पहा, जमिनीत खूप खोल रोवलेली काठी दोन्ही हातानी 'वर उचकटून' काढताना आपण आपल्या पायावर खालच्या दिशेने म्हणजे अधोदाबच देत असतो की! याच न्यायाने, व्ही. एस्. एल्. पूर्वप्रतिबलकामुळे तारखंड २७० टन इतक्या वजनापर्यंत ताणल्यानतर आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे धरणावर तेवढाच अधोदाब येतो. अशा प्रकारे तारखडाच्या एकंदर त्रेपन्न जोड्या पूर्वप्रतिबलीत केल्या आहेत. या १०६ पूर्वप्रतिबलीत तारखंडांमुळे एकूण २८६२० टन वजन धरणावर कार्यरत झाले आहे. काम ठरल्या वेळेपूर्वीच संपले! आज धरणावर तारखडाच्या त्रेपन्न जोड्या सिमेटकाँक्रीटच्या चबुतऱ्यांमध्ये पक्क्या बाधल्या आहेत, आणि हे १०६ चबुतरे दिसतात शत्रूंच्या थडग्यासारखे! २१० टन पोलाद आणि २०,००० गोणी सीमेंट पोटात घेऊन बसलेले!!

पूर्वप्रतिबलीत तारखडाचे काम जसे महत्त्वाचे होते त्याच्याच जोडीला आगामी पावसाळ्यात वाढणाऱ्या पाण्याला वाट करून देणे हेही अतिशय महत्त्वाचे होते. अन्यथा धरण-मजबुतीचा खटाटोप 'पाण्यात'च गेला असता! यासाठी धरणाच्या सांडेची (Spillway) उची कमी करणे हे प्राथमिक पाऊल होते. पूर्वी या धरणाची सांड अत्युच्च पूर पातळी (High flood level) पेक्षा फक्त चार फूट खाली होती अन् तीसुद्धा द्वार-विरहित (Non-gated) फक्त चार फूट उंचीची! बंगल्याच्या कुंपणासारखी!! ती २६ फूट खाली घेतली. नवीन साड बांधण्यास सुरुवात केली. या मान्सून मोसमात ती द्वार-विरहीतच ठेवण्यात येईल, नंतर त्यावर २६ फूट

उंचीचे वर्तुळाकृती द्वार (Tainter gate) बसविण्यात येईल. पण नुसती सांड उतरवून काय पाड लागणार होता ?

त्यासाठी धरणाच्या बाजूने पलीकडून पूरक बोगद्याची (Side tunnel) योजना आखली होती. पूर्वी हा बोगदा काढायचाच होता कारण जल-विद्युत प्रकल्पाची कल्पना होतीच. फक्त जुन्या योजनेप्रमाणे बोगदा काढला असता तर बोगद्याची लांबी प्रचड होत होती – १००० फूट ! एवढ्या लाबीचा बोगदा चार महिन्यात पूर्ण करून त्यात दरवाजे बसविणं अशक्यप्राय होतं म्हणून चाळीस फूट वरती हा बोगदा काढण्याचे ठरले. त्याची लांबी भरली ४६५ फूट. तरी दिवसाची काटा-काटी करूनही बोगदा खणून त्यात साधेसुधे नाही चागले २७ टनी वजनाचे द्वार (द्वार कसले महाद्वार !) पाच जूनपूर्वी बसवायचे होते ! २७ टनी वजनाचे महाद्वार. आपल्या दापोडी येथे तयार करायचे. तिथून भंडारदऱ्याला नेऊन अचूक बसवायचे ! आणि अगदी अचूक म्हणजे अगदी पाच जूनला बोगदा संपूर्ण खणून त्यात ते महाद्वार बसविले गेले ! अगदी पाच जून म्हणजे ..घड्याळात तारीख लावून घ्यावी !!

युद्ध जिंकले आहे. अजून पाचदहा वर्षे तरी शत्रू वर डोके काढणार नाही ! पण युद्ध जिंकल्यानंतर सीमा बळकट करायच्या असतात अन् त्याही शत्रू मुजोर व्हायच्या आत !...पुढच्याच वर्षापासून धरणालगतच नवी जोड – भिंत बाधून पाया रुंद करण्याचे काम सुरू होणार आहे.

आज तरी युद्धपर्व संपलेले आहे. विजयाचे पारडे तुमच्या-आमच्या बाजूला आहे. विजयाच्या रणभेरी फुंकाव्या अशी वेळ !.. पॅराशूटसारख्या उतरणाऱ्या ढगातून जादा सैन्याची कुमक येण्याच्या आत युद्ध यशस्वी फत्ते !! हत्तीवरून साखर वाटा साखर !!!

...पण साखर कारखान्याचे एक चेअरमन साखर वाटण्याऐवजी भांडत होते वेगळाच ठराव–

' धरणाबद्दल शंभर टक्के खात्री कोणीही देत नाही, देऊ शकत नाही. तेव्हा सरकारने भडारदरा धरण रिकामे करावे व लाख बधारा ताबडतोब फोडावा, न पेक्षा आमचे गावकरी जाऊन तो फोडतील. ' हे आहेत बाळासाहेब विखे पाटील, श्रीरामपूर तालुका पंचायतीचे सभापती.

एक प्रतिष्ठित नागरीक व प्रगतीशील शेतकरी म्हणून यांची प्रवरानगरला मुलाखत घ्यायला गेलो असता–

' भंडारदरा...?'

(कसला भंडादरा...?)

' हं, हं, म्हणजे आपलं भंडारदरा धरण. पण त्याबद्दल मी काय मुलाखत देणार ? बरं मी काही शेतकरीही नाही...

'आणि दुसरं म्हणजे हा विषय आता जुना झाला आहे. वर्तमानपत्रातही त्यावर बरीच चर्चा होऊन गेली आहे.'

'पण पाटील, आजच्या परिस्थितीवर तुमचं मत हवंय आम्हाला.'

'आहो, पण उपयोग काय त्याचा ? मी धरण फुटणार म्हटलं काय किंवा न फुटणार म्हटलं काय सारखंच !'

अशी उत्तरं मिळतात.

प्रांतसाहेब श्री. पाटील तरुण, उमदे व स्पष्ट विचारांचे असल्याने त्याचे आमचे सूर चटकन जुळले. 'सरकारने धरण रिकामे करावे व ते परत बांधून काढावे. म्हणजे लोकांच्या जिवाला असणारा धोका व मालमत्तेच्या हानीची शक्यता; दोन्हीही वाचतील. अर्थात यामुळे आमच्या शेतीचे नुकसान होईल. पण आम्ही ते स्वखुशीने सोसण्यास तयार आहोत.'

असा ठराव श्रीरामपूरच्या काही शेतकऱ्यानी शासनाकडे पाठविला. त्याबद्दल एका वरीष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच मत विचारलं तेव्हा ते म्हणाले,

'बरोबरच आहे. गुळाचे भाव उतरले आहेत म्हणून याना ही रामदासी वृत्ती सुचते आहे.

'--पण ज्यांच्या कर्जपत्रांवरची शाईही अजून वाळली नाही अशा लहान शेतकऱ्यानी काय करावं ? का दहा वर्षे याच्या तोंडाकडे पहात बसावे !'

'लाख बंधारा फोडण्याविषयी...'

'अहो, हा बंधारा फोडून काय होणार आहे ? या बंधाऱ्यामुळे याना पाणी पसरण्याची भिती वाटते. पण हा बधारा गेली कित्येक वर्षे आहे. दरवर्षी पूर येतातच. १९५६ साली तर केवढा मोठा पूर आला होता....'

'पण मग ही फोडण्याची कल्पना...'

'त्याचं काय आहे, नदीच्या पात्रात साठलीय खूप वाळू. त्यामुळे पात्र झालंय उथळ. बंधारा फोडला की येणाऱ्या पाणलोटाबरोबर वाळू वाहून जाईल, पात्र खोल होईल व जास्त पाणी मिळेल अशी कल्पना आहे त्याची !'

आणि मग कळलं की हा सगळा मोठ्या शेतकऱ्यांचा स्टंट आहे.

तरीही--

कौतुक करायला हव त्या मुलकी अधिकाऱ्याच, अभिनंदन करायला हवं त्या 'लाल फीत फेम' शासनाच--

--त्यानी केलेल्या प्रवधनाच्या (Vigillence) चोख व्यवस्थेसाठी. खरंच चोख आहे ती व्यवस्था !

युद्धाला दोन बाजू असतात. शत्रूला थोपवून धरण हा झाला एक भाग; पण सरहद्दीवरच्या जनतेला शिकवण, पढवण, त्याच्या मनात विश्वास निर्माण करणं आणि '--चागल्याची अपेक्षा करा व वाईटाची तयारी करा'--या न्यायान निसर्गाचा कोप होऊन काही बरं वाईट घडलच तर या जनतेला चार वस्तु काखोटीला मारून जीव वाचवता यावा अशी व्यवस्था करणं.

या कामासाठी आज भंडारदऱ्याला एक कार्यकारी अभियंता नेमलेला आहे. पण धरण फुटलेलं वा त्याला धोका आहे हे कळणार कसं? त्यासाठी धरणावर एक लंबयंत्र (Tiltoscope) बसविले आहे. या यंत्रावर धरण एका बाजूला झुकले तर सूचना मिळेल. २४ तास ते यंत्र चालू राहील. धरणाच्या दोन्ही बाजूला एक एक उप अभियंता २४ तास राहील. त्यामुळे धरणाचा धोका लगेच ध्यानात येईल.

आता प्रश्न आहे ही बातमी सगळीकडे पोहोचविण्याचा श्रीरामपूर, राहूरी, संगमनेर व नेवासे तालुक्यात एकदर १२५ गावे आहेत.

सगमनेर आणि त्या खालील गावे यांची परिस्थिती बरी आहे, कारण त्यांचे येथे पाणी यायला सुमारे दोन तास लागतील.

या गावाना बिनतारी यंत्राने (धरणाच्या जवळच बपत्रिकेच्या) लगेच सूचन मिळेल. प्रत्येक गावात—संगमनेर, लोणी, बेलापूर, अकोला असे एक एक यत्र बसविलेले आहे. त्यामुळे १५–२० मिनिटात ही बातमी सगळीकडे पोहोचेल.

पण आणखी एक अडचण—

निसर्गही मोठा कठोर आहे. तो अडचणी कधी एक-एकटया पाठवीत नाही तर एकदम पाठवितो.

बिनतारी यत्राने बातमी पोहोचली.

पण ही यंत्रे गावाबाहेर आहेत. आणि सूचना देणारा भोंगा गावातच हवा. म्हणजे ही बातमी तेथे मिळायली हवी.

त्यासाठी फोनची व्यवस्था.

आणि फोन exchange बंद पडले तर?

म्हणून प्रत्येक गावात या दोन ठिकाणात निराळी टेलिफोनची लाईन!

भोंगा चालू होणार विजेवर. पण वीज-प्रवाहाने दडया मारणं हा संगमनेरकराचा सरावाचा खेळ झाला आहे. अशीच दडी प्रवाहाने त्या वेळी मारली तर?

यासाठी प्रत्येक ठिकाणी एक डिझेल इजिन—की ज्यामुळे जनित्र सुरू होऊन ताबडतोब वीज प्रवाह निर्माण होईल व भोंगे सुरू करता येतील.

आणि समाजकटकाची आपल्या समाजात वाण नाही. म्हणून स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी यानी या व्यवस्थेत फसवणूक करू नये म्हणून संदेश शब्दात न जाता एका विशिष्ट पद्धतीने दिला जाईल. सदेश देताना फक्त रंग सागितला जाईल व त्या रंगाच्या सीलबद केलेल्या डबीतील संदेश सर्वत्र पसरविला जाईल.

आजच्या तंत्रज्ञांच्या अंदाजाप्रमाणे धरण समजा फुटलेच तर ते तडयाच्या पातळीला म्हणजे वरून १४०' उंचीवर फुटेल. या अंदाजाप्रमाणे किती पाणी येईल याचा हिशेब करून प्रत्येक गावाजवळ दगडाच्या खुणा करून दिल्या आहेत की ज्या दगडाच्या पलीकडे लोकानी पळावे.

हे खरं, पण धरणाजवळच्या गावातील लोकानी काय करायचं?

आहे, त्यांचीही काळजी घेतलेली आहे.

या प्रत्येक गावात एक रेडिओ-सेट बसवून चातुर्मासभर म्हणजे १५ जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत हे सेट्स २४ तास चालू राहतील व त्याचे जवळ सतत एका माणसाने बसून रहावे अशी अपेक्षा आहे.

बातमी प्रथम मुंबई-ब या केंद्राला मिळेल व मग त्याचे सर्व कार्यक्रम थांबवून या बातम्या त्या केंद्रावरून दिल्या जातील. आणि जर समजा हे केंद्र बंद असले तर त्याच्याच एवढ्या क्षमतेचा एक ट्रान्समिटर भंडारदरा येथे बसविला आहे. तो १५ मैलाच्या परिसरातील सर्व केंद्रांना परस्पर सूचना देऊ शकेल. हे झालं जीव वाचविण्याबद्दल !

पण त्यानंतर, नदीला उतार नसल्यामुळे ज्या खेडेगावांना जाणे शक्य होणार नाही अशा गावांची चार महिन्याच्या धान्याची तरतूद आजच करून ठेवलेली आहे. त्यामुळे कोणाला उपास पडणार नाही.

' अरे, पण धरण फुटणार नाही म्हणता, मग ही इतकी चोख व्यवस्था कशासाठी ? याचा अर्थ तिथे काहीतरी धोका आहे ?'

असा खडा सवाल अगदी प्रत्येक अधिकाऱ्याला इतकेच नव्हे तर आम्हाला सुद्धा विचारला जात होता. आणि मग ' आवाज बंद 'च्या थाटात ते आमच्याकडे पाहत होते.

खरय त्याचही ! पण तंत्रज्ञ हे काही देव नाहीत. तीही माणसच आहेत—

प्रयत्नाची पराकष्ठा त्यानी केली. यश देणं न देणं परमेश्वराच्या हाती.

समजा सतत पाऊस पडला, पाठोपाठ पूर आले, तर ?

—म्हणून ही व्यवस्था.

पण गमत अशी की असा सवाल जसे ' रामा दगडू कोडितकर ' टाकतात तसाच संगमनेरचे अॅडव्होकेट दिघेही टाकतात.

समाजातल्या तीन थरातील भेद येथे प्रकर्षाने पहावयास सापडतो. आंधळा विरोध जसा दिसतो तसाच अडाणी आत्मविश्वासही जाणवतो.

' धरण मोकळं करा, फोडा ' म्हणणारा सधन शेतकरी, मोठा बागायतदार, ज्याचं लक्ष बोचक्यावर आहे, यासाठी हवा असल्यास पैसा देण्याची तयारी यांनी दाखविल्याच्या वावड्या उठत आहेत. धरण फुटणं वा ते १० वर्षे मोकळ करणं याने त्यांच्या अंगावरची धूळ फार तर झटकली जाणार आहे आणि म्हणून मोठमोठे ठराव करून ते समाजवादी वृत्तीचा बहाणा करीत आहेत. खरं कारण आहे गुळाचा ' उतरलेला ' भाव !

पण लहान शेतकरी व मळेवाले या लोकानी कर्जे घेऊन शेतात विहिरी खणल्या आहेत, खतं घातली आहेत. त्यात परत उसाला भाव नाही.

—यांच्या मते धरण फोडण्याची आवश्यकता नाही. त्याची डागडुजी करावी.

# तुमच्यासाठीं वरदान

**आतांच बचत करा व अधिक पैसे मिळवा...**
सार्वजनिक भविष्यनिधीच खातें सुरू करा...५ टक्के इतक्या (करमुक्त) भरपूर व्याजाव्यतिरिक्त ●
इतर फायदे :

- कर्ज व पैसे काढण्याची सवलत
- ठेवींवर न्यायालय बोजा आणूं शकत नाहीं
- करांसाठीं प्राप्तीचा आंकडा ठेवी असतील त्याप्रमाणें कमी धरला जातो.

अधिक तपशीलासाठीं
स्टेट बँक ऑफ इंडियाकडे चौकशी करा.

राष्ट्रीय
बचत संघटना



davp 70/194

थोडं पाणी कमी मिळालं तरी चालेल.

—पण ही माणसंही चिंतातूर आहेत. धरण फुटण्याची भिती मनात आहे ती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते आहे.

'तुम्ही धरणावर जाऊन आलात नव्हं. खरंच भिती नाय काहो ?'

असा प्रश्न विचारतानाचा त्याचा चेहराच स्पष्ट करतो या गोष्टी.

आणि 'आपण बा समद सामान गावाबाहेर नेऊन ठेवलं' अस सागताना दिसते त्याची आर्तता.

मुलकी अधिकाऱ्यानी व पुढाऱ्यानी घराघरात जाऊन त्याना मांगण्याचा प्रयत्न केला आहे. सभा–बैठकी घेतल्या आहेत. त्यामुळे आता थोडासा विश्वास निर्माण झाला आहे.

तिसरा प्रकार सर्वसामान्य नागरिकाचा. त्यांच्या भावना मात्र संमिश्र आहेत.

'धरण फोडा नाहीतर आम्ही बाँब घेऊन ते फोडू' असं म्हणणारा एक प्रशिक्षित–सुशिक्षित गृहस्थ भेटतो आहे. पण त्याच्या भावना समजू शकतात. त्याच्या मते राजकारण म्हणून व बागायतदाराचे लागूलचालन करण्यासाठी सरकार मागे पाऊल टाकते आहे.

याचबरोबर 'काही झालं तरी धरणाला धोका नाही' असं सागणारा त्या धरणावर पूर्वी कामाला असलेला मिस्त्री भेटतो आहे. कदाचित इंग्रजाने ते बांधलं म्हणून असेल किंवा त्याने तेथे काम केलेलं आहे म्हणून असेल. पण तो छातीठोकपणे सांगतो आहे. विविध माणसे अनेक मते !

◻

—भंडारदऱ्याचे युद्ध आपण दोन्ही आघाड्यावर जिंकले आहे—

युद्धात जयपराजयाबरोबरच काही धडेही घ्यायचे असतात.

'ठेच लागल्यावर शहाणं होण' हे शहाणपणाच लक्षण नव्हे. पुढाऱ्याच्या ठेचेने आपण शहाण व्हावं.

१५ वर्षांपूर्वीपासून भडारदरा–भाटघर–चणकापूर ह्या धरणाची मजबूती करण्याची आवश्यकता पटलेली असताना आजपर्यंत शासन झोपून का राहिले समजत नाही.

का दर ठिकाणी तडा जाण्याची वाट पहात आहेत हे ?

तीच परिस्थिती देखरेखीबद्दल.

२० फूट पाण्याचा झोत पाहिल्यावर ५० इंजिनिअर्स तेथे धावतात. पण इतर वेळेला मात्र एक ओव्हरसिअर !

शासनाने यापुढे तरी इतर धरणाची मजबुती ताबडतोब हाती घ्यावी व तेथे पुरेसा देखरेख–स्टाफ ठेवावा—

नाहीतर आहेच पुन्हा युद्धाला निमंत्रण !!!

◻ ◻ ◻



समीर

## ◻ आंतरराष्ट्रीय विद्यालय

यूनोतर्फे बँकॉक येथे चालविण्यात येणारी "एशियन इन्स्टीटयूट फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंट अँड प्लॅनिंग" ही संस्था म्हणजे एक आंतरराष्ट्रीय विद्यालय आहे. गेली सहा वर्षे ही संस्था किती महत्त्वाचे काम करीत आहे याची माहिती देण्यासाठी संस्थेची माहिती अधिकारी सौ. गिसेल रिचर्डसन नुकतीच दिल्लीला येऊन गेली तेव्हा तिने पुढील माहिती दिली :

आर्थिक नियोजन व विकासाचे कार्य करू शकणाऱ्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांची उणीव भरून काढणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असून तिचे मुख्य कार्य म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या नियोजन–कार्याच्या व्यवहारी बाजूवर भर देणारे अभ्यासक्रम शिकविणे हे आहे. ज्यांना सुमारे दहा वर्षाचा कार्यालयीन अनुभव आहे व निर्णय घेण्याइतका अधिकार ज्यांच्या हाती आहे अशा मध्यम व वरच्या स्तरांच्या अधिकाऱ्यांसाठी हे शिक्षणक्रम आखण्यात आले आहेत. आपापल्या देशात चाललेल्या कार्यात उपयोगी पडू शकणारी आधुनिक अद्ययावत् साधने या शिक्षणातून त्यांना उपलब्ध करून दिली जातात. या शिक्षणक्रमाचा अवधी सहा आठवड्यापासून सहा महिन्यापर्यंत असतो. या विद्यालयात उच्च शिक्षणासाठी कोणाला पाठवायचे हे प्रत्येक देश स्वतःचे स्वतः ठरवितो. आतापर्यंत सुमारे १२०० अधिकाऱ्यांना या संस्थेत प्रशिक्षण मिळाले असून त्यातले ८० भारतीय आहेत. संस्थेचे संचालक डॉ. प्रसाद हेही भारतीय आहेत; त्याचप्रमाणे शिक्षक वर्गातही बऱ्याच भारतीयांचा भरणा आहे. सर्व 'इकाफे' प्रदेशातून या संस्थेचे विद्यार्थी येतात व त्यांच्यात निर्माण होणारी जवळीक हा संस्थेचा एक अदृश्य पण फार मोठा फायदा आहे

सुरुवातीला विद्यालयात येणाऱ्या मंडळीत एकमेकांबद्दल दूषित पूर्वग्रह असतात—उदाहरणार्थ, जपान्यांना वाटते भारतीयांना बुद्धी नाही, भारतीयांना वाटते याच लोकांना बुद्धी नाही. पण हे ग्रह फार काळ टिकत नाहीत. केवळ आपल्या देशाचा विचार न करता प्रादेशिक विचार करू शकणाऱ्या उच्च अधिकाऱ्यांचा एक वर्ग या संस्थेने आता तयार केला आहे. स्वतःच्या देशात प्रचलित नसलेल्या नियोजन-

तत्त्वज्ञानाची व नियोजन-तंत्राची त्यांना माहिती होते, व बऱ्याच समस्या या सर्व देशातून सारख्याच आहेत याचीही त्यांना जाणीव होते. अशा प्रकारच्या तौलनिक अध्ययनाने त्यांची चिकित्सक बुद्धी तीव्र होते. 'इकाफे' क्षेत्रातील निरनिराळया देशाच्या प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन या संस्थेचे शिक्षणक्रम आखण्यात आलेले आहेत. संस्थांचा खर्च युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट फंड व भारतासकट २४ देशांच्या सरकारतर्फे चालविण्यात येतो.

## ◻ भारताची हरित क्रांती

भारताने शेतीच्या क्षेत्रात निश्चित क्रांतिकारक प्रगती केली आहे असे मत काही दिवसांपूर्वी पूर्व जर्मनाचे शेतीविषयक अर्थशास्त्राचे तज्ज्ञ डॉ. मिचलस्की यांनी दिल्लीच्या भेटीत प्रकट केले. ते म्हणाले, मी १९६४ साली पुणे विश्वविद्यालयात काही संशोधन करण्यासाठी आलो होतो तेव्हा परिस्थिती फारच वाईट होती, पण आता ती कल्पनेपलीकडे बदलली आहे. खताचा वापर, यांत्रिक शेती, बहुप्रसव बियाणे, पाणीपुरवठा व अनेक पिके काढण्याची पद्धत या सर्व गोष्टींमुळे आता अगदी नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे, व त्यामुळे भारत शेतीत खूप प्रगती करणार हे निश्चित आहे. पण या हरित क्रांतीच्या सामाजिक बाजूकडे दुर्लक्ष होता कामा नये. तांत्रिक दृष्टया ही क्रांती फार यशस्वी झाली आहे. पण आतापर्यंत तिचा लाभ फक्त मोठया शेतकऱ्यांनाच मिळत आहे. तो लहान शेतकऱ्याना उपलब्ध झालेला नाही. गरीब शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी भाडयाने ट्रॅक्टर देण्यासाठी सरकारने केंद्रे उघडावीत, म्हणजे ते मोठया शेतकऱ्याची बरोबरी करू शकतील. शिवाय त्यांना सावकारी पाशातून सोडविण्यासाठी सढळ हाताने उधारीची व्यवस्था व्हायला हवी. छोटया शेतकऱ्याना हरित क्रांतीत समाविष्ट करून घेणे ही खरी समस्या आहे.

भारताला पूर्व जर्मनीकडून १०,००० ट्रॅक्टर व १५० 'कंबाइन हार्वेस्टर' यंत्रे मिळणार असून ती चालविण्याचे शिक्षण देण्यासाठी पंजाब किंवा उत्तर प्रदेशात एक 'आदर्श शेत' स्थापन करण्याची योजना आहे. कंबाइन हार्वेस्टर यंत्रांची किंमत प्रत्येकी एक लाख रुपये असून काही यंत्रे पंजाबमध्ये फार चांगले काम करीत आहेत. भारत व पूर्व जर्मनी यांच्या दरम्यान वैज्ञानिक व तांत्रिक सहकार्याचा करार व्हावा असा प्रयत्न चालू असून आदर्श शेत या कराराचा एक भाग म्हणून उघडण्यात येईल

तिन्ही घटनांची वेळ एकच.
रात्री साडेनऊ ते साडेदहा.
प्रत्येक वेळी रात्र पौर्णिमेची.
ठिकाण : सार्वजनिक रस्ता.
खुनांची पद्धत एकच....


---

व. कृ. जोशी

---




आमच्या गावातील त्या भयानक घटनांची सुरुवात जानेवारी महिन्याच्या पौर्णिमेच्या रात्री झाली. दहा वाजण्याचा सुमार होता. विसूभाऊ मोहिते आपल्या कापडाच्या दुकानच्या बाहेरच्या दरवाजाला कुलूप लावून घरी जाण्यास निघाले. त्यांची मनोवृत्ती उल्हसित होती. आजच त्यांच्या दुकानचा वर्धापन दिवस समारंभपूर्वक साजरा झाला होता. गावातील अनेक प्रतिष्ठित स्त्रीपुरुष त्यानिमित्ताने त्यांचे दुकानी येऊन शुभेच्छा व्यक्त करून गेले होते. समारंभासाठी पुष्पगुच्छ व फुले आणली होती. त्यातलेच टपोरे पिवळ्या गुलाबाचे फूल हातात घेऊन त्याचा वास घेत, दुकानाच्या भावी भरभराटीची स्वप्ने पहात विसूभाऊ त्या निर्जन पण



चंद्रप्रकाशित रस्त्याने चालू लागले. अचानक त्यांचेवर कुणा व्यक्तीची छाया पडली. आपल्या मागून असे लपत छपत कोण येत आहे हे पहावं म्हणून ते मान वळवत होते तोच एक फास त्यांच्या गळयाभोवती पडला व तो इतक्या त्वेषाने व जोराने आवळला गेला की तत्क्षणी त्यांची शुद्ध गेली...

त्यानंतर बरोबर एक महिन्याने दुसरा प्रसंग ओढवला. मित्रसमाजाच्या हॉलमध्ये लायन्स क्लबची मिटिंग होती. सभेचे काम रात्री साडेनऊच्या सुमारालाच संपल होते. सर्व सभासद घरोघर गेले होते पण नानासाहेब मालशे वकील क्लबचे चिटणीस असल्याने आवरा-आवरीसाठी मागे राहिले होते. सर्व काम आटोपल्यावर ते

इमारतीबाहेर पडले. पौर्णिमेचे प्रसन्न चांदणे आणि मंद व थंड वाऱ्याची झुळूक यामुळे त्यांच्या काहीशा शिणलेल्या मनाला आल्हाद वाटला. त्यांची काळी अॅम्बॅसडर गाडी रस्त्यावर थोडीशी दूर पार्क केलेली होती. उजव्या हाताचे बोटाभोवती ते गाडीच्या किल्लीची रिंग फिरवीत व उजव्या हातातल्या पिवळ्या गुलाबाच्या कळीचा वास घेत त्यानी काही पावले टाकली अन् कुणा अज्ञात व्यक्तीने मागाहून झपाट्याने येऊन त्याचे गळ्याभोवती फास टाकून तो आवळला...नानासाहेबांना प्रतिकारच काय पण मदतीसाठी आरोळी देण्याचाही अवसर मिळाला नाही व ते खाली कोसळले.

यानंतर आणखी एका दुर्दैवी घटनेची भर पडायची होती व ती ही पौर्णिमेच्या रात्रीच. त्या दिवशी गावातील सरदार हायस्कूलचे आवडते शिक्षक बापूसाहेब दातार हे सेवानिवृत्त होत असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांचा सत्कार करण्याचे योजिले होते. समारंभ आटोपून विद्यार्थी केव्हाच पांगले होते. बापूसाहेब आपल्या सहकाऱ्याशी गप्पा गोष्टी करीत बसले होते. रात्रीचे नऊ वाजून गेले. सर्व शिक्षकांनीही त्यांचा निरोप घेतला. बापूसाहेबांचे अंतःकरण मात्र भारावून गेले होते. सहकाऱ्यांनी त्याना वाहनातून चलण्याची विनती केली होती. ती त्यांनी मानली नाही. त्यांना त्या चादण्यातून रमत गमत घरी जायचे होते. त्यांच्या एका आवडत्या विद्यार्थ्याने दिलेली पिवळ्या गुलाबाची कळी अलगदपणे नाकाशी धरून ते निघाले. वाटेतच रामाचे देऊळ होते. दातार मास्तर देवळात गेले नाहीत. रस्त्यातच उभे राहून भक्तिभावाने त्यानी डोळे मिटून हात जोडले तोच यमदूताची जणू छाया आली. त्याचे गळ्याभोवती फास पडला होता व कुणीतरी तो जोराने आवळत होता. दातार मास्तरांनी पुन्हा डोळे उघडले नाहीत.

आणि आता या तीन भीषण खुनांच्या तपासात आतापर्यंत संपूर्ण अपयश आल्याने इन्स्पेक्टर प्रधानांच्या मनावर निराशेची दाट छाया पडली होती. रात्रीचे अकरा वाजून गेले होते पण इन्स्पेक्टर प्रथम आपल्या कचेरीच्या खोलीत बसून तपास कामाचे कागदपत्र पुन्हा पुन्हा वाचून मनन व चिंतन करीत होते. त्यामुळे त्यांचे असमाधान वाढतच होते. स्वतःच्या मार्गदर्शनासाठी त्यांनी काही टाचणे केलेली होती त्यावर ते पुन्हा पुन्हा नजर टाकीत होते.

झालेल्या तिन्ही गुन्ह्यांची वेळ रात्री नऊ ते साडे दहा. रात्र प्रत्येक वेळी पौर्णिमेची.

तिन्ही घटना सार्वजनिक रस्त्यावर.

तिन्ही खुनांची पद्धत एकच ती म्हणजे मागाहून येऊन गळ्यात फास टाकून आवळणे.

गुन्हेगाराने हल्ला केलेल्या व्यक्तीच्या अंगावरील पैशाला अगर कोणत्याही चीजवस्तूला हात लावलेला नाही.

बळी पडलेल्या व्यक्तीचे कुणाशी वैर नव्हते.

गुन्हेगाराचे नाव, वर्णन अगर पत्ता अजिबात लागत नाही. भगीरथ प्रयत्न करूनही या नकारात्मक माहिती शिवाय काहीही हाती लागले नव्हते. इन्स्पेक्टर प्रधान निराश झाले होते पण हताश मात्र नाही. त्याना डॉक्टर भाटियाचे स्मरण झाले. ज्या ज्या वेळी गुन्ह्याचे स्वरूप अनाकलनीय होई त्या त्या वेळी त्याविषयी डॉक्टर भाटियाचा सल्ला व मार्गदर्शन त्याना उपयोगी पडले होते. डॉक्टर भाटियांचा मानसशास्त्राचा अभ्यास सखोल होताच पण त्यांनी गुन्हेगारी मनोवृत्तीचे बाबत खास सशोधन केले होते.

इन्स्पेक्टर प्रधानांकडून मानसिक गुतागुतीच्या गुन्ह्याच्या हकीकती ऐकण्यास डॉक्टर भाटिया नेहमीच उत्सुक असत व इन्स्पेक्टर प्रधानानाही त्याच्या विवेचनाने गुन्हेगाराच्या दुनियेकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन मिळाला होता. डॉक्टर भाटियांचा सर्व दिवस मानसिक रोगाची तपासणी व चिकित्सा करण्याच्या गडबडीत जाई. त्यानतर मात्र आपल्या बगल्याच्या गच्चीवर आरामखुर्चीवर बसून पाईप ओढीत आपल्या मित्रमंडळीशी गप्पागोष्टी करणे त्यांना फार आवडे. ही त्यांची सवय ओळखूनच रात्रीचे अकरा वाजून गेलेले असूनही इन्स्पेक्टर प्रधानानी त्यांना फोन केला.

"डॉक्टर, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतो आहे. तुमच्या हॉस्पिटलमध्ये एका पेशंटला जागा आहे का ?"

"कुणासाठी हवी आहे ?" डॉक्टरांनी विचारले.

' मला स्वतःलाच तुमचा पेशंट व्हावसं वाटू लागलं आहे. सध्या माझ्याकडे अशा काही विचित्र गुन्ह्याचे तपासकाम आल आहे की माझच डोकंबिक फिरेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. "

"असे ? मग आताच या ना ! दिवसा तुम्ही माझेकडे तपासून घ्यायला आलात तर लोकाचा तुमच्यावरचा विश्वास उडायचा."

इन्स्पेक्टर प्रधानानी हसून फोन बंद केला व तावडतोब जीप घेऊन ते निघाले. डॉक्टर भाटिया अपेक्षेप्रमाणेच आरामखुर्चीवर विश्राती घेत होते त्यानी इन्स्पेक्टर प्रधानाचे स्वागत करून त्याना जवळच्या खुर्चीवर बसण्यास सागितले.

"बोला आता मिस्टर प्रधान, तुम्हाला अलीकडे कशाची स्वप्ने पडतात ?"

"स्वप्ने ?" इन्स्पेक्टर प्रधानानी आश्चर्याने विचारले.

"अहो, रोग्याच्या स्वप्नावरूनच आम्ही त्याच्या रोगाचे निदान करतो ना ?"

"छान. पण डॉक्टर स्वप्न पडायला प्रथम झोप यायला पाहिजे ना ? गावात हे तीन खून झाल्यानंतर माझी तर झोपच उडाली आहे.

"पक्के वस्ताद आहात !" डॉक्टर भाटिया आपल्या छोट्या पण ऐटबाज दाढीला कुरवाळीत म्हणाले, " तुमची झोप उडवणारी ही वल्ली आहे तरी कोण ?"

"ती कोण हे तर मला शोधून काढायचे आहे पण ती कशी भयंकर आहे हे मात्र चांगलेच समजून गेले आहे." अशी सुरुवात करून इन्स्पेक्टर प्रधानानी डॉक्टर भाटियांना गावात झालेल्या रहस्यमय तीन खुनांची व त्याच्या तपासकामात आता-पर्यंत अपयशच कसे मिळाले याची सविस्तर हकीकत सांगितली.

डॉक्टर भाटिया ध्यानपूर्वक ती ऐकत होते. ते म्हणाले, "आम्हा मानसशास्त्र-ज्ञांच्या दृष्टीने खून का झाला हे समजणे फार महत्त्वाचे आहे. कारण खून का झाला हे कळलं तर तो कुणी केला याचं अनुमान सुलभतेने काढता येते."

"डॉक्टर, या खुनामागचं सर्वात मोठ रहस्य तेच आहे. हत्या झालेल्या तिन्ही व्यक्ती सालस होत्या. त्याचं कुणाशी वैर नव्हतं. कुणाला त्यांचा मत्सर नव्हता-खून झाला त्यावेळी त्याचे अंगावर मोठी रक्कम नव्हती किंवा काही भारी चीज-वस्तूही नव्हती. अशा परिस्थितीत एवढ्या त्वेषाने व निर्दयतेने त्याचा खून का करावा ?'

"हे पहा मिस्टर प्रधान, पैशासाठी खून, बाईसाठी खून ही नेहमीची परिचित कारणे असली तरी अनेक वेळा अगदी लहान लहान कारणासाठी देखील मनुष्य खून करायला तयार होतो. या घटनामागे असंच काही बाह्यतः क्षुल्लक कारण दडलेलं असावं. तुम्ही मला या तिन्ही घटनातल्या समान अशा गोष्टीचा तपशील देऊ शकाल का ?"

"तिन्ही गुन्हे सार्वजनिक रस्त्यावर झाले. तिन्ही गुन्हे रात्री नऊ दहा वाज-ण्याच्या सुमारास झाले. तिन्ही गुन्ह्यात गुन्हेगाराने फास टाकून गळा आवळून खून केलेला आहे तिन्हीतील बळी व्यक्ती पुरुष आहे..."

डॉक्टर भाटिया तपशील ऐकत होते पण त्याचे समाधान झाल्यासारखं दिसलं नाही. "आणखी काही..." त्यानी विचारले.

इन्स्पेक्टर प्रधान आठवू लागले महत्त्वाचे सर्व मुद्दे तर सांगून झाले होते. ते म्हणाले, "आणखी दोन छोट्या गोष्टी आहेत. हे गुन्हे घडले त्या तिन्ही रात्री पौर्णिमेच्या होत्या अन् सहज म्हणा का योगायोगाने म्हणा, हल्ला झालेल्या त्या प्रत्येक अभागी व्यक्तीच्या हातात पिवळे गुलाबाचे फूल असावे. कारण गुन्ह्याच्या जागी प्रेताभोवती पिवळ्या गुलाबाच्या पाकळ्या विखुरलेल्या आढळल्या."

डॉक्टर भाटियाचे डोळे मनात कुठेतरी प्रकाश पडल्यासारखे चमकले. ते म्हणाले, ' मिस्टर प्रधान, कोणतीही गोष्ट छोटी मोठी ही माणसाच्या भावनेमुळे होते. अशा अनेक क्षुल्लक गोष्टी असतात व त्याचे व्यक्तिगत भावनात्मक मूल्य विशेष असेल. आता मी ओढतो आहे हा पाईपच बघाना ! इतराना वाटेल इतर पाईप-सारखा हा पाईप. पण मला तो तसा नाही. माझ्या एका इंग्लिश डॉक्टर मित्राने प्रेमाची भेट म्हणून तो मला दिला. तो माझा जिवलग दोस्त होता. युद्धकालात तो लंडनला असताना जर्मन विमानाच्या बॉंब हल्ल्यात तो बिचारा ठार झाला.

त्याची आठवण म्हणून मी हा पाईप जिवापाड जतन करतो. कारण त्याच्याबद्दल माझ्या जिव्हाळ्याच्या भावना आहेत. मला वाटतं, पौर्णिमेचं चादणं, पिवळे गुलाबाचे फूल या साध्या गोष्टी हल्ला करणाऱ्याच्या दृष्टीने काही विशेष भावनेच्या असतील. मला तरी या घटनातून एवढेच अनुमान काढता येईल."

इन्स्पेक्टर प्रधान हनुवटीखाली हाताचा तळवा ठेऊन विचारपूर्वक डॉक्टरांचे मत ऐकत होते. ते म्हणाले, "डॉक्टर, चादणे, गुलाबाचे फूल अशापासून कवीला एखादे प्रेमकाव्य स्फुरायच अन् तुम्ही मात्र मला त्याच्या मदतीने खुनी शोधायला सागता आहात. ठीक आहे, प्रयत्न करून पहातो."

त्यानतरचे इन्स्पेक्टर प्रधानाचे तीन दिवस ऑफीसमधील जुन्या रेकॉर्डसच्या अभ्यासात गेले. चवथ्या दिवशी त्यानी परत डॉक्टर भाटियाची गाठ घेतली व म्हटले, "डॉक्टर, मला एक कल्पना सुचते आहे पण त्यासाठी मला तुमचीच मदत हवी आहे."

"मी तुम्हाला काय मदत करणार?"

"तुमच्या नव्या हॉस्पिटलची इमारत तयार झाली आहे तिचं उद्घाटन अजून व्हायचच आहे. मला एवढच सुचवायच आहे की ते उद्घाटन आपण या पौर्णिमेलाच करावे. तुमच्या डॉक्टर स्नेह्याना बोलवायच काम तुमचं. पण बाकीच्या निमत्रिताची यादी मी करणार अन् समारभ सध्याकाळी ठेवावा..."

तुमच म्हणण माझ्या लक्षात येत नाही." डॉक्टर भाटिया काहीसे गोधळून जाऊन म्हणाले, परतु इन्स्पेक्टर प्रधानानी जेव्हा त्याची योजना समजाऊन सागितली तेव्हा त्यानी खुशीने रुकार दिला.

इन्स्पेक्टर प्रधानानी पोलीस ठाण्यावर जाताच हवालदार जाधवला बोलावले. ते म्हणाले, "जाधव, डॉक्टर भाटियाच्या नव्या हॉस्पिटलचे उद्घाटन येत्या पौर्णिमेला होणार आहे त्यासाठी निमंत्रिताच्या याद्या करायला हव्या." प्रथम हवालदार जाधव इन्स्पेक्टर प्रधानाकडे पहातच राहिला आणि मग स्वत.ला सावरून त्याच्या सूचनाप्रमाणे कामाला लागला. इन्स्पेक्टर प्रधानाचीही नेटाने कामास सुरुवात झाली.

दिवसामागून दिवस गेले. इन्स्पेक्टर प्रधान ज्या दिवसाची किंवा खरं म्हणजे ज्या रात्रीची सचित उत्सुकतेने वाट पहात होते, ती रात्र आली. रात्रीचे आठ वाजून गेले होते. डॉक्टर भाटियाच्या नव्या हॉस्पिटलचा उद्घाटन समारंभ थाटाने व धामधुमीने साजरा होत होता. गावातील निमत्रित स्त्री-पुरुषानी हॉस्पिटलचा हॉल भरून गेला होता. गावातील प्रतिष्ठित व्यापारी, सरकारी अधिकारी, डॉक्टर, अध्यापक व वकील याचे जणू एक छोटेसे समेलनच होते. डॉक्टर भाटिया जातीने प्रत्येकाचे स्वागत करीत होते. नेहमी कामाची सबब सागून असले समारभ टाळणारे इन्स्पेक्टर प्रधान आज सर्वांच्या आधी उपस्थित होते. त्याचे अगावर

नेहमी असणारा खाकी युनिफॉर्म आज नाहीसा झाला होता. त्यांनी एक करड्या रंगाचा सूट चढवला होता व बटनहोलमध्ये पिवळेजर्द टप्पोरे असे एक पिवळ्या गुलाबाचे फूल मोठ्या ऐटीने लावले होते. उपस्थित मंडळींना उभ्या उभ्याच फराळाच्या बशा व कोल्ड्रींक्स देण्यात आली. इन्स्पेक्टर प्रधान प्रत्येकाजवळ जाऊन गप्पागोष्टी व हास्यविनोद करीत होते. हळूहळू निमंत्रित डॉक्टर भाटिया-जवळ शुभेच्छा व्यक्त करून पांगू लागली. रात्रीचे साडेनऊ वाजून गेले. हॉलमध्ये आत फक्त इन्स्पेक्टर प्रधान व डॉक्टर भाटिया एवढेच राहिले. डॉक्टरांचे नोकर आवराआवरी करीत होते. डॉक्टर भाटियांचा चेहरा गंभीर व काहीसा उदास झाला होता. दोघेही बोलत बोलत बंगल्याच्या पोर्चपाशी आले. डॉक्टर भाटियांनी इन्स्पेक्टर प्रधानांचा हात हातात घेऊन तो दाबीत काहीशा रुद्ध स्वरात ते म्हणाले, " गुड नाइट मिस्टर प्रधान अँड गुड लक. "

इन्स्पेक्टर प्रधान बाहेर पडले. बाहेर सर्वत्र पौर्णिमेचे टिपूर चांदणं पडलं होतं. ते त्या निर्जन रस्त्याने धीमेधीमे चालू लागले. सुमारे एक फर्लांगावर दोन वृक्ष होते. त्यांच्या दाट छाया रस्त्यावर पडल्या होत्या व तेथून रस्ता वळत होता. इन्स्पेक्टर प्रधान त्या सावल्यांमधून बाहेर आले व तेथून वळत होते तोच...

आपल्यामागे कुणी झपाट्याने चालत असल्याचा पावलांचा आवाज त्यांना ऐकू आला. त्यांनी मान वळवून बघण्याचा प्रयत्न केला. याचक्षणी एक सावली त्यांचे अंगावर पडली व एक मऊ फास वेगाने त्यांच्या गळ्याभोवती पडला. इन्स्पेक्टर सावधान असूनही त्याना क्षणभर काय घडते आहे हे समजले नाही, पण फास आवळला जात आहे हे लक्षात येताच त्यांनी चपळाईनं आपला उजवा हात गळ्यास खेटून त्या फासाच्या आतून घातला. त्यामुळे त्या आवळल्या जाणाऱ्या



फासाचा गळ्यावरील दाब काहीसा कमी झाला. डाव्या हाताचे मुठीने त्यांनी त्या अज्ञात व्यक्तीचे मस्तकावर सर्व शक्ती एकवटून ठोसा मारला. ती व्यक्ती किंचित् मागे सरकली. त्याचा फायदा घेऊन इन्स्पेक्टर प्रधानानी डाव्या हाताने खिशातून शिट्टी काढून ती शक्य त्या जोराने फुंकली. ताबडतोब पूर्व योजनेनुसार दडून बसलेला हवालदार जाधव धावत आला, व त्याने त्या व्यक्तीच्या कमरेला घट्ट मिठी मारली. त्या व्यक्तीच्या अंगी जणू रेड्याचे बळ संचारले होते. इन्स्पेक्टर प्रधान व हवालदार जाधव या दोघानाही तो आवरत नव्हता. मोठ्या कष्टाने त्यास ओढत फरफटत डॉक्टर भाटियाच्या हॉस्पिटल इमारतीच्या पोर्चमध्ये आणले. डॉक्टर भाटिया सचिंतपणे वाट पहात उभेच होते. पोर्चमधील दिवा लावला गेला. दिव्याच्या प्रकाशात त्या व्यक्तीचा चेहरा दिसताच इन्स्पेक्टर प्रधान आश्चर्याने ओरडले " कोण ? अध्यापक तिवारी ?"

पण अध्यापक तिवारीच्या डोळ्यांची बुबुळे गरगर फिरत होती. त्यांना भोवतालची शुद्ध नव्हती. ते कुणाला ओळखत नव्हते. त्यांच्या डोळ्यात कालप्रवाह पाच वर्षे मागे सरकला होता...त्याच कालातली दृश्ये एका मागून एक त्यांच्या डोळ्यासमोरून सरकत होती...तरळत होती.

'मी अनिल विश्वास.. कानपूरच्या विद्याधर कॉलेजचा अध्यापक...माझी लाडकी अन् सुंदर पत्नी कमल...आमचा त्या छोट्याशा बंगल्यात थाटलेला सुखी संसार...त्यावर कुणा दुष्टाची सावली पडली...कमल.. कमल ! तू कशी इतकी बदललीस ! तुझी प्रेमळ दृष्टी आता निस्तेज व भावनाशून्य झाली आहे तू माझ्या प्रेमाला साद देऊ शकत नाहीस. कशाने हा बदल झाला ? तुझा लग्नपूर्वीचा मित्र शर्मा हा तर त्याचे कारण नाहीना ? त्याची कानपूरलाच बदली झाली...त्याच्या आपल्या घरी फेऱ्या सुरू झाल्या. मी असताना पण पुष्कळदा मी नसताना. तो आला की कमलची कळी खुलते...माझं मन दुष्ट...सशयी बनल का कमलच माझ्याशी पुरती बेईमान झाली पण मी हे सहन करणार नाही. माझा सशय...मला पडताळा पाहिला पाहिजे. आजचा दिवस कसोटीचा. मी पाटण्याला कामासाठी जातो आहे, असे सागून बाहेर पडलो अन् स्टेशनवरच थांबलो. रात्र झाली..मी माझे स्वत चे घरासमोर एखाद्या चोरासारखा लपून बसलो आहे...स्वत चे घरावर पाळत...माझा नुसता सशय ?...नाही...नाही. तो शर्मा आला...घराच्या मालकाच्या रुबाबात गेट उघडून आत शिरतो आहे. ओहो ! जिच्यावर मी माझा जीव ओवाळून टाकत होतो ती कमला त्याच स्वागत करते आहे अन् त्याला आमच्या शयनगृहाकडे घेऊन जात आहे. खिडकीचे पडदे उजेडाने झगमगत आहेत. त्यावर दोन सावल्या परस्पराच्या आलिंगनात स्थिर झालेल्या आहेत....आग...आग...माझ्या मस्तकात रक्त चढत आहे की काही दाहक स्फोटक प्रवाह ? मी किती वेळ पुतळ्यासारखा उभा आहे कुणास ठाऊक ! कमल व शर्मा बोलत बोलत गेटपाशी आले आहेत. शर्मा

म्हणत आहे, ' कमल, काय सुंदर पौर्णिमेचं चांदणं पडलं आहे. चल. आपण फिरून येऊ ' कमल हसत म्हणते आहे, " तेवढ भाग्य माझ नाही. देवानं कृपा केली तर मग हक्कानं येईन तुमच्याबरोबर. आता मात्र फक्त एवढेच देते माझी आठवण राहावी म्हणून " कमलने गेटजवळच डवरलेल्या माझ्या पिवळ्या गुलाबाच्या झाडावरच फूल खुडून त्या शर्माच्या कोटाच्या बटनहोलमध्ये लावले...शर्मा बाहेर पडतो आहे, त्या फुलाचा वास घेत चालला आहे...आग, आग होते आहे माझ्या अंगाची. माझे पाय त्याच्या मागे धावले...माझे हातानी माझ्या खांद्यावरचा रेशमी स्कार्फ त्याच्या गळ्याभोवती टाकला अन् त्याचा गळा आवळला...जोराने-आणखी जोराने...अहाहा ! त्या दुष्टाच्या नरड्यातून बकरीसारखा चित्कार मी ऐकला... मग शात शात झाले..."

अमानूष शक्तीने धडपडणाऱ्या अध्यापक तिवारीना एकदम ग्लानी आल्यासारखी झाली. त्याचे डोळे मिटले. इन्स्पेक्टर प्रधानानी जाधवला खूण केली व त्या दोघांनी अध्यापक तिवारीना एका आरामखुर्चीत अलगदपणे ठेवले. नतर इन्सपेक्टर प्रधान डॉक्टर भाटियाकडे वळून म्हणाले, " डॉक्टर हाच तो आपल्या गावातला भयकर खुनी...कानपूरचा. अनिल विश्वास !"

" पण मला समजत नाही मिस्टर प्रधान हे तुम्हाला कस समजलं ?"

" तुम्ही त्या दिवशी मला सागितलत की पौर्णिमेचे चादणे अन् गुलाबाचं पिवळ फूल याच्या मागेच काही भावनात्मक अर्थ असेल. तेव्हाच मी आमच्या रेकॉर्डवरच्या जुन्या केसेसचा यादृष्टीने अभ्यास करायच ठरवल. पौर्णिमेची रात्र जवळ जवळ येत होती. त्यासाठी मला घाई करण आवश्यक होत. मी हिंदुस्थानातल्या सर्व राज्यातून रिपोर्ट झालेल्या केसेस् वाचून पाहिल्या. त्यात पौर्णिमेच्या रात्रीच खून झालेल्या अशाही काही होत्या. पण पाच वर्षांपूर्वीच्या एकाच केसची हकीगत आपल्या गावातील गुन्ह्याशी विशेष जुळती होती. त्यात अनिल विश्वास. या सुशिक्षित इसमाने आपल्या पत्नीशी प्रेमसबध ठेवणाऱ्या शर्माचा भर रस्त्यावर पौर्णिमेच्या रात्रीच गळफास टाकून खून केला होता. मी कानपूरच्या पोलिस अधिकाऱ्याबरोबर फोनवर बोलण केल तेव्हा आणखी एक आश्चर्यजनक साम्य मिळाले. ते म्हणजे शर्माच्या प्रेताभोवती पिवळ्या गुलाबाच्या पाकळ्या मिळाल्या होत्या. या विश्वासला अटक करून त्यावर खटला भरण्यात आला होता व त्याने भावनेच्या भरात खून केला म्हणून त्यास फक्त चार वर्षे कैदेची शिक्षा देण्यात आली. जेलमध्ये त्याला पौर्णिमेच्या रात्री वेडाचा झटका येई व तो दिसेल त्यावर हल्ला करू पाही. अनावर होई. त्याला मेंटल हॉस्पिटलमध्ये पाठवले गेले. त्यावर उपचार केले गेले व तो बरा झाला असं वाटल्यावर त्याला सोडून देण्यात आले. त्यानतर तो कानपूरहून नाहीसाच झाला..." इन्सपेक्टर प्रधान मध्येच थांबले. शातपणे झोपलेल्या अध्यापक तिवारीकडे पाहात पुन्हा बोलू लागले " मला पक्का

संशय आला की हाच विश्वास कदाचित आमचे गावी असेल अन् दुसऱ्या नावाने वावरत असेल. त्यालाच पुन्हा पौर्णिमेच्या रात्री हे वेडाचे झटके पुन्हा सुरू झाले असतील. पण ही शका येऊनही त्याला या चार लाखांच्या गावात शोधून काढणे व तेही पौर्णिमेच्या रात्रीचा बळी पडण्याच्या आत, हे काम अवघडच होते. मग माझ्या लक्षात आणखी एक गोष्ट आली. पहिले तीन खून कुठल्या ना कुठल्या समारंभा-नंतरच झाले. तेव्हा खुनी या निमत्रितापैकीच असणे सभवनीय होते. म्हणून डॉक्टर, आपल्याला मी आजचा समारभ ठरवायची विनती केली आणि निमत्रित म्हणून जे जे पूर्वीच्या समारभाना हजर होते त्या सर्वांना बोलावले. बळी म्हणून मीच जायचे ठरवले..."

"शाब्बास मिस्टर प्रधान, खरी बहादूरी गाजवलीत. मला फार फार काळजी वाटत होती..."


"पण डॉक्टर" इन्सपेक्टर प्रधान म्हणाले, "मला हे समजत नाही की विश्वासने आपल्या पत्नीच्या प्रियकराचा पाच वर्षांपूर्वीच खून करून पुरता सूड घेतलाच होता. आता वेडाच्या लहरीत का होईना तो निरपराध लोकाचे प्राण इतक्या त्वेषाने का घेतो ?"

"मिस्टर प्रधान, याचा हल्ला हा मोहिते दुकानदारावर, मालशे वकिलावर अगर दातार मास्तरांवर नाहीच. पौर्णिमेच चांदण व गुलाबाचे पिवळे फूल यांचं एकत्र दर्शन होताच याच्या मेंदूत जणू एक स्फोटक मिक्स्चर तयार होते. ते त्याला पाच वर्षे मागे ओढून नेते. त्याला दृश्य होतो तो त्याच्या पत्नीचं प्रेम हिरावून नेणारा शर्मा अन् मग संतापाने बेभान होऊन त्याचा पुन्हा पुन्हा खून करतो अन् खून होताच पुन्हा..."

डॉक्टर भाटिया आणखी काही बोलणार होते, पण आरामखुर्चीवर पहुडलेल्या अध्यापक तिवारीने काही हालचाल केली म्हणून ते थांबले. अध्यापक तिवारीनी डोळे उघडले व आश्चर्याने इकडे तिकडे पाहिले. डॉक्टर भाटियांना पहाताच त्याना काही स्मरून ते म्हणाले, "हॅलो डॉक्टर पार्टी संपली वाटतं ? सर्वजणं गेल्या-सारखे दिसताहेत. मला या खुर्चीवर बसल्या बसल्याच डोळा लागलेला दिसतोय ? सॉरी हं डॉक्टर. तुम्हाला काय वाटेल ?"

"दुसरं काय वाटणार ?" डॉक्टर भाटिया त्याच्या नेहमीच्या मिष्किल स्वरात म्हणाले, "माझ्या नव्या हॉस्पिटलला पहिला पेशंट मिळाला एवढंच !"

# पराजित – अपराजित



**लेखांक : दहा** **वि. स. वाळिंबे**

फ्रान्सला या काळात राजकीय गोंधळाने झपाटून टाकले होते.

मंत्रिमंडळे स्थापन होणे आणि ती गडगडणे हा फ्रेंच राजकारणाचा स्थायीभाव झाला होता. एखाद्या मंत्रिमंडळाने वर्षभर तग धरली तरी त्याने स्वतःच्या नशीबावर खूष व्हावे इतकी फ्रान्सची संसदीय लोकशाही खिळखिळी झाली होती. पहिले मंत्रिमंडळ का कोसळले आणि दुसरे अधिकारावर का आले यामागचा कार्यकारणभाव शोधूनही सापडण्यासारखा नव्हता. या सत्तात्मक राजकारणाला वैचारिक अधिष्ठान नव्हते, तात्त्विक निष्ठांचे पाठबळ नव्हते. जे काही असायचे ते उघडउघड सौदेबाजीच्या स्वरूपाचे. शेअर–बाजारात एखाद्या शेअरचा भाव आज वधारावा आणि उद्या गडगडावा इतक्या सहजतेने मंत्रिमंडळे येत होती, जात होती. संसद-भवनाच्या मधल्या प्रशस्त सभागृहात लोकप्रतिनिधींचे घोळके जमायचे आणि त्यातून हे राजकारण रंगायचे.

तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या जन्मापासूनच हे गोंधळी राजकारण फोफावले होते.

१८७१ मध्ये बोर्दो येथे तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या पहिल्या संसदेची बैठक भरली आणि १८७९ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या आठ-नऊ वर्षांच्या काळामध्ये बारा मंत्रिमंडळे अधिकारावर आली आणि कोसळली. त्यामुळे जॅक ओले-लाप्रुन या नामवंत फ्रेंच इतिहासकाराने प्रजासत्ताकाच्या बाल्य-काळाचे 'कमालीच्या गोंधळाचा काळ' असे वर्णन केलेले आहे. ही परंपरा अखेरपर्यंत कायम होती. १८७१ पासून पहिले महायुद्ध सुरू होईपर्यंतच्या चव्वेचाळीस वर्षांमध्ये फ्रेंच जनतेने पन्नास मंत्रिमंडळाचे उदयास्त पाहिले. म्हणजे एका मंत्रिमंडळाचे सरासरी आयुष्य एका वर्षापेक्षा देखील कमीच भरते. पहिल्या महायुद्धानंतर युरोपमधील परिस्थिती बरीच बदलली. तरीदेखील फ्रान्सने आपला हा अस्थिर राजकारणाचा वारसा मुळीच सोडला नाही. उलट अधिक अट्टाहासाने तो जपला, अशीच इतिहासाची साक्ष आहे. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीपासून दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंतच्या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये मंत्रिमंडळे कोसळण्याचे प्रमाण दुपटीने वाढले. या काळातल्या मंत्रिमंडळांचे सरासरी आयुष्य सहा महिन्यावर आले होते.

त्यामानाने एकोणिसाव्या शतकाचे अखेरचे दशक बरेच स्थिर म्हटले पाहिजे. त्याला मुख्य कारण म्हणजे ड्रेफ्यू-प्रकरण. प्रजासत्ताकवाद्यांमधील डावे आणि उजवे असे दोन्ही गट ज्यूविरोधी असल्यामुळे, ड्रेफ्यु-प्रकरण ऐन भराला आलेले असताना, काही काळ मंत्रिमंडळे घडविण्याचे आणि कोसळविण्याचे राजकारण थंडावले होते. त्या काळात वाल्डेक-रुसो, कोम्बे आणि क्लेमेन्सो या तिघांची मंत्रिमंडळे नऊ वर्षे टिकली हे तिघेही प्रधानमंत्री कणखर स्वभावाचे होते आणि त्यामुळे सिनेट आणि प्रतिनिधिसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहावर त्यांचे वर्चस्व होते. बस्स, हा एवढा कालखंड सोडला की इतर वेळी फ्रेंच राजकारण आपल्या नेहमीच्या पातळीपेक्षा कधीच वर गेले नाही.

एकीकडे फ्रान्सच्या शेजारचे देश पहिल्या जागतिक महायुद्धाच्या रोखाने झपाट्याने वाटचाल करीत होते आणि इकडे फ्रान्सला त्याची शुद्धही नव्हती. सरकारचा दबदबा वाटावा अशी तेथे परिस्थिती कधी निर्माणच झालेली नव्हती. मोठमोठे नेतेही सत्ता-केंद्राभोवती घोटाळत होते.

१९०९ च्या जुलैमध्ये क्लेमेन्सोचे सरकार गडगडले आणि तेव्हापासून पुढच्या पांच महत्त्वपूर्ण वर्षांमध्ये संभाव्य महायुद्धाच्या दृष्टीने तयारी करण्याऐवजी फ्रान्समधील राजकारणी मंडळी देशाला न परवडणारा मंत्रिमंडळाच्या उलथापालथीचा खेळ खेळण्यात मश्गुल झाली होती. बरे, ही मंत्रिमंडळे काही गंभीर स्वरूपाच्या मतभेदांपायी कोसळत होती अशातलाही भाग नाही. प्रस्थापित मंत्रिमंडळाविरुद्ध नाराजीची लहानशी लाट आली तरीदेखील तिचा तडाखा सरकारला एवढा जाणवायचा की लगेच ते राजीनामा देऊन मोकळे व्हायचे.

आपण निवडून दिलेले प्रतिनिधी किती बेजबाबदारपणे वागत आहेत हे पाहून

लोकांना विस्मय वाटायचा. परंतु त्याच्या सतापानेही कधी मर्यादा ओलांडली नाहीं. जाणकार लोक या असल्या संसदीय लोकशाहीच्या पोरखेळाबद्दल कुचेष्टेने बोलायचे हे खरे. त्याचा परिणाम एवढाच झाला की सर्वसामान्य जनतेच्या मनात या लोकसत्ताक राजवटीसंबंधी आपुलकी निर्माण झाली नाही. लोकांच्या या औदासीन्याची तिसऱ्या प्रजासत्ताकाला पुढे बरीच किंमत मोजावी लागली. परंतु त्यावेळी तरी जे काही घडत होते त्याची दखल घ्यायची लोकप्रतिनिधींना गरज भासली नाही. मुलांनी जितक्या सहजतेने खोखोचा खेळ खेळावा तितक्या बालिश रीतीने फ्रेंच लोकप्रतिनिधी पाचसहा महिने झाले की त्यावेळी अस्तित्वात असलेले मंत्रिमंडळ खाली खेचायचे आणि आपल्या पाठिंब्याची शिडी लावून दुसऱ्या कोणाला तरी त्या जागी बसवायचे.

आपल्या या बेताल वर्तनाचे देशाच्या भवितव्यावर किती अनिष्ट परिणाम होत आहेत याचे राजकारणी मंडळींना भान नसले तरी प्रत्यक्षात त्याचा अतिशय विपरित परिणाम घडत होता. या तिसऱ्या प्रजासत्ताकाला म्हणावी तशी बळकटी कधीच आली नाही आणि त्यामुळेच या प्रजासत्ताकाचा काही वर्षांच्या आतच लाजिरवाणा अंत झाला.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जागतिक राजकारण गुतागुतीचे होत चालले होते अशा वेळी आपल्या राष्ट्रीय हिताची कटाक्षाने जपणूक करणारे धोरण आखण्याची आणि जिद्दीने ते कार्यवाहीत आणण्याची फ्रान्सला निकड जाणवत होती, परंतु ही निकड पुरी करण्यासाठी सरकारला स्थैर्य लाभावे लागते. फ्रान्समध्ये नेमका याच गोष्टीचा अभाव होता. आपण कितीकाळ अधिकारपदावर राहणार आहोत याची कोणत्याच प्रधानमंत्र्याला शाश्वती वाटत नव्हती. त्यामुळे आर्थिक, औद्योगिक वा संरक्षणविषयक प्रश्नाबाबत दीर्घकालिन कार्यक्रम निश्चित करण्याची उत्सुकता कोणताच प्रधानमंत्री दाखवीत नसे. 'गेला तो दिवस आपला, उद्या काय होईल कुणास ठाऊक' अशी आपल्या मनाची समजूत घालत तो राज्यकारभाराची धुरा सांभाळत असे. आज मामुली वाटणारा प्रश्न उद्या गंभीर स्वरूप धारण करणार आहे याचा जरी एखाद्या प्रधानमंत्र्याला अंदाज आला तरी तो सोडविण्याची पाळी आपल्यानंतर येणाऱ्या प्रधानमंत्र्यावर येणार असल्यामुळे आज आपण त्याची काळजी कशाला करावी असा सोयीस्कर विचार करून तो दैनंदिन कामकाजावरच आपले लक्ष केंद्रित करी.

जोपर्यंत जमेल तोपर्यंत हे अधिकारपद उपभोगायचे अशी प्रधानमंत्र्याची बेफिकीर वृत्ती असल्यानंतर देशाच्या ढासळत्या आर्थिक परिस्थितीकडे सरकारचे सर्वस्वी दुर्लक्ष झाले. जर्मनीसारखा शेजारचा देश ठिकठिकाणी नवनव्या उद्योगधंद्यांचे जाळे उभारीत असताना, फ्रान्सचे कृषिप्रधान स्वरूप फारसे पालटले नाही ते या उदासीन वृत्तीपायीच.

देशाला भेडसावणाऱ्या समस्यापेक्षा आपण जास्तीत जास्त दिवस मंत्रिपदावर कसे राहू याचीच प्रधानमंत्री काळजी करीत असायचा. हे साध्य करायचा मार्ग सोपा होता. कोणत्याच मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नाला हात घातला नाही की कोणाला दुखविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्यामुळे प्रधानमंत्री निष्क्रिय झाले होते.

आणखी एक गंमतीची गोष्ट अशी की आपल्या स्थानाची काळजी मुख्यतः फक्त प्रधानमंत्र्यालाच करावी लागे. इतर मंत्री त्या मानाने सुरक्षित होते. प्रधानमंत्री बदलला तरी बरेचसे जुने मंत्री नव्या मंत्रिमंडळातही कायम असत. यासंबंधीचा एक किस्सा सागण्यासारखा आहे अनेक मंत्रिमंडळे सत्ताभ्रष्ट करायला क्लेमेन्सो कारणीभूत आहे अशी एका संसद–सदस्याने तक्रार केली. ही तक्रार जेव्हा क्लेमेन्सोच्या कानावर गेली तेव्हा तो म्हणाला, " माझ्यापायी फक्त एकाच माणसाला सत्तास्थानापासून दूर व्हावं लागत असे. बाकीची सारी माणस होती तिथंच आहेत की ! "

मंत्रिमंडळे अस्थिर परंतु मंत्री मात्र कायम असे फ्रेंच राजकारणाचे त्या काळातील स्वरूप होते.

या बाबतीत आरिस्तिद ब्रिआँ याचा विक्रम उल्लेख करण्याजोगा आहे. १९०६ ते १९३२ या सव्वीस वर्षांच्या काळामध्ये जी पचवीस मंत्रिमंडळे येऊन गेली त्या प्रत्येक मंत्रिमंडळात ही स्वारी होतीच. तो अकरा वेळा प्रधानमंत्री होता, सतरा मंत्रिमंडळामध्ये तो परराष्ट्रमंत्री होता आणि उरलेल्या मंत्रिमंडळांमध्ये या ना त्या जागेवर होताच. ब्रिआँच्या खालोखाल आल्बर्त सारात आणि हेन्री क्वेई हे दोघेजण एकूण वीस मंत्रिमंडळामध्ये सत्ता उपभोगत होते. कामिय शोर्तां, एडवर्ड दलादिए आणि अनातोल द मोन्झिए या तिघा बहाद्दरानी सतरा मंत्रिमंडळामध्ये काम केले तर जॉर्ज बोन्ने हा तेरा मंत्रिमंडळाचा सदस्य होता

फ्रान्सच्या राजकारणामध्ये मंत्रिमंडळाचा हा असा बेबद गोंधळ माजला याचे मुख्य कारण म्हणजे लहान लहान पक्षाचा आणि गटाचा बुजबुजाट. त्यामुळे कोणत्याही एका पक्षाला कधी निर्विवाद बहुमत लाभू शकले नाही. ज्या पक्षाला जास्तीत जास्त जागा मिळायच्या त्या पक्षाचा नेता पाचसहा लहान पक्षांच्या कुबड्या घेऊन प्रधानमंत्रिपदाची खुर्ची गाठायचा. अशा रीतीने एकत्र आलेल्या पक्षांमध्ये वा गटामध्ये सत्तेतील भागीदारीचा समान स्वार्थाचा प्रश्न सोडला तर ध्येय–धोरणाबाबत कोणतीही एकवाक्यता नसायची. एक समाजवादी पक्ष सोडला तर ज्याला राष्ट्रीय पक्ष म्हणता येईल असा एकही पक्ष फ्रान्समध्ये अस्तित्वात नव्हता. इतर बरेचसे गट स्वतःला पक्ष म्हणवूनदेखील घेत नसत. ' आघाडी ', ' संयुक्त समिती,' ' राजकीय युती ' अशा नावानीच ते स्वतःला संबोधत असत. हे गट जी नावे घेत त्यांनाही तसा काहीच अर्थ नव्हता. प्रजासत्ताकवादी, लोकशाही-

वादी, उद्धारमुक्तवादी, प्रागतिक अशा कोणत्या ना कोणत्या तरी नावाचा टिळा लावून हे राजकीय फडकरी निवडणुकीच्या मचावर उभे रहात असत. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून पुढच्या चाळीस वर्षांपैकी बराचसा काळ सत्ता ज्या पक्षाच्या हातात होती तो रॅडिकल सोशॅलिस्ट पक्ष सामान्यत: नागर भागातील उच्च मध्यम-वर्गीयाचा होता. 'त्या पक्षाच्या ध्येयधोरणात 'रॅडिकल' ही काही नाही आणि 'सोशालिस्ट' ही काही नाही' अशी टीका राजकीय निरीक्षक करीत असत. 'हा पक्ष नसून फ्रेंच राजकारणातील ती एक मानसिक अवस्था आहे' असे या पक्षाचे वर्णन एका फ्रेंच इतिहासकाराने केलेले आहे.

हा रॅडिकल सोशॅलिस्ट पक्ष स्वत ला फ्रेंच राज्यक्रांतीचा वारसदार समजत होता. राजसत्तेला या पक्षाचा कडवा विरोध होता. धर्मसत्तेची अरेरावीही त्याला मजूर नव्हती. 'श्रीमंत आणि शक्तिशाली घटकाच्या अरेरावीखाली दबल्या गेलेल्या सर्व सामान्य माणसाचे आपण प्रतिनिधित्व करतो' असे या पक्षाचे नेते सागत असत. परतु डॉक्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार, व्यापारी, सधन शेतकरी याचाच या पक्षात भरणा होता. समाजात या लोकाचे वजन असल्यामुळे या पक्षाचे उमेद-वार निवडून येत. १९०६ च्या निवडणुकीत या पक्षाला प्रतिनिधिसभेमध्ये दोनशे सहा जागा मिळाल्या आणि तेव्हापासून फ्रान्समधला सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून तो ओळखला जाऊ लागला. परतु या पक्षाने, आपल्या कार्याचे क्षेत्र विस्तृत करावे किंवा समाजातील इतर घटक आपल्या सघटनेत दाखल व्हावेत असा कधी प्रयत्न केला नाही. काही प्रमुख शहरामध्ये या पक्षाचे वर्चस्व होते. त्यामुळे या पक्षाच्या वतीने निवडून येणारे सदस्य आपल्या प्रादेशिक वा स्थानिक प्रश्नाकडेच अधिक लक्ष देत असत. त्यामुळे एक सूत्रबद्ध राष्ट्रीय पक्ष असे स्वरूप, एवढी लोक-प्रियता लाभूनही, त्या पक्षाला कधी मिळू शकले नाही. तत्कालिन आर्थिक चौकटीमध्ये या पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांचे व्यवस्थित चालले होते. त्यामुळे औद्योगी-करणाची व समाजकल्याणविषयक नव्या कल्पनाची दखल घेण्याची या पक्षाला फारशी उत्सुकता वाटली नाही.

इतर लहान पक्षाचा तर पॅरिसबाहेरच्या जनतेशी सुतराम संबंध नव्हता. त्याना सैद्धान्तिक बैठक नव्हती, तात्त्विक आग्रह नव्हते आणि त्यामुळे पक्षशिस्तीबाबतही त्याचा आग्रह नसे. त्यामानाने समाजवादी पक्षाचे कार्य खूपच व्यापक होते ग्रामीण भागातील जनतेशी समाजवादी कार्यकर्ते समरस झाले होते. परंतु केवळ आपल्या एकट्याच्या बळावर राजकारणाला काही वेगळे वळण लावावे एवढी हिंमत या पक्षात नव्हती. म्हणजे, ज्यांच्या अंगात डावपेच करण्याची रग होती ते बेजबाबदार होते आणि ज्यांना काही करून दाखविण्याची कळकळ होती त्यांच्यात धडाडी नव्हती.

त्यातूनही फ्रेंच मतदार जागरूक असता तरीही या 'राजकारणी गोंधळा'ला त्याने थोडासा लगाम घातला असता. पण तो पडला कमालीचा व्यक्तित्ववादी. हे

एवढे पक्ष कशासाठी आहेत, ते नेमके कोणते कार्य करीत आहेत असा त्याला प्रश्न पडे. पण तेवढेच. त्याच्या पलीकडे त्याची मजल जात नसे. ज्याला जे जमेल ते त्याने करावे, आपण त्याची दखल घेण्याचे फारसे कारण नाही अशी त्याची मनोधारणा होती. ज्या पक्षाला तो आपले मत देई त्याचीदेखील फारशी चौकशी करण्याच्या भानगडीत तो कधी पडला नाही. आपण काय करतो, कसे वागतो याबद्दल आपले मतदार फारसे आग्रही नाहीत हे कळल्यामुळे, निवडून आलेले लोकप्रतिनिधी केवळ स्वतःच्या सोयी–गैरसोयीनुसार संसदेमध्ये सरकारच्या बाजूने वा विरोधी भूमिका घेत.

सुसंघटित राजकीय पक्षांचा अभाव हे जसे तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या अंगभूत दौर्बल्याचे एक कारण होते तसे आणखी एक कारण होते. घटनेप्रमाणे फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षाला भरपूर अधिकार आहेत. परंतु मॅकमॅहानपासून सगळे राष्ट्राध्यक्ष नामधारी सरकारप्रमुख झाले होते. त्यामुळे प्रतिनिधिसभेच्या हाती सर्व सत्ता एकवटली होती. मंत्रिमंडळ सर्वस्वी प्रतिनिधिसभेच्या मेहेरबानीवर अवलंबून असल्यामुळे कोणाला प्रधानमंत्री करायचे आणि कोणाला तेथून हुसकायचे याचा निर्णय प्रतिनिधिसभेचे सदस्य करीत असत.

गटबाजीचे राजकारण फ्रान्सला खिळखिळे करीत होते ते हे असे.

आणि तरीही तिसऱ्या प्रजासत्ताकाची वाटचाल निर्वेध सुरू होती. हे असे घडायला मुख्यतः तीन कारणे होती. एक म्हणजे फ्रेंच नागरिकाचा अलिप्ततावादी स्वभाव, दुसरे म्हणजे मंत्रिमंडळाचे नसले तरी बऱ्याच मंत्र्याचे सातत्य आणि तिसरे हे की सनदी नोकरशाहीची परंपरा. राज्यक्रांतीच्या पूर्वीपासून जी नोकरशाही फ्रान्सचा कारभार पहात होती तिच्या स्वरूपामध्ये प्रजासत्ताक अस्तित्वात आल्यानंतरदेखील काहीही बदल झालेला नव्हता.

दैनंदिन राजकारणामध्ये या नोकरशाहीला रस नसल्यामुळे ती या मंत्रिमंडळांच्या उलथापालथीमध्ये भाग घेत नसे. परंतु स्टाव्हिस्की-प्रकरणासारख्या भ्रष्टाचारापासून मात्र ही नोकरशाही अलिप्त होती असे नव्हे. ही नोकरशाही उपक्रमशीलही नव्हती. शासन-यंत्रणेसंबंधी किंवा नागरिकांच्या अधिकारासंबंधी ज्या नवीन कल्पना प्रसृत होत होत्या त्यांच्याकडेही फ्रेंच नोकरशाहीने फारसे कधी लक्ष दिले नाही. साहजिकच आपण आणि शासनसंस्था यांच्यामध्ये बरेच अंतर आहे अशी भावना जनसामान्यांच्या मनामध्ये दृढमूल होत गेली.

या लोकभावनेचा फायदा घेऊन रॅडिकल-सोशॅलिस्ट पक्षासारख्या मध्यममार्गी पक्षाचे वर्चस्व उधळून लावावे आणि हे प्रजासत्ताक आपल्या नियंत्रणाखाली आणावे या दृष्टीने 'क्रुआ द फ'सारखे फॅसिस्ट आणि 'फ्रंट पॉप्युलर'सारखे कम्युनिस्ट

गट सतत कार्यरत होते. या दोन परस्परविरोधी गटांच्या हंगामी युतीतूनच ६ फेब्रुवारी १९३४ चे निदर्शन जन्म पावले होते.

या निदर्शनाला घाबरून दलादिएने प्रधानमंत्रिपदाचे त्यागपत्र दिल्यानंतर त्याची जागा दूमेर्ग याने घेतली. मन्त्रिमंडळांचे वारंवार होणारे उदयास्त हेच प्रजासत्ताकाच्या दौर्बल्याला कारणीभूत आहेत हे दूमेर्गने ओळखले आणि हे असे घडू नये यासाठी राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करायला हवी असे त्याने ठरविले. फ्रान्सच्या घटनेप्रमाणे प्रतिनिधिसभा विसर्जित करण्यापूर्वी सिनेटची मंजुरी घेण्याचे राष्ट्राध्यक्षावर बंधन होते. हे बंधन जर रद्द केले तर मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेण्यापूर्वी प्रतिनिधिसभेचे सदस्य दहा वेळा विचार करतील हे उघड होते. राष्ट्राध्यक्षाच्या मर्जीवर या सभागृहाचे अस्तित्व अवलंबून राहणार आहे याची जर का लोकप्रतिनिधींना जाणीव झाली असती तर आपल्या हातानी स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेण्याची त्यांना हिंमत झाली नसती. त्यादृष्टीने तत्कालिन अस्थिर राजकारणावर उतारा म्हणून ही घटना-दुरुस्ती उचित होती.

परंतु त्यासाठी तातडी करण्याची दूमेर्गमध्ये धमक नव्हती. सहा फेब्रुवारीच्या निदर्शनानंतर लोकप्रतिनिधी एवढे भेदरून गेले होते की काहीही करून हे प्रजासत्ताक टिकावे यासाठी मुळीच खळखळ न करता त्यांनी दूमेर्गची घटना-दुरुस्ती अनिच्छेने का होईना पण खात्रीने मजूर केली असती.

जागतिक मंदीचा तडाखा फ्रान्सलाही जाणवत होता. त्यामुळे दूमेर्गने प्रथम आर्थिक कार्यक्रमाकडे आपले लक्ष केंद्रित केले. अर्थव्यवस्थेची स्थिरस्थावर करण्यात त्याचे सहा महिने गेले. त्यानंतर घटना-दुरुस्तीचा विचार दूमेर्गच्या मनात आला तेव्हा प्रतिनिधिसभेला उन्हाळ्याची सुट्टी होती. आपण आतापर्यंत एवढे थांबलो आहोत तर ही सुट्टी आटोपून प्रतिनिधिसभेची बैठक सुरू होईपर्यंत थांबावे हा विवेक दूमेर्ग याला उरला नाही.

त्याने संसदीय संकेत झुगारून लावला.

घटना-दुरुस्तीसारखी महत्त्वाची घोषणा प्रधानमंत्र्याने सिनेट किंवा प्रतिनिधिसभा यापैकी कोठे तरी प्रथम केली पाहिजे हा संकेत मोडून दूमेर्गने नभोवाणीवरून भाषण करून आपला मनोदय जाहीर केला. दूमेर्गने संसदेची अप्रतिष्ठा केली आहे अशी लागलीच सिनेट आणि प्रतिनिधिसभा यांच्या सदस्यांनी तक्रार केली. याबाबतीत आपल्या पक्षनेत्याचे समर्थन करायचा रॅडिकल-सोशॅलिस्ट पक्षालाही धीर झाला नाही. त्यामुळे दूमेर्ग याला राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले. दूमेर्गनंतर प्रथम पॉल एतिएन्न फ्लाँद आणि त्याच्यानतर पिएर लाव्हल प्रधानमंत्रिपदावर आरूढ झाला.

मंदीमुळे आलेली आर्थिक दुरवस्था आणि अस्थिर मन्त्रिमंडळांमुळे राज्यकारभारामध्ये शिरलेली शिथिलता या दोन कारणामुळे फ्रान्सचे आपल्या परराष्ट्रीय हितसंबंधांकडे या कालखंडात बरेच दुर्लक्ष झाले.

पहिल्या महायुद्धातील पराभवाचा सूड घेण्याचा जर्मनी केव्हा ना केव्हा तरी प्रयत्न करणार आहे या दडपणाखाली फ्रान्स १९१८ पासून वावरत होता. मात्र या दडपणाची तीव्रता वाढली ती १९३३ मध्ये हिटलर सर्वसत्ताधीश झाल्यापासून. हिटलरचे आक्रमक नेतृत्व जर्मन जनतेला फार काळ स्वस्थ बसू देणार नाही हे उघड होते. त्यामुळे खरे म्हणजे फ्रान्सने आता इतर कोणत्याही प्रश्नापेक्षा हिटलरला कसे रोखायचे याचा गंभीरपणाने विचार करायला हवा होता. आपल्या भोवतालच्या इतर राष्ट्रांची पावले कोणत्या दिशेने पडत आहेत, हिटलरच्या महत्त्वाकांक्षेला लगाम घालण्यासाठी संबंधित राष्ट्रांना एकदिलाने काही करता येणे शक्य आहे काय याचा अंदाज घेण्याबाबत आणि त्या दृष्टीने परस्पर-सहाय्याचे करारमदार करण्याबाबत आता जर हलगर्जी झाली तर ती फ्रान्सला फार महाग पडणार होती.

आणि तरीही फ्रान्समधील राजकीय पक्ष अंतर्गत भांडणातच दंग झाले होते. रॅडिकल सोशॅलिस्ट पक्ष ठाम धोरणाच्या कार्यवाहीसबंधी दुबळा होता आणि कट्टर उजव्या व जहाल डाव्या पक्षांना देशावर कोसळणाऱ्या संभाव्य संकटाची फिकीर नव्हती. आपल्या पुस्तकी सिद्धांताना हे पक्ष चिकटून बसले होते. इतकेच नव्हे तर या अडचणीचा फायदा घेऊन आपल्याला वरचढ कसे होता येईल याचे डावपेच आखण्यातच या डाव्या आणि उजव्या पक्षांची शक्ती खर्च होत होती.

हिटलरच्या मनात केवळ फ्रान्ससंबंधी नव्हे तर साऱ्या युरोपसबधी कोणती स्वप्ने थैमान घालत आहेत याचा वस्तुनिष्ठ विचार करणे तसे काही फार अवघड नव्हते. साऱ्या युरोपभर भिरभिरणाऱ्या हिटलरच्या नजरेला नजर भिडविण्याचे सामर्थ्य संपादन करण्यासाठी फ्रान्सला बरेच काही करता येण्यासारखे होते. किंबहुना जर्मनीचे शेजारी-राष्ट्र म्हणून त्याच्यावरच ही जबाबदारी पडत होती. पश्चिमेकडे सरकण्याची हिटलरला हिंमत होऊ नये यासाठी रशियाशी मैत्री करणे फ्रान्सच्या दृष्टीने अगत्याचे होते. कारण जर्मनीशी मुकाबला करू शकेल अशी पूर्व युरोपमध्ये रशिया हीच एकमेव शक्ती आहे हे फ्रेंच नेत्यांना ठाऊक होते. त्याचप्रमाणे ऱ्हाईन-लॅंडमध्ये सैन्य आणून ठेवायला हिटलरला मनाई करणे, जर्मनीविरोधी युतीमध्ये इटलीला सहभागी करून घेणे, आपल्या लष्करी सामर्थ्यात वाढ करणे इत्यादी उपायही अवलंबायला हवे होते.

फ्लाद आणि लाव्हल हे दोघेही प्रधानमंत्री रशियाशी मैत्री जोडायला उत्सुक नव्हते. त्याऐवजी मुसोलिनीशी दोस्ती करावी आणि पूर्व युरोपमध्ये धुमाकूळ घालायला वाव देऊन हिटलरला राजी राखावे असे त्यांना वाटत होते. ज्यायोगे हिटलरचा संताप होणार नाही अशा मार्गाची फ्रेंच राज्यकर्त्यांची धडपड सुरू होती.

आपण नमते घेण्याने हिटलरसारखा शत्रू शांत होत नसतो हे फ्रेंच नेतृत्वाला अद्याप उमगले नव्हते.

हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही.
आपल्या जीवनकथेला गोंडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकलाही नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे.

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन

फ्लांदकडून लाव्हलकडे प्रधानमंत्रिपद आले तेव्हा लाव्हलने मुसोलिनीशी मैत्रीचे संबंध निर्माण करण्यासाठी स्वत. पुढाकार घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे १९३५ च्या जानेवारीमध्ये तो रोमला गेला आणि त्याने मुसोलिनीशी परस्पर-सहाय्याचा करार केला. ऑस्ट्रियाचा घास गिळून हिटलर आपल्या मनोरथाला पहिला वेग देणार आहे हे मुसोलिनीला माहित होते. ऑस्ट्रिया जर जर्मनीच्या नियंत्रण-क्षेत्राखाली गेला तर हिटलर जसे सांगेल तसे आपल्याला वागावे लागणार आहे हेही मुसोलिनी ओळखून होता. मुसोलिनीला हिटलरची मैत्री हवी होती. पण आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये मित्र देखील फार जवळ येऊन चालत नाही. मित्राला केव्हाही हस्तादोलन करता यावे एवढी सलगी नको असलेली दडपणे स्वीकारायला भाग पाडते, म्हणून आपण आणि आपले मित्रराष्ट्र याच्या दरम्यान दुसऱ्या एखाद्या लहानशा देशाचा अडसर असला पाहिजे हे सूत्र मुसोलिनीला माहित होते. म्हणून स्वतःच्या सुरक्षिततेसाठी त्याला ऑस्ट्रियाच्या स्वातंत्र्यासंबंधी आस्था वाटत होती.

हिटलरशी मैत्रीचा गुप्त करार करणाऱ्या मुसोलिनीने लाव्हलबरोबरही करार केला तो या सावध धोरणापायी.

फ्रान्सशी मैत्रीचा करार करण्यामागे मुसोलिनीचा आणखीही एक उद्देश होता. ब्रिटन आणि फ्रान्स याच्याप्रमाणे उत्तर आफ्रिकेमध्ये आपले साम्राज्य प्रस्थापित व्हावे अशी त्याची आकांक्षा होती. त्यासाठी त्याची अॅबिसिनियावर (म्हणजेच सध्याच्या इथिओपियावर) नजर होती. आपण अॅबिसिनियावर आक्रमण करू तेव्हा फ्रान्सने आपल्याविरुद्ध आवाज उठविता कामा नये हा, लाव्हलचा हात हातात घेण्यामागचा या इटालियन हुकूमशहाचा डाव होता. इतकेच नव्हे तर मैत्री-करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी मुसोलिनीने लाव्हलकडून तसे आश्वासनही घेतले होते. मुसोलिनीच्या मैत्रीची किंमत म्हणून उत्तर आफ्रिकेतील लहानसा प्रदेश त्याने बळकाविला तर आपण अकाडताडव करायचे कारण नाही असा लाव्हलचा ते आश्वासन देण्यामागचा हिशोब होता.

हिटलरच्या महत्त्वाकांक्षेला कसा अटकाव करायचा याचा विचार करण्यासाठी १९३५ च्या एप्रिलमध्ये स्ट्रेसा येथे ब्रिटन, फ्रान्स आणि इटली याच्या सरकारप्रमुखांची बैठक भरली. 'युरोपच्या शांततेला धोका निर्माण करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याच्याविरुद्ध तिघांनी एकदिलाने लढायचे' अशी मोघम प्रतिज्ञा करून ही बैठक संपली. मुसोलिनीला हिटलरपासून अलग पाडण्यात आपण यशस्वी झालो आहोत या समाधानात फ्रेंच आणि ब्रिटिश नेते मायदेशी परतले. अँग्लोफ्रेंचाची तशी समजूत होऊ देणे मुसोलिनीच्या फायद्याचे होते.

स्ट्रेसा येथल्या वाटाघाटी झाल्याला सहा महिने व्हायच्या आतच म्हणजे ३ ऑक्टोबर १९३५ या दिवशी मुसोलिनीच्या फौजा अॅबिसिनियामध्ये घुसल्या.

या घटनेनें, पहिल्या महायुद्धानतर अस्तित्वात आलेला राष्ट्रसंघ अक्षरशः हाद-

रला. ज्या सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वाचा राष्ट्रसंघाने पुकारा चालविला होता ते तत्त्व मुसोलिनीने पार भिरकावून दिले होते. त्यामुळे तातडीने राष्ट्रसंघाची बैठक होऊन इटलीविरुद्ध सर्व सदस्य–राष्ट्रांनी संयुक्त उपाययोजना करण्याचे ठरले. लाव्हलला हा प्रस्ताव मंजूर नव्हता परंतु ब्रिटनच्या आग्रहामुळे आणि फ्रेंच लोक-मताच्या दडपणामुळे त्याने या प्रस्तावाला तोंडदेखला पाठिंबा दिला. परंतु राष्ट्र-संघाकडून इटलीविरुद्ध कोणतीही उपाययोजना केली जाता कामा नये यादृष्टीनें त्याचे प्रयत्न सुरू झाले.

इटलीचा तेल–पुरवठा बंद झाला तर तिच्या नाड्या आखडतील हे ओळखून, इटलीला कोणीही तेल पुरवू नये असे ब्रिटनने आग्रहाने सुचविले. पण ब्रिटनची ही सूचना लाव्हलने फेटाळून लावली. इटलीला रोखण्यासाठी ब्रिटिश नौदल भूमध्य समुद्रात गस्त घालू लागताच त्यालाही लाव्हल याने आक्षेप घेतला. इटलीने जर आपल्या नौदलावर हल्ला केला तर फ्रान्सने आपल्याला मदतीला यावे असे ब्रिटनने सुचविले तेव्हा तर लाव्हलने सोयिस्कर मौन स्वीकारले होते.

विषारी वायु आणि बेसुमार बॉंबफेक या बळांवर दोन महिन्याच्या आतच इटलीने ॲबिसिनियामध्ये बरीच मुसंडी मारली होती. यावेळी ब्रिटिश परराष्ट्रमंत्री सर सॅम्युएल होअर पॅरिसला आला आणि त्याने ॲबिसिनियासंबंधी लाव्हलशी वाटाघाटी सुरू केल्या. ॲबिसिनियाचा जो प्रदेश इटलीच्या ताब्यात आहे तो तिच्याच ताब्यात राहू द्यावा आणि इटलीने आणखी आगेकूच करू नये असे इटलीला आवा-हन करण्याचे होअर आणि लाव्हल यांनी ठरविले अर्थात् मुसोलिनीने हेही मान्य केले नाही त्याने आदिसअबाबा ही राजधानी जिंकून घेऊन इटलीचा राजा हा ॲबिसिनियाचा सम्राट आहे असे घोषित केले.

लाव्हल आणि होअर यांच्या ॲबिसिनिया–प्रश्नासंबंधी वाटाघाटी सुरू असताना लाव्हल प्रत्येक वेळी मुसोलिनीला टेलिफोन करून त्याच्याशी चर्चा करीत होता आणि हे आक्रमण इटलीला पचविता आले पाहिजे यादृष्टीने तडजोडीची योजना सुचवित होता. जवळजवळ मुसोलिनीच्या संमतीनेच लव्हल–होअर योजना तयार झाली आहे ही बातमी जेव्हा बाहेर आली तेव्हा ब्रिटन आणि फ्रान्स या दोन्ही देशातील लोक इतके संतापले की लाव्हल आणि होअर या दोघांनाही राजीनामा द्यावा लागला.

एकदा ॲबिसिनिया घशात आल्यानंतर मुसोलिनीला फ्रान्सच्या मैत्रीची गरज उरलेली नव्हती. त्यामुळे त्यानें लाव्हल–होअर योजना प्रसिद्ध झाल्यानंतर महिन्या-भराच्या आतच फ्रान्सबरोबर झालेला मैत्रीचा करार धुडकावून लावला.

फ्रान्सनें दुहेरी मार खाल्ला होता.

एक तर त्यानें गोंजारलेला मुसोलिनी पुन्हा हिटलरच्या गोटात सामील झाला

होता आणि दुसरे असे की, राष्ट्रसंघाची सामुदायिक सुरक्षितता योजना निरर्थक ठरली होती. राष्ट्रसंघ शांततेचे जतन करू शकत नाही, आक्रमण थोपवू शकत नाही हे ॲबिसिनिया–प्रकरणाने सिद्ध झाले.

राष्ट्रसंघाची सर्वात अधिक गरज होती फ्रान्सला. म्हणून या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या उभारणीला त्यानेच पहिल्यांदा हातभार लावला आणि हुकूमशाहीबाबत शरणागतीचे धोरण स्वीकारून स्वतः फ्रान्सनेच राष्ट्रसंघाचे दफन केले.

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये फ्रान्स एकाकी पडला होता.

या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी फ्रान्समधील प्रत्येक पक्ष हमरीतुमरीवर आलेला होता. इटलीने फ्रान्सची मैत्री झिडकारली म्हणून उजवे पक्ष सरकारवर रुष्ट झाले होते. सरकारने अजूनही ब्रिटन–रशियाला दूर ढकलून बोल्शेव्हिझमशी मुकावला करणाऱ्या हिटलरशी समझोता करावा असे या पक्षाचे नेते आणि वृत्तपत्रे ओरडून सांगत होती.


याउलट, इटलीविरुद्ध आपण कडक उपाय योजले पाहिजेत असा डाव्या पक्षांनी आग्रह धरला होता. ब्रिटन आणि रशिया यांच्याशी दोस्ती करून नाझीवादाशी झुंज घेण्यासाठी उभे रहा अशी ते तारस्वरात मागणी करीत होते. फ्रान्सच्या तत्कालिन अवस्थेबद्दल डावे पक्ष उजव्या पक्षांना आणि उजवे पक्ष डाव्या पक्षांना जबाबदार धरीत होते. फ्रान्स कम्युनिस्ट रशियाच्या आहारी चाललेला आहे अशी उजव्या पक्षांची हाकाटी होती तर फ्रान्स फॅसिस्ट आघाडीकडे झुकलेला आहे अशी डाव्या पक्षांची तक्रार होती.

हा वैचारिक गोंधळ एवढा शिगेला पोचला होता की राष्ट्रहिताकडे डाव्यांचे आणि उजव्यांचे साफ दुर्लक्ष झाले होते.

लोकांना ही परिस्थिती भयावह वाटत होती.

(क्रमशः)





लहानपणी कै. हरि नारायण आपटे ह्यांच्या यशवंतराव खरे ह्या कादंबरीनं मी जसा प्रभावित झालो होतो तसाच पुढे प्रा. ना. सी. फडके ह्यांच्या 'उन्माद' ह्या त्यांच्या प्रणयप्रधान कादंबऱ्यात उठून दिसणाऱ्या कादंबरीनं झालो होतो. आपट्यांच्या यशवंतराव खरेला अनेक आपत्तींना तोंड देऊन क्लेशकारक काट्या—कुट्यांच्या मार्गानं वाटचाल करावी लागली होती, तर फडक्यांच्या ह्या कादंबरीतील नायक-उपनायक बंधु एका

# शब्द, सूर, ताल, लय ही सारी साधनं आहेत. त्यावर केवळ हुकमत मिळवणं एवढंच काही गायकाचं साध्य नाही....

वा. वा. गोखले

जिद्दीनं पेटलेले होते. एकाला नामांकित वकील, सबजज्ज व शेवटी सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश व्हायच होत तर दुसऱ्याला राजकारणाच वेड होत. कामगाराचे प्रश्न ईर्षेनं सोडवून सुराज्याची स्वप्न पडत होती. दोघेही आपआपल्या वेडानं झापटलेले होते, जिद्दीनं आपला मार्ग काढीत होते. जितेंद्र अभिषेकी ह्या आजच्या आघाडीवरच्या गायकाकडे मी पहातो तेव्हा मला ह्या दोन कादंबऱ्यांची आठवण होते. १४–१५ वर्षापूर्वी मी त्याला प्रथम ऐकला शिवाजीपार्कच्या दादासाहेब आपटे याच्या घरच्या लग्नात. आपटे ह्याचं घर म्हणजे अनेक कलाकाराची पढरी. उघडाबब विठोबा आणि 'ठप्प्यातल्या' रखमाई ही त्याची दैवते! पं. जगन्नाथबुवा पुरोहिताचा मुक्काम त्याच्या माडीवर. म्हणजे राम मराठे, माणिक वर्मा, व्यास मंडळी आलीच. कोकण नगरच्या हॉलमध्ये दोन दिवस पंगती उठत होत्या आणि पगती नसतील तेव्हा गाण्या–बजावण्याच्या मैफली झडत होत्या. अनेक कलाकारांची हजेरी लावून झाली होती आणि दुसऱ्या दिवशीच्या खाशा स्वारीत जितेंद्रचा नबर मध्यरात्री लागला होता. तब त्याला नाना मुळे आणि पेटीवर साथ करीत होतो मी स्वतः. जितेंद्र अभिषेकी हे कानाला कसचच वाटणार नाव मधून मधून कानावर पडत होतं. त्याच्या बोलण्याच्या लकबीवरून मंगेशकर, शिरोडकरपैकीच तो एक गोवेकर असावा असा मी अंदाज केला होता. 'शुद्ध वाणी शुद्ध मुद्रा' या

गवयाच्या प्रथम कसोटीत तो उतरत होता. त्यान मारुबिहागची अस्ताई सुरू केली. आलापीवर फारसं न रेंगाळता तो बोलता बोलता तान-पलटे घेऊ लागला. बाहेर मुसळधार पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या आणि आत त्याच्या पल्लेदार तानांनी इंद्रधनुष्य उभ केलं होतं, मध्येच ते विरळ होई. दुसरीच त्याहून मनोहारी आकृती तयार होई तीही धूसर होई व त्याहूनही सुदर अशा एकाहून एक सुदर रत्नमाला आकारत. त्याच्या तानेचे सट्टे बरहुकूम पेटीतून काढ-ण्याचा मी निष्फळ प्रयत्न करीत होतो. तो पुढे पुढे जात होता आणि मी त्याला पकडण्याची शिकस्त करीत होतो. घामान सदरा ओलाचिंब झाला होता. नाना मुळे तबलजी घामाघूम होणं स्वाभाविक होत, पण मी–पेटीवाला ! अशी साथ करताना 'घामाघूम' झाल्याचे दोन प्रसग आठवतात. एक कलकत्त्यास ग्वालेरच्या कृष्णराव पंडिताना साथ करीत असताना सुमारे २६–२७ वर्षांपूर्वी आणि दुसरा खांसाहेब विलायत हुसेन खा ह्याच्याबरोबर ध्रुपद-धमार वाजविताना. नुसत्या नोमतोममध्ये त्यानी चीतपट लोळविले मग त्याच्या आड लयीच्या गणितात काय झालं असेल ते कल्पनेनच ओळखलेलं बर. त्या रात्री ऐकणाऱ्या श्रोत्याच्या कानात जितेंद्र अभिषेकी हे नाव कायमच कोरल गेलं.

१५ वर्षामागच्या ह्या प्रसगापासून अभिषेकी मला जवळचा वाटू लागला. त्याची आक्रमक, नव्याचा शोध घेणारी 'सौंदर्यवादी' गायकी मला आवडू लागली. त्याची वरचढ गाऊन छाप पाडणारी जिद्द मला सुखावू लागली. गोव्याच्या अरे तुरे कर-णाऱ्या–'तुका सागला'न असल्या रागडया भाषेत एकीकडे खडबडीत वाटणारा पण त्याचबरोबर ब्राह्मणी सस्काराची व सस्कृतप्रचुर वाक्ये सहज उच्चारताना पर-स्परभिन्न स्वभावाच्या ह्या माणसाबद्दल मला कित्येक दिवस कुतुहल वाटे.

१४ सप्टेंबर १९३२ साली मगेशी येथे जन्म घेतलेल्या जितेंद्रचे मूळ नाव नवाथे. ह्या कऱ्हाडे ब्राह्मण कुटुबाकडे मगेशावर अभिषेक करण्याचा वहिवाटीनं हक्क. म्हणून त्याचे नाव पडले अभिषेकी. बाळूबुवा त्या भागातले उत्तम कीर्तनकार. कीर्त-नात पूर्वरग सपवून उत्तररगात आख्यान सुरू होण्यापूर्वीच्या मध्यतरात गाणं म्हणण्याची कामगिरी त्याच्या सुपुत्राची–जितेंद्राची. साकी, दिंडया, कटाव आदि म्हणता म्हणताच जितेंद्र रागदारी पदे म्हणू लागला. वडिलाकडून व ग्वालेरचे एक गायक गोव्यात स्थायिक झाले होते त्या शकरराव गोखले ह्याच्याकडूनही त्याला अधून मधून तालीम मिळे. एरवी गावात उनाडक्या करणं, व्रात्यपणा करण, दुस-ऱ्याच्या खोडया काढणं, सहासहा तास विहीरीत किंवा नदीत डुंबणं, शेजाऱ्याच्या बागेतून फळं, फुल पळविण असले चाललेले. शेवटी बाळूबुवांनी या व्रात्य मुलाला पुण्यात अनाथ विद्यार्थी गृहात आणून घातले.

अनाथ विद्यार्थी गृहाची शिस्त कडक. पुण्याचे शहरी वातावरण नविनच. दारो-दार माधुकरी मागितल्याशिवाय उदरभरण नाही. खोडया करण्यास मोकळ रानच नाही. दिवसभर शाळा व सध्याकाळी यशवंतराव मराठे आणि नरहरीबुवा पाटणकर

कीर्तनकार ह्याची गाण्याची तालीम. हा हूड, हाताबाहेर गेलेला मुलगा चार-पाच वर्षांत सुतासारखा सरळ होऊन उत्तम रीतीनं मॅट्रीक पास झाला. (१९४५)

वडिलाची इच्छा ह्यानं सस्कृत शिकाव अशी होती. त्यानी आपल्याजवळ असताना पुष्कळ सस्कृत पाठातर करून घेतले होते. पण जितेंद्रच्या मनात कॉलेजात जावयाचे होते. म्हणून त्याने बेळगाव गाठले. पण बेळगावची हवा त्याला काही केल्या मानवेना. आजारानं त्याचा पिच्छा पुरवला व शेवटी एक वर्षातच त्यानं बेळगाव सोडले. बेळगावात असताना विठ्ठलराव कोरगावकर (हार्मोनियमपटु) ह्याची त्याला चागली मदत झाली. अधून मधून ते त्याला शिकवीतही.

कॉलेज शिक्षणाची संधी वाया जात असेल तर निदान गाण्याची सधी साधावी म्हणून बेळगाव सोडून निघालेला जितेद्र मगेशीस न जाता बादिवड्यास गिरजाबाई केळेकर ह्यांच्या घरी दाखल झाला. गिरजाबाई ह्या विलायनहुसेन ह्यांच्या गडाबंध शिष्या, केसरबाई बांदोडकर, ज्योत्स्ना भोळे ह्यांच्या भगिनी. त्याच्याकडे एक वर्ष अहोरात्र तालीम मिळाली. ८।१० अस्थाई-अतरे मिळाले, पण दुर्दैवानं जितेंद्रचा आवाज एकाएकी फुटला. काही केल्या काम देईना. सढळ हातानं देणारा भेटला असताना कमनशिबान भरल्या ताटावरून त्याला उठून जावं लागल. हे दु ख उरी घेऊन जितेद्र मगेशीस परत वडिलाकडे आला.

मिळत नाही ते मी मिळवणारच मग त्याकरता पडतील ते कष्ट सोसण्याची तयारी असणारी काही जिद्दीची माणस असतात. जितेंद्र त्यापैकीच एक. आवाज गेला तो मी परत मिळवणारच ह्या जिद्दीन पेटलेल्या जितेंद्रने अहोरात्र मेहनत सुरू केली. घनघोर तपश्चर्या. त्याला काळवेळाची मर्यादा नाही. शेवटी आवाज काबूत येऊ लागला. पुन्हा फिरू लागला. त्याबरोबरच जितेंद्रच्या वात्य खोड्यांना पुन्हा उधाण आलं. त्याने एके दिवशी एका सशाची शिकार करून आणली आणि एका शेजाऱ्याच्या परसात शिजवून त्यावर यथेच्छ ताव मारला. बाळूबुवाच्या तर तळपायाची आग मस्तकाला गेली. मगेशावर अभिषेक करणाऱ्या ब्राह्मणाच्या घरच्या मुलाने असले अभक्ष्य भक्षण ! शिव ! शिव !! त्यानी जितेंद्रला ताबडतोब घराबाहेर घालवून दिले

जितेंद्रने तडक मुबई गांठली. पै नावाच्या आपल्या गाववाल्याचा पत्ता हुडकत तो प्रार्थनासमाज समोरच्या रामजी पुरुषोत्तमच्या चाळीत येऊन थडकला. खोलीत दुसरेही काही विद्यार्थी होते. परुळेकर नामक एका चार्टर्ड अकौटटच्या कपनीत महिना ४० रुपयांवर मिळेल ती नोकरी पत्करून खानावळ भागल्याच्या समाधानात त्यानं पुन्हा रियाज करण्यास सुरुवात केली मास्टर नवरग ह्यांनी विनामूल्य एक वर्ष तालीम दिल्यावर एके दिवशी आकाशवाणीची, कोकणी कार्यक्रम सादर करण्याची, महिना १०० रुपयाची नोकरी चालून आली. कोकणी, इग्रजी, पोर्तुगीज भाषा येत असून सगीत जाणणारा त्याच्यापेक्षा जास्त लायक उमेदवार कोण मिळणार ?

रेडियोच्या नोकरीनं थोडं स्थैर्य आलं म्हणून रामजी पुरुषोत्तममधला आपला बिस्तारा त्यान आपल्या वडील बंधूंसह खेतवाडीत गोवर्धन भुवनमध्ये आणून टाकला. कॉलेज शिक्षणाची इच्छा सफल होण्याच्या मार्गावर आली. त्याने भवन्स कॉलेजमध्ये नाव घातले. गाण्यापायी बहुतेक पैसा खर्च होई कॉलेजची फी कोणाकडे तरी मागूनच भागवावी लागे. मग कोणाकडे पूजाआर्चा कर, कोणाकडे सत्यनारायणाची पूजा सांग, कोणाकडे काही, कोणाकडे काही धर्मकार्य करून चार पैसे मिळवून कसा तरी खर्च भागे.

मगेशकर भगिनी जवळच्या नात्याच्याच. लताला ह्या आपल्या भावाकरता खूप करावेसे वाटे. ती त्याला बऱ्याच म्युझिक डायरेक्टराकडे घेऊन गेली. पण कोठेच काही जमेना. सगीताची नुकतीच तोडओळख झालेल्या, फिल्मी दुनियेचा गध नसलेल्या जितेंद्रला लताच्या ओळखीनंही फारसा उपयोग झाला नाही. लता त्याला धीर देई. तालीम कशी करावी, रेकॉर्डींगचे तत्र आणि मत्र समजण्याकरता आपल्या बरोबर त्याला घेऊन जाई. सर्वतोपरी मदत करण्याकरता पुढे येई.

त्याच सुमारास (१९५४) जितेंद्र आग्रा घराण्याचे गायक अजमत हुसेन खां याचेकडे तालीम घेऊ लागला. त्यांनी मनापासून शिकविले पण एक वर्षातच (१९५५) आकाशवाणी कलाकाराचा सप सुरू झाला. आणि त्या गडबडीत शिकवणी सुटली. त्यांनी 'शुद्ध नट' ('अजमना') देशी, शुद्ध कल्याण, गुजरी, मालकौंस वगैरे राग शिकविले. ह्या काळात सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंतची दिनचर्या एकामागून एक कार्यक्रमांनी जखडलेली असे. परुळेकरांची ४० रुपयाची नोकरीपण त्यातच होती. पण एक ताल, झुबऱ्याच्या मात्रा आणि स र ग म पलटयाच्या अचूक गणितात त्याच्या कॅशबुक–लेजरमधली आकडे–मडळी शत्रूपक्षातील मित्र पक्षात जाऊन बसू लागली, तर बेरजांच्या ठिकाणी वजाबाक्या होऊन शिल्लक शून्य दिसू लागले. तेव्हा परुळेकरांनी डोक्याला हात लावून ह्या 'विद्वाना'ला हाकलून दिले !

एखाद्याच्या जीवनात सर्वच घटना नेहमी नाटयपूर्ण व्हाव्यात असा योग असतो की काय नकळे. कै. पं. जगन्नाथबुवाची जितेंद्रच्या जीवनातील 'एन्ट्री' अशीच नाटयपूर्ण. एक गोमांतकीय सगीतप्रेमी सधन गृहस्थ गिरगावातल्या दोन देवळासमोर राहतात. ते तेथे कसे राहतात ते त्याचे त्यानाच माहीत. दोन देवळातील एका देवळात निजामपूरकरबुवा व दुसऱ्यात 'टोपडे' बुवा याची कीर्तनं रंगत. एकाचा दुसऱ्यापेक्षा एक पट्टी सूर चढा. दोघांचीही आवाजी वाखाणण्याजोगी. मृदंगावर थाप पडली आणि धुमाळीचा ठेका वाजू लागला आणि बुवाच 'जय जय रामकृष्ण हरि' सुरू झालं की आमच्यासारखी 'जरा देवळात जाऊन येतो' म्हणून घरून निसटलेली पोरं त्या गर्दीत तल्लीन होऊन तासन् तास उभी रहात. अशा त्या दोन देवळात एकीकडे भक्तीरमाला उधाण येई तर समोरच्याच त्या

काळोख्या इमारतीत इष्काचे खेळ चालू होत. प्रतिष्ठित माणसांनी त्या 'तसल्या' घराकडे वर डोळा करून न बघण्याचं ते घर. तेथेच ते राहातात. राहोत बापडे. सवयीनं त्याची नजर मेली असेल. त्याच्या घरी प्रतिवर्षाप्रमाणे गोकुळाष्टमीचा मोठा उत्सव होता. रात्रभर गाण्याची मैफल. गोवेकर मडळी तर असायचीच पण गाण्यातील अनेक बुजुर्ग समोर बसलेले. अनेकानी हजेरी लावली आणि त्यानंतर जितेद्र गावयास बसला. अजमत हुसेनखानी शिकविलेल, इकडून तिकडून ऐकलेलं व प्रखर मेहनतीनं आवाजावर हुकमत मिळवलेलं आपल कसब आपण श्रोत्याप्रत केव्हा पोहोचवू अस त्याला झालं होत. त्याने नुकताच बोलबाला झालेला एक राग – जोगकस म्हणण्यास सुरुवात केली. त्या रागाच रूप, रंग, गध, त्याचं सौदर्य कशात आहे हे ज्ञात नसलेल्या जितेद्रानं त्या खुबसुरत रागाची पार मोडतोड करून टाकली. गळा फिरतो आहे, मार तानाचे सट्टे. समोरच बसलेले एक गौरवर्णीय तेजस्वी, उतारवयाचे गृहस्थ अस्वस्थ होऊन चुळबूळ करू लागतात. तरी जितेंद्रचे त्याचेकडे लक्षच नसते. तो आणखीनच जोरकस सट्टे फिरवू लागतो. शेवटी त्या गृहस्थाना रहावत नाही. ते सतप्त होऊन बैठक सोडून जातात. गाण संपत. तबोरा खाली ठेवून तो शेजारी बसलेल्या बबन मांजरेकरला विचारतो, 'खय् गेलो रे तो आजो ?' बबन त्याला हळूच सागतो, 'ते तापून निघून गेले ते पं. जगन्नाथबुवा पुरोहित ! तू आता ज्या रागाची चिरफाड केलीस त्या 'जोगकौस' रागाचे जनक ! 'माका सागपाचे तुवे' अस म्हणत जितेंद्र ताडकन् उठतो. त्याची 'नशा' आता उतरलेली असते. आपल काहीतरी चुकल ह्याची त्याला खत वाटू लागते. दुसऱ्या दिवशी बबन माजरेकर त्याला घेऊन बुवाच्या कोठीवर जातो. पण बुवा त्याला घरात घ्यायलाही तयार नसतात. शेवटी कसबस गयावया करीत दोघेही बुवापर्यंत पोहोचतात. बुवांचे पाय घट्ट धरून त्याना अश्रूनी स्नान घालतात. शीघ्र-कोपी बुवा रागानं कापत असतात. तोडानं अस्सल कोल्हापुरी भाषेचा तिखट हिसका बाहेर पडत असतो. आपल्या पोटच्या गोळ्याचा आपल्यादेखत कोणी खून पाडावा ह्याचा सताप बाहेर पडत असतो. दोघेही खाली मान घालून अपराधी मनानं मख्खपणे उभे असतात. शेवटी बुवाचा पारा खाली येतो. ते शात होतात तेव्हा दोघाना वाचा फुटते, 'आम्ही तुमच्या पायापाशी आलो आहो. तुम्ही आम्हा दोघांना शिकवा. पुन्हा अशी कसूर करणार नाही.' असे वचन देतात. शेवटी बुवा विरघळतात. 'गुस्ताकी-माफ' करतात. आणि अजमत हुसेन ह्यांच्या अनुमतीनं त्याना गाणं शिकवण्याच कबूल करतात. जगन्नाथबुवा-जितेंद्र ह्या गुरु-शिष्यांच्या प्रथम भेटीच्या नाटयाचा पहिला अक येथे सपतो.

जितेद्र अभिषेकी ह्याच्या जीवनाचा दुसरा अक सुरू होतो तो त्याच्या जीवनात आलेल्या दुसऱ्या एका कलाकाराच्या प्रवेशानं. ती व्यक्ती म्हणजे एका काळची गायिका केसरबाई बादोडकर आणि त्यांची विख्यात चित्रकार कन्या प्रफुल्ला जोशी.

एक कलाकार दुसऱ्या कलाकाराची सल ओळखून त्याच्याकरता किती देतो ह्याची साक्ष म्हणजे ह्या मायलेकी आपली बहीण गिरजाबाई केळेकर हिच्याकडे तालीम घेतलेला, आपल्या गावचा एवढीच त्याची ओळख. पण या बाईनं काय केलं नाही ? त्याची रहाण्याची, खाण्याची आबाळ होते म्हणून त्याला आपल्या घरी आणून ठेवले. रेडिओवर ६ वर्षे नोकरी करूनही पगार १६० च्या पुढे जाईना. म्हणून पोटाला चिमटा घेऊन कलेच्या पाठीमागे लागलेल्या ह्या पोराला ह्या बाईनं पोटच्या गोळ्याप्रमाणे सांभाळल. दिवसाला फक्त ६ आण्यात पोटपूजा करणाऱ्या मुलाला खाऊ पिऊ घातलं. त्याच्या स्वैर, स्वच्छदी वागण्याला दिशा दाखवून दिली. आईच्या ममतेचा हात त्याच्या पाठीवर फिरवून हळुवारपणे त्याच्या सुप्त आशा-आकाक्षांना फुकर घालून पुन्हा प्रज्वलित केले. त्याच्यात नवा उत्साह, नवी उमेद जागी केली. पं. जगन्नाथबुवानी त्याला जीवन-सगीत दिलं. पण ह्या बाईनं त्याच जीवनच पुन्हा फुलविल. नव्या उन्मेषीनं बहरविलं.

जितेद्र ह्या मन.स्थितीतच बी. ए. पास झाला आणि नतर थोड्याच दिवसात त्यानं रेडियोची नोकरी सोडली (१९५९) ह्याच वेळी त्याला मध्यवर्ती सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. कोणत्या गुरूकडे शिकावयाचे हा प्रश्न पडला. बुवाच म्हणणं, 'तू अमीर खां, गुलामअल्ली याच्यासारखा गातोस तेव्हा त्याच्याकडे जा' अस. पण 'शिकणार तर तुमच्याचकडे नाहीतर शिष्यवृत्ती परत करीन' असा निर्वाणीचा शब्द बुवांना टाकल्यावर व राम मराठे ह्यांनी मध्यस्थी केल्यावर बुवा गाणं शिकविण्यास तयार झाले.

## पं. जगन्नाथबुवा पुरोहित ह्यांची तालीम

पं. जगन्नाथबुवांनी त्याला ९/१० वर्षे तालीम दिली. बुवा आग्रा घराण्याचे म्हणवीत पण त्याची स्वत ची अशी स्वतत्र गायकी होती. बुवा एकाच गायकीला धरून रहात नसत. जेथे जेथे त्याना चागल दिसलं त्याचा त्यांनी स्वीकार केला. त्याचा गायकीकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक होता. त्यांनी आपली स्वत:ची गायकीही सहीसही दुसऱ्याच्या गळ्यात उतरविली नाही. तर ज्याच्या गळ्याला व पूर्व तयारीला व त्याच्या कुवतीला झेपलं ते ते व तेवढेच त्याला देऊन त्याला आपली स्वत ची गायकी, ढग वाढविण्यास मदत केली. नवीन दृष्टी दिली. बैठका रंगविण्याची कला शिकविली हेच त्याच्या गायकीचं वैशिष्ट्य सांगता येईल.

बुवा कोल्हापूरास असताना दोन वर्षे अभिषेकीला त्यांच्या सहवासात राहण्याचं भाग्य लाभलं. त्याच्या गाण्याच्या तालमीखेरीज बुवानी त्याचेकडून अनेक कविता पाठ करवून घेतल्या. बदिषी करता यावी म्हणून ब्रीजभाषा शिकविली. बुवांनी पाठ करवून घेतलेल्या व आजतागायत अज्ञात असलेल्या काही बहारीच्या कविता पहा—

कोरे कंगाल न मे शहा को का काम ।
बैठे बैठे पंगत मे लुटावे आपनो धन रे ।।
केलन की पेडन मे बेलनको कहा काम ।
चुपका रहो चदन यहा तो करेलन को बनरे ।।

(कंगालामध्ये बादशहाचे काय काम ? पंगतीत ब्रह्मज्ञान सागून ज्ञान फुकट घालविण्यासारखे आहे. केळीच्या बनात वेलीच काय काम ? कार्ल्याच्या वनात अरे चदना, तू गप्प बसलेलेच बर.)

माणसाच्या चारित्र्यावर बुवा अशीच एक कविता सागत–

सदा सुहागन नीत नयी
रोटी और घर नार ।
दाम दुनो दुख चौगुणो
पूरी और पर नार ।।

(घरची रोटी व स्वत.ची बायको हीच खरी. बाजारातल्या पुरीनं आणि बाईनं दुप्पट पैसे आणि चौपट दु ख मात्र पदरात पडते.)

प्रेमाबद्दल बुवा म्हणतात—

मीन काट जय धोयियो
खायिये अधीक पीयास ।
रहिमान पीत सुहाई ये
मुए मीत की आस ।।

(पाण्यावर मासळीचं अतिशय प्रेम. तिला पाण्यात कापून पाण्यातच शिजवावी लागते आणि खाल्ल्यावर सुद्धा तहानच लागते. प्रेमाचे तसेच आहे.)

गाणारा कसा दिसावा ह्यावर बुवा सांगत—

लाखोमे गुणवंत छुपे नहि
नहि दाता छिपे पीठ दिखाये
सो घुघटकी ऑट करो ।
चचल नयन छिपे न छिपाये ।।

(खरा कलाकार लाखात उठून दिसला पाहिजे. त्याला पाठीमागूनही ओळखता आल पाहिजे की हा कलाकार आहे. जस घुघट घेतलेल्या शभर नारीतही चंचल स्त्री ओळखता येते तस.)

एखादी जमीन मूलत:च सुपीक. बीज टाकलं की उगवतं. फुलं फळ येऊ लागतात. तर एखाद्या जमिनीत बीज टाकावं, खतपाणी करावं; उत्तम मशागत करावी. तरी— फळं फुलं लागता लागत नाहीत. जितेंद्र अभिषेकीच्या कुडलीतले ग्रहही असेच वक्री. १० वर्षाहून अधिक मेहनत झाली. जगन्नाथबुवासारखे गुरू मिळाले तरी गाण्याचे 'बुलावे' काही येईनात. शेवटी १९५९ मध्ये नाना मुळेला घेऊन

गावोगाव तंबोरा घेऊन भ्रमती केली. सारा मध्यप्रदेश पालथा घातला. तरी निराशाच पदरी पडली. कित्येकदा पदरचे पैसे खर्च करून परत यावं लागलं. एकदा तर इंदूरजवळ नागद्यास भर उन्हाळयात अन्नपाण्याशिवाय २।। दिवस काढावे लागले

१९६० पासून हळूहळू पण निश्चित जम बसू लागला. गाण्याची बोलावणी येऊ लागली आणि १९६४ मध्ये सवाई गंधर्वांच्या पुण्यतिथीत गायलेल्या 'स्वानंदी 'नं त्याच्याबद्दल जनमत चागलंच दृढ झाल. त्यानंतरची त्याची द्रुत चाल सर्वांच्या परिचयाचीच आहे.

## नाटचसंगीत

एकदा ग्रहमान बदललं आणि उच्चीचे ग्रह आले की घेणाराची "घेशी किती दो करान" अशी अवस्था होते. मैफलीचा जम बसत असतानाच अचानक नाटच-संगीताची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. गोवा हिंदू असोशिएशननं कानिट-कराचे 'मत्स्यगंधा' नाटक बसविण्यास घेतलं. त्याच्या संगीताची जबाबदारी वसंत देसाई ह्याच्याकडे देण्याचे ठरले होते. पण काही कारणानं ते फिसकटलं आणि एके दिवशी गोपाळकृष्ण भोबे गोवा हिंदू असोशिएशनच्या मंडळींना घेऊन अभिषेकी ह्याच्या घरी हजर झाले. जितेंद्र अभिषेकी ह्यांनी आपल्या परीनं त्यात सर्वस्व ओतूनही नाटक पकड घेईना. एकामागून एक ५० प्रयोग पडले. पुन्हा नाटच-संगीताच्या वाटेला चुकूनही जावयाचे नाही अशा निश्चयाप्रत आला असताना त्याला एक युक्ती सुचली. मत्स्यगंधेची गाणी रेकॉर्ड करून ती विविधभारतीवर ऐकविली तर--आणि एकादी जादूची काडी फिरावी तसा चमत्कार घडला. 'देवा घरचे ज्ञात कुणाला' (यमन), 'साद देती हिम शिखरे' (सारंग), 'गुंतता हृदय' (खमाज), ही रामदास कामतांनी म्हटलेली गाणी विलक्षण लोकप्रिय झाली. 'मन रमता मोहना' व 'अर्थशून्य भासे' (भट्टीयार) ही आशालता वाबगावकर हिनं म्हटलेली गाणीही लोकांना आवडू लागली. मत्स्यगंधेचे पुन्हा लावलेले सर्व प्रयोग 'हाऊसफुल्ल' जाऊ लागले. रामदास कामत हा नाटचसंगीतनिपुण नट कीर्तीच्या शिखरावर जाऊन पोहोचला परंपरा न मोडता पण नाविण्यपूर्ण चाली व आपली आक्रमक गायकी रामदास कामत ह्याच्या गळयावर चढवून जितेंद्र अभिषेकी ह्यांनी नाटचसंगीतात क्रांती घडवून आणली.

त्यानंतरच्या 'ययाती देवयानी' ह्या नाटकाला तर 'प्रेम वरदान' (भीम) 'यती मन मानित या' (तिलक कामोद) आणि 'सर्वात्मका सर्वेश्वरा' ह्या गुण-कली-भैरवी गाण्यानीच उचलून धरले.

मत्स्यगंधा आणि ययातीमधल्या गाण्याच्या चालीची जात एकच. पारंपारिक पण आक्रमक. 'लेकुरे उदंड झाली'मध्ये मात्र त्यांनी एक नवीनच प्रकार हाताळला आहे. पूर्वी 'झगडा' म्हणून एक द्वंद्वगीताचा प्रकार होता. त्याची ही वाढवून केलेली

आवृत्ती. पाश्चात्य नाटकात विशेषत: 'My Fair Lady' ह्या अलीकडच्या इंग्रजी चित्रपटात ह्या नाविन्यपूर्ण संगीताचा उपयोग केलेला आहे. ह्यात बोलणं कोठे संपतं आणि गाणं कोठे सुरू होतं हेच कळत नाही. पाश्चात्य पद्धतीचा वाद्यमेळ घेऊन अभिषेकी ह्यांनी केलेल्या ह्या नाविन्यपूर्ण प्रयोगाचं रसिकांनी खूप स्वागत केलं.

त्यानंतरच्या 'वासवदत्ता'मध्ये त्यांनी नारायणराव बालगंधर्वांच्या गायकी अंगाचं संगीत आणलं आहे. पण नाटक चाललं नाही. म्हणून ते संगीतही बारगळलं. अलीकडेच 'रुपसुंदर सखी' (श्री) व 'तू येता सखी' (मिस्र सिंधूरा) ही अरविंद पिळगावकर ह्यांनी म्हटलेली ध्वनिमुद्रिका बाहेर पडली आहे.

पंडितराज जगन्नाथ, मंदारमाला, बैजू ह्या संगीतकारांच्या जीवनावर सर्वस्वी संगीतावर भर असलेल्या नाटकात 'कटयार काळजात घुसली' हे नाटक सर्वतोपरी उजवे. कथानक व संगीत ह्यांचा बेमालूम मिलाफ ह्या नाटकाव्यतिरिक्त इतरत्र पाहावयास मिळावयाचा नाही. ह्या नाटकातील खाँसाहेब वसंतराव देशपांडे ह्या भूमिकेकरताच जन्माला आले आहेत अशा ताकदीनं ते ही भूमिका उभी करतात. खाँसाहेबांच्या बारिक सारिक लकबी, त्यांचं उर्दू मिश्र बोलणं, हावभाव, बोलण्याचा आवेश हा गद्य भाग जितका हृद्य तितकाच त्यांचा संगीत पार्टही भूमिकेला उठाव देणारा. 'घेई छंद मकरंद' – (सालग वराळी) 'लागे कलजुवा कटार' ही ठुंबरी किंवा



## वा. वा. गोखले

"कै. छोटूबुवा गोखले यांच्यावरील लेख आपल्याकडे पाठवीत आहे. कृपया प्रसिद्धी द्यावी. लेखक म्हणून 'वा. वा.' हेच नाव टाका."

हे वा. वा. कोण ?

या नावाने लेख कसा काय प्रसिद्ध करायचा ?

हे नाव वाचकांच्या लक्षात येईल का ?– अनेक शंका.

नंतर आलेल्या काही पत्रांवरून समजले की वा. वा. गोखले हे संगीत क्षेत्रातील लोकांना वा. वा. याच नावाने परिचित आहेत. व्यवसायाने मुंबईचे एक प्रथितयश मुद्रक असलेले वा. वा. सध्या दादर–माटुंगा सोशल क्लबचे कार्याध्यक्ष आहेत. गेली चाळीस वर्षे संगीत क्षेत्रातील अनेक कलाकार त्यांनी जवळून पाहिले, ऐकले. जितेंद्र अभिषेकी त्यापैकीच एक.

त्यांचे ' तेजो निधी लोह गोल ' ललतपंचममधील गाणं म्हणजे संगीताची अपूर्व मेजवानी. अभिषेकींनी त्यात एक रागमाला घालून आणि ' दिन गेले भजनाविण ' हे बिलावल थाटाचं गाणं भार्गवराम आचरेकराच्या तोंडी घालून ह्या संगीत नाटकाला पूर्णत्वाला नेले आहे. ' कट्यार 'च्या नाट्यसंगीतानं अभिषेकींना जे स्थान मिळवून दिलं आहे ते त्यांच्यापासून हिरावून घेणे आणखी कित्येक वर्षे तरी दुसऱ्या कोणालाही शक्य होणार नाही हे निश्चित.

नाट्यसगीत शाश्वत टिकण्यासाठी कल्पक, चतुर रचनाकार तर हवाच पण ते ज्यांच्या तोंडी घालायचे तो गायकनटही ताकदीचा हवा. किंबहुना त्याच्या ताकदीचा विचार करूनच सगीतरचनाकारानं चाली बांधावयास हव्यात. बालगंधर्वांच्या गळ्यावर चढणारी गायकी ओळखून मास्तर कृष्णराव, टेंबे, आणि भास्करबुवा बखले ह्यांनी चाली बसविल्या किंवा ज्योत्स्ना भोळे ह्यांच्या गळ्यातून काय निघेल ह्याचा अदाज घेऊन दिलेल्या ' कुलवधु 'च्या चाली मास्तरांनी दिल्या म्हणूनच ' मन रमणा, ' ' क्षण आला भाग्याचा, ' ' बोला अमृत बोला ' सारखी गाणी लोकप्रिय झाली, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. रामदास कामतसारखा साफ, खड्या आवाजीचा गायक किंवा वसंतराव देशपांडे यांच्यासारखा मुरब्बी, हरहुन्नरी गायक नसता तर अभिषेकी ह्यांचा स्वरविलास एवढा खुलता ना, हे सत्य मानावयासच हवं.

ते काहीही असो. ह्या नाटकानं जितेंद्र अभिषेकी ह्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली हे खरं. आता ते " औषध न लगे मजला " ह्या कानिटकरांच्या नव्या नाटकाचा विचार करीत आहेत.

## परदेश दौरा

वरील नाट्य–संगीताच्या मानानं अभिषेकी ह्यांचं सिनेमा संगीत अगदीच मामुली म्हणावं लागेल. पूर्वी ' भाव तेथे देव ' ह्या लताबाईंच्या चित्राला त्यानी संगीत दिलं होतं. पण ते चित्र पडलं आणि संगीतही. सिनेमाचं तंत्रमंत्र अवगत असल्याशिवाय सिनेसंगीत ही अवघड गोष्ट आहे.

आता पुन्हा एकदा ह्या ' लाईन 'चा ते अनुभव घेणार आहेत. तीन मराठी चित्राना सगीत देण्याची कामगिरी त्यांनी उचलली आहे. मागील अनुभव जमेस धरून व विचाराची बैठक आता पक्की असल्यामुळे सिनेमासंगीतातही ते आपली छाप पाडतील असा विश्वास धरावयास हरकत नाही.

पं. रविशंकर ह्यांनी पाश्चात्य लोकाना हिंदुस्थानी संगीताचे वेड लावले आहे. त्यांची सतार म्हणजेच हिंदुस्थानी सगीत असे समजणाऱ्या, भारतीय वाद्यांचीच केवळ ओळख झालेल्या तेथील लोकांना आपल्या शास्त्रीय गाण्याची ओळख करून देण्याच्या उद्देशानं त्यानी जितेंद्र अभिषेकी ह्यांना आपल्या ' किन्नर स्कूल 'मध्ये व इतरत्र गाण्याचे कार्यक्रम करण्याकरता बोलावून घेतले. (एप्रिल १९६८) पाच महिन्याच्या

आपल्या वास्तव्यात अभिषेकी ह्यांनी अनेक मैफली केल्या. काही ठिकाणी शास्त्रीय गाण्याचे पाठही शिकविले. इंग्लंडच्या रॉयल फेस्टिव्हल हॉलमधला त्याचा कार्यक्रम खास उल्लेखनीय. आपले शास्त्रीय गाणं ऐकण्याकरता जी एक किमान वैचारिक पातळी असायला हवी ती प्रथम तयार करणं आवश्यक आहे असं त्यांचं मत झालं. एक गोष्ट मात्र निश्चित, पाश्चात्य लोक आपलं गाणं समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. आणि त्या दृष्टीनं असे कार्यक्रम अधूनमधून घडवून आणणं मोलाचं ठरेल ह्यात शंका नाही.

गेलं वर्ष (१९६९) हे अभिषेकी ह्याच्या आयुष्यातील अत्यंत मोलाचं समजावयास हव. जानेवारी १९६९ मध्ये त्यांचा विवाह महाराष्ट्राचे चॅरिटी कमिशनर व एक सगीत रसिले गोडसेसाहेब ह्यांची सुविद्य कन्या विद्या गोडसे हिच्याबरोबर मोठ्या थाटामाटात झाला. आणि त्यानंतर काही महिन्यातच टाटांकडून त्यांना भाषा रिसर्च स्कॉलरशीप मिळाली. महिना १५०० रुपयाच्या ह्या शिष्यवृत्तीत त्यांचेवर कोणतेही बंधन नाही. अशा तऱ्हेची मोठी शिष्यवृत्ती मिळविणारे भारतातील जितेंद्र अभिषेकी हे पहिलेच कलाकार होत.

## मैफल

जितेंद्र अभिषेकी ह्यांच्या एखाद्या बैठकीचं वर्णन करावयाचे झाले तर ते असं असेल. सभागर श्रोत्यांनी भरलेले आहे. त्यात त्याची स्वयंपूर्ण गायकी ऐकण्यास जशी जाणती मडळी असतील तशीच त्यांच्या नाटकातील गाजलेली गाणी ऐकण्याकरता गर्दी करणारी तरुण-तरुणी असतील, तर काही तरुणी त्यांची भावगीतं, अभंग ऐकण्याकरिता व लिहून घेण्याकरता वही पेन्सील घेऊन बसलेली दिसतील. काळी दोनचे दोन तंबोरे मस्त जुळलेले आहेत. त्यांच्या शिष्यांपैकी एकावर प्रभाकर कारेकर किंवा राजेश्वर बोबडे असेल आणि दुसऱ्यावर अरविंद पिळगावकर. तबल्याला नाना मुळे आणि हार्मोनियमवर वालावलकर आहेत. सगळी सभा निःशब्द शांत आहे, आता सुरू होणाऱ्या गाण्याकडे कान आणि डोळे लावून आहे. तंबोऱ्याचा षड्ज-पंचम वातावरण सुगंधित करीत आहे. मध्यभागी बसलेली धीर-गंभीर मूर्ती क्षणभर डोळे मिटून घेते आणि मस्त जुळलेल्या तंबोऱ्याच्या षड्ज-पंचमात आपला षड्ज मिळवून देते. खर्जातले एक एक सूर धुवून पुसून एकापुढे एक मांडले जातात, जसे देव्हाऱ्यातील देव पुजेला ताम्हणात काढून धुवून पुसून परत देव्हाऱ्यात ठेवावे तसे. सत्यनारायणाच्या पूजेत जशी नवग्रहांची आणि आदि दैवत गणपतीची पूजा ताम्हणात मांडलेल्या सुपाऱ्यांवर गंध-अक्षता टाकून केली जाते तशी सप्त सुरांची आराधना आटोपल्यावर अस्ताई सुरू होते. नाना मुळेंचा ठाय लयोत एकताल सुरू होतो. एक एक सूर दुसऱ्या सुराला आव्हान देत स्वर-आलापीची महिरप आकार घेते. एक एक सुराभोवती गुफण करीत रागाची छाया स्पष्ट दिसू लागते. रागाची मूळ चौकट भक्कम तयार होत असते. जात्याच रुंद,

जाडया आवाजाची रुंदी व खोली हळू हळू वाढत असते. आलापीचा विस्तार आता पंचमावर स्थिरावतो. रबर ताणून लांब करावा तशी सुराची आंदोलनं प्रसरण पावू लागतात व तितक्याच गतीनं पुन्हा मूळ जागी परत येऊन आदळतात. मग पंचमावर सारखा न्यास करून पुढली मजल सुरू होते. रागाची बढत होत असते. सफाईनं समेवर येऊन पुन्हा पुढला वरचा सूर पकडला जातो, मग त्याच्या पुढला आणि मग वरच्या षड्जावर स्थिर होतो. षड्ज खडा लावून व आकारानं-उकारानं त्यावर स्वार झाल्यावर आलापचारी संपत येते. मग सुरू होतात बोल--ताना, दिडीच्या, दुपट्टीच्या, चौपटीच्या हिशोबानं समेवर येणाऱ्या हरकती, मुरक्या बोल-तानांनी राग खुलत असतो. रागविस्तार पूर्णतः झाल्यावर तान-पलटे सुरू होतात. आधी लहान लहान वाटणाऱ्या तानांची आवर्तने वाढत वाढत निर-निराळे आकार घेऊ लागतात. एखाद्या कल्पक चित्रकारानं पाटीवर भराभर आकृत्या काढाव्या, त्या पुसाव्या, त्याजागी त्यापेक्षा जास्त शोभिवंत आकृत्या काढाव्या, त्याही पुसाव्यात आणि त्यापेक्षाही जास्त मनोहारी चित्र रेखाटन करावे तसे अभिषेकी आपल्या जोरकस तानानं एकामागून एक सुंदर चित्रं उभी करतात. मध्यम उंचीचा, पीळदार शरीरयष्टीचा, किंचित बारीक डोळयांचा, काळा कुळ-कुळीत पण आखूड केशसंभार असलेला, भरदार छातीचा, मुडेछाट रेशमी कुडते घातलेला हा तरुण अस्तन्या वर सरकावू लागला की समजावं आता साथीदारांचं मरण आलं ! पेटीवाल्या वालावलकरांचा डावा खांदा कानाला जाऊन चिकटतो ! तानाचे सट्टे एकामागून एक विजेच्या चपलतेनं समेवर येऊन आदळू लागतात. कुमार गंधर्वांच्या तानेची तडफ, मास्टर दीनानाथांच्या तानेच्या फेकीची विद्युल्लत्ता, गुलाम अल्लीच्या तानेची सफाई आणि सहजता ह्यांचे मिश्रण म्हणजे अभिषेकी ह्यांची दाणेदार तान, आणि त्याचे जोडीला जयपूर गायकीची दमछास. मात्रा-दिडमात्रेत दोन किंवा कधी तिन्ही सप्तकात फिरून डाव्या हाताच्या झटक्या-बरोबरच समेवर येऊन आदळणारी तान म्हणजे अभिषेकी ह्यांच्या प्रखर मेहनतीचं, जिद्दीच चालतं बोलतं प्रात्यक्षिक. अत्यंत विलोभनीय. विसरू म्हणून न विसरता येणारं. जितेंद्र अभिषेकी ह्यांची मैफल रंगली नाही असं सहसा होत नाही.

अभिषेकी 'स्वानंदी', पूर्वाकल्याण, जोगकंस, चंद्रकंस, कौशीकानडा, शुद्ध-कल्याण, मारवा, मुलतानी वगैरे त्याच्या आवडीचे राग सारख्याच तयारीने गातात. प्रथम श्रेणीच्या श्रोत्यांना वरीलप्रमाणं झुकतं माप दिल्यावर ते नाट्यसंगीत, भावगीतं वगैरे ऐकण्यास आलेल्या श्रोत्यांसाठी 'मधु मीलनात् या', 'रवि मी चंद्र कसा' किंवा 'शूरा मी वंदिले' वगैरे नाट्य-संगीत म्हणतात. तसेच वही-वाल्यांकरता स्वतः लावलेल्या चालीची 'पूर्तता माझ्या व्यथेची' 'प्रेम केले हा का काय् झाला गुन्हा' किंवा मंगेश पाडगावकरांचं 'माझे जीवन गाणं' ही गाणी म्हणतात. अलीकडे त्यांच्या बहुतेक बैठकीचा शेवट 'सर्वात्मका सर्वेश्वरा' ह्या

त्यांच्या अविट गोडीच्या गाण्यानं होतो. संस्कृत अध्ययनानं स्वच्छ वाणी हेही त्याच खास वैशिष्टय मानले पाहिजे, कित्येकदा वाजवीपेक्षा जास्त स्पष्ट वाटावी इतकी. 'सर्वात्मका 'मधील 'हृदयात 'चा उच्चार आंतरबाह्य हृदय हलावा असा वाटतो. त्याची दीर्घ ध्वनिमुद्रिका (L. P) 'सद्गुरू हो '–विलासखानी तोडी आणि 'हे ईश्वर '–मारवा ही रेकॉर्ड बरीच गाजली आहे

## गायकी

जितेंद्र अभिषेकी ह्यांच्या कलदर, जिद्दी, काहीशा स्वैर अन् पुष्कळशा 'मनस्वी' स्वभावाचं प्रतिबिंब त्याच्या गायकीवर पडल आहे. एकेकाळी स्वरसाधनेपायी दारोदारी मागावी लागलेली माधुकरी, मुबईत आल्यावर पहिली काही वर्षे त्याची झालेली परवड, पोट मारून करावी लागलेली स्वराची पूजा, एकामागून एक निराशेचे, वैफल्याचे प्रसग, तबोरा खाकोटीस मारून उपाशी पोटी केलेली वणवण ह्या सर्वांचा ठसा त्याच्या गायकीवर उमटलेला स्पष्ट दिसतो या सर्व विपदावस्थेवर जिद्दीनं, प्रखर मेहनतीन त्यान केलेली मात ठायीठायी जाणवते. म्हणूनच तो घराण्याची बूज राखीत नाही. सूर, ताल, भावना ह्याचा एकजीव व्हावा आणि रागाच्या विस्ताराबरोबर त्याचा असा काही गहिरा परिणाम श्रोत्यावर व्हावा की त्यावेळेपुरते तरी त्यांना ते वेगळे विश्व भासावे अस त्याला वाटतं. शब्द, सूर, ताल, लय ही सारी साधनं आहेत. त्यावर केवळ हुकमत मिळवण एवढच काही गायकाचं साध्य नाही. सुख-दुःख, आशा-निराशा, जीवनातील सर्व बरं-वाईट ह्याचं प्रतिबिंब उमटविणारं ते खरं संगीत. तोच गायकाचा 'जीवन धर्म' हे सूत्र सतत बाळगून व ह्या श्रद्धेनं गायल तरच गाण नवनवीन सौंदर्य घेऊन उभारी धरील, शाश्वत परिणाम करील. हे त्यांच्या गायकीच सार म्हणता येईल.

घराण्याच्या सीमारेषा आता पुसट होत आहेत. जीवन आता जास्त गतिमान झाल आहे. व्यापक झालं आहे त्या गतिमान जीवनाशी सागड घालावयाची म्हणजे घराण्याचा साचेबदपणा मोडला पाहिजे, गाण 'विमुक्त' झाल पाहिजे. गाण्याची मूळ चौकट शाबूत ठेवूस ज्यान त्यानं आपल्या मगदुरीन त्याला जास्त 'सौंदर्यवादी' केलं पाहिजे. कुमार गधर्व ह्या विचाराचे पहिले प्रणेते मानले तर वसंतराव देशपांडे, प्रभा अत्रे ह्याच्यापेक्षा जास्त बडखोर, तितकेच कलदर आणि सखोल विचार करणारे जितेंद्र अभिषेकी हे ह्या नवविचाराचे आणखी एक शिलेदार मानावे लागतील.

गेली १५ वर्षे त्याचा माझा परिचय आहे. पण मी ह्या धीरगंभीर प्रकृतीच्या माणसाला खळखळून दिलखुलास हसताना कधी पाहिल्याचं आठवत नाही. बोलणं मोजकं आणि हळू. आपण दहा वाक्य बोलू तेव्हा ह्या महामुनीच्या तोंडातून एखादं वाक्य प्रसवणार! पौरोहित्य करणाऱ्या घराण्याचा वारसा, कॉलेज शिक्षणानं आलेला सुसंस्कृतपणा एकीकडे आणि एका भिन्न संस्कृतीत आणि गोव्याच्या अरे

तुरेच्या भाषेत वाढलेल्या ह्या माणसात दोन परस्पर भिन्न प्रकृतीचे रक्त वाहत आहे हे त्याच्या जवळ जाणाराच्या तात्काळ लक्षात येते. आणि त्याचे चटकेही अनेकदा त्याला बसतात. 'ते तसे' खायची लहर आली की माधव नवलकरना नाहीतर मनोहर वागळ्यांना फोन करील रात्री जेवावयास येतो म्हणून. आणि मुद्दाम आमत्रण लावूनही जाणार नाही बर दुसऱ्या दिवशी क्षमायाचना? नाव नको. कित्येक दिवस त्याबाजूला फिरकणारच नाही. अशा प्रेमानं, हक्कानं जेवावयास जाणाऱ्या घरी आपल्या लग्नाच आमत्रण द्यावयासही विसरेल पण झालेल्या घोडचुकीची दिलगिरी चुकूनही काढणार नाही. कै. जगन्नाथबुवा त्यांच्या गुरूंची विलायत हुसेन खांची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणावर करीत. महिना दोन महिने बुवा अस्वस्थ असत. बुवाचे इतर शिष्य, मित्र सर्वतोपरी सहाय्य करीत. पण जितेंद्र जो आयत्यावेळी गोव्यात दडी मारून बसे तो कित्येक दिवसानी तोंड दाखवी. चार सहा दिवस अभिषेकी आला नाही की बुवा कासावीस होत. शिव्या घालीत, जोड्यान मारतो म्हणत, पण एके दिवशी माहीमहून टॅक्सी करून त्याला खेतवाडीत भेटावयास जात. पण त्याला त्याच काही वाटत नसे. बुवा फार तापले म्हणजे मख्खपणे खाली मान घालून उभं राहावयाच. म्हातारा तापून तापून चार शिव्या घालील त्या मुकाट ऐकून घ्यावयाच्या. निवला की पाय धरायच ही त्याची स्ट्रटेजी! बुवानी त्याचेवर पुत्रवत माया केली पण ह्याला त्याच काय, हे ह्या गभीर माणसाच्या अनेक वर्ष सानिध्यात राहूनही आम्हाला अनाकलनीयच आहे. बुवाची षष्टयब्दी समारभ न भूतो न भविष्यती अशा थाटामाटात आम्ही साजरा केला. त्यातली जितेद्र अभिषेकीची कामगिरी विचारा? शोध करून आणला तरी पुन्हा गायब. गोव्याला दडी मारून बसावयाचा. एकदा कसाबसा तो माझ्या हातात सापडला. स्मरणिकेचे काम हातघाईवर आलेले होतं. समारंभात गाणाऱ्या कलाकाराचा अल्पपरिचय लिहून देण्याची कामगिरी मी त्याचेकडे सोपविली. ह्या पठ्ठ्यान तेथल्या तेथे सध्याकाळपर्यंत बसून एकटाकी सर्व मजकूर लिहून दिला. पुढे दोन दिवस येऊन प्रुफे वाचून दिली आणि पुन्हा निसटला तो कार्यक्रमाच्या दिवशी हजर!

तर असा हा जितेद्र अभिषेकी. रागावू म्हटलं तरी राग येऊ न देणारा. दूर लोटावासा वाटला तरी क्षणातच आपलासा वाटणारा. परस्पर भिन्न स्वभावाचे कगोरे असलेला; आपल्या कलदर, बंडखोर, मानी, जिद्दी स्वभावाचं आपल्या गायकीतून ठायीठायी दर्शन घडवणारा एक कल्पक पण प्रच्छन्न, भावूक पण जोरकस गाणारा सपूर्ण गायक. आम्ही त्याला आहे तसाच पत्करला आहे, कारण त्याच्याविषयीच्या आमच्या आकाक्षा अजून अपुऱ्याच आहेत.

◻ ◻ ◻

# रंगभूमि

शरद गोखले


## संत तुकाराम

चाळीस पन्नास वर्षापूर्वी गाजलेली एखादी नाटयकृती आज पुन्हा हातात घेणे धाडसाचे काम आहे. त्यात व्यावसायिक, हौशी व प्रयोगशील, रंगभूमीवरील आजच्या नाटकाची एकंदर प्रवृत्ती पाहता अशा नाटकाची आर्थिक बाजू तर अशाश्वत अवस्थेत दोलायमान होत असल्याने जुन्या नाटकाचे व्यावसायिक रंगभूमीवर पुनरुज्जीवन करणे हा एक धाडसी जुगार आहे. नाटयसंपदा या आजच्या अग्रेसर नाटयसंस्थेने राजापूरकर नाटक मंडळीने एका काळी अतिशय लोकप्रिय केलेले कै. बाबाजीराव राणे यांचे 'संत तुकाराम' आज पुन्हा रंगभूमीवर आणून जुगाराचा सारीपाट मांडला आहे. नाटकाची निर्मिती, कलाकारांची निवड, संगीत, आणि पुनस्संपादन अशा खुबीने केले आहे की तुकारामाचा हा जुगार एक चांगल्यापैकी 'बिझनेस प्रपोझीशन' ठरावा.

अगदी अलीकडे नानासाहेब शिरगोपीकर यांनी 'तुका म्हणे मी वेगळा' हे नाटक रंगभूमीवर आणले होते आणि ते बऱ्यापैकी यशस्वी ठरले होते. त्यानंतर आलेल्या 'संपदे'च्या या तुकारामाचे आगमन अधिक स्वागतार्ह म्हणावे लागेल.

तुकारामाच्या आयुष्यातील वेचक घटना आणि लोककथा यांचा आधार घेऊन कै. राणे यांनी काही निवडक घटनांवर आपल्या नाटकाची उभारणी केली आहे. तुकाराम व जिजाऊ यांचेमधील प्रसंग त्यांनी घरगुती भाषेत व तुकारामाची विरक्ती सुस्पष्ट होईल, अशा पद्धतीने लिहिले आहेत. मंबाजी, त्याचा शिष्य तुंबाजी आणि अन्य शिष्यवर्ग यांच्या द्वारा साधुमंडळीतील भोंदूगिरीवर त्यांनी अचूक बोट ठेवले आहे. शिवाजी महाराजांकडून आलेला नजराणा, महाराजांची व तुकाराम महाराजांची भेट, शिवाजी महाराजांना पकडावयास आलेल्या मोगलांना ठाईठाई शिवाजी दिसू लागतो, या लोककथेचा उपयोग नाटय खुलवण्यासाठी केला आहे.

नाटयबांधणी आणि लेखन या दृष्टीने कै. राणे यांचे लिखाण आज सामान्य वाटते. 'संपदे'लाही त्याची जाणीव असावी म्हणून तिची मुख्य मदार संगीतावर असल्याचे स्पष्टपणे जाणवते. नाटय-संपादनामध्ये पहिल्या अंकावर अधिक मेहनत घेतली गेली असती तर बरे झाले असते. पहिला अंक प्रदीर्घ व काही वेळा कंटाळवाणा



अनंत वर्तक
सौ. कुमुद चासकर

वाटतो. दुसरा व तिसरा अंक त्या मानाने ठाकठीक आहेत. ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व सांगणारे मंबाजीच्या तोंडचे काही संवाद व ब्राह्मणांवरील (प्रामुख्याने तत्कालीन भिक्षुक वर्ग) टीका किंचित बोथट केली असती, तर ते सुसंगत व आजच्या एकंदर परिस्थितीत साजेसे वाटले असते.

कलाकारांमध्ये स्त्री कलाकार – अर्थातच सौ. कुमुद चासकर (जिजाऊ) व फैय्याज (रंभा) सरळ सरळ सरस ठरतात. सौ. कुमुद चासकर यांच्या अभिनयातील सहजता व संवादफेकीचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. आजच्या प्रयोगशील रंगभूमीवर अभिनयाचे जे स्वरूप दिसते त्या सहजसुंदर व जिवंत प्रकाराशी सौ. कुमुद चासकर यांच्या अभिनयाची जवळीक वाटते. केव्हातरी पाच-सात वर्षापूर्वी प्रभातचा तुकाराम हा चित्रपट मी पाहिला होता. त्यातील विष्णुपंत पागनीस (तुकाराम) व गौरी (जिजाऊ) या दोन व्यक्तिरेखा कायमच्या मनात घर करून बसल्या. तुकारामासंबंधी काहीही पाहताना, वाचताना न कळत त्या चित्रपटातील त्यांच्या अभिनयकौशल्याच्या स्मृती सहज चाळवल्या जातात. सौ. कुमुद चासकर यांची जिजाऊ पहात असताना – ही गौरीबाईंची जिजाऊ मनामध्ये होतीच – सौ. चासकरबाईंची ताकद एवढी की तशा परिस्थितीतही त्या कुठे कमी भासल्या नाहीत. यापेक्षा अधिक कॉम्प्लीमेंटस् काय देणार ?

श्री. अनंत वर्तक यांच्या तुकारामाच्या भूमिकेतील ठळक दोष म्हणजे भूमिकेपासून ते कायम डिटेच् राहिले–दुसऱ्या अंकातील वारकरी मंडळीबरोबर अभंगगायनाचा काही भाग वगळता. प्रयोगसख्येबरोबर हा दोष दूर होईल असे निश्चितपणे वाटते. रभा व तुकाराम यांच्यामधील नाटय-प्रसग व गीत समाधानकारक वाटले. मबाजीची भूमिका वसतराव देशपाडे ठाकठीक करतात. साधु मडळीबरोबरील त्याचे गायन आनद देऊन जाते. विशेषत: "साधु वंदावे वदावे" हे गीत प्रयोगानतरही लक्षात रहावे इतके चागले आहे.

गायन आणि अभिनय याचा सुदर सगम फैय्याज यांच्या रंभेच्या भूमिकेत पहावयास मिळतो. प्रणय-प्रसगामध्ये त्या सुदर भावदर्शन घडवतात. रूप–रंगाचा गर्वाने गौरव करणारी रंभा, आणि विरक्तीतील रभा ही दोन्ही रूपे त्यानी सुस्पष्टपणे वठवली आहेत.

अन्य कलाकारामध्ये मोहन कोठीवान (पंडितराव), नान् संझगिरी (शास्त्रीबुवा) ठीक वाटतात मुबईच्या मडळीनी शिवाजीची भूमिका करणाऱ्या कलाकाराला जितका बदनाम केला आहे तितका काही तो टाकाऊ वाटत नाही. प्रयोगाला रंगत आणण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी भाविक वारकरी मडळीनी उत्कृष्ट वातावरण निर्माण करून बजावली आहे. टाळीचे श्रेय मिळण्याइतकी त्याची कामगिरी चोख आहे. शंकर घाणेकर याना तुबाजीच्या भूमिकेत स्कोप नाही.

सगीत हे या नाटकाचे प्रमुख आकर्षण आहे. या यशाचे मोठे श्रेय श्री. वसंत देसाई याच्याकडे आहे 'श्रीगुरुराया सदया तुकया,' 'पाडुरग श्रीरग भजरे मना,' याच्या चाली गोड आणि कलाकाराचे गायनकौशल्य कौतुकास्पद. श्री. नानासाहेब फाटक यानी प्रयोग नेटकेपणाने बसवला आहे.

रघुवीर तळाशिलकर याचे नेपथ्यकौशल्य प्रयोगाची गरज पूर्ण करणारे, अल्पावधीत स्थलकालातील बदल सूचीत करण्यास योग्य असे वाटले. श्री. विनायक चासकर यांची प्रकाशयोजना प्रयोगाची रगत वाढवणारी आहे. निर्मितीची बाजू समाधानकारक असली तरी चमत्काराना स्कोप असूनही ती संधी साधली गेली नाही. शिरगोपीकर याच्या तुकारामाची ही बाजू अधिक मजबूत, व श्रद्धाळू भाविकांना आकर्षित करण्यास समर्थ होती. तुकारामाचे वैकुंठगमनही यथातथाच वाटले.

मी सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे 'संपदे'चा तुकाराम हे एक बिझनेस प्रपोझीशन असून भाविक प्रेक्षक आणि सगीत शौकीन याचा उदार आश्रय निश्चित असल्याने कै. बाबाजीराव याचा तुकाराम नाटयसपदेची संपदा वाढवून जाईल.

□ □ □




भारताची शकले होण्यापूर्वी सुरू झालेली कहाणी आहे ही.

अफगाणिस्तानशी सलगी करणारी वायव्य सरहद्द त्यावेळी भारताची होती. हा प्रदेश नॉर्थ वेस्ट फ्रॉन्टीयर या नावाने महशूर होता. सरहद्दीवरच्या 'कोहाट' छावणीपासून ६० मैल पश्चिमेस 'थळ' या ट्रायबल एरियात असलेल्या आऊट



पोस्टवर पठाण आणि चोरून व्यापार करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी एक इन्फण्ट्री ब्रिगेड (पायदळ पथक) ठेवण्यात आली होती. या ब्रिगेडमध्ये ग्रिनेडियर्स, पंजाब, आणि डोग्रा रेजिमेंट या पलटणी होत्या.

हिंदुस्तानची शकले होऊन त्याचे 'भारत' आणि 'पाकिस्तान' असे दोन

स्वतंत्र देश बनविण्यात येणार अशी सरकारीरित्या सर्वसाधारण कल्पना एप्रिल १९४७ मध्ये फौजेला देण्यात आली होती.

देशाच्या सौद्याप्रमाणेच लोकाचा, फौजेचा आणि इतर सामान-सुमानाचा बट-वाराही होणार होता. थळ आऊट पोस्टवर असलेल्या तीन पलटणीपैकी ग्रिनेडिअर्स आणि डोग्रा पलटणी हिंदुस्तानी फौजेत व पंजाब रेजिमेंट पाकिस्तान फौजेत अशी विभागणी झाली होती.

ग्रिनेडियर पलटणीचे कमांडिग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल शबियर हे ब्रिटिश होते. त्याचेखेरीज पलटणीत असलेल्या इतर ब्रिटिश ऑफिसर्सनी ३० एप्रिल १९४७ पर्यंत ब्रिटनला परत जावे असे हुकूम फर्माविण्यात आले होते. आतापर्यंत पलटणीचा अॅड्जुटंट ब्रिटीश ऑफिसर असे. लेफ्टनट कर्नल शबीयरनी मला अॅड्-जुटट नेमले. पलटणीचे नवे सेकड-इन्-कमाडर मेजर सावलखान यानी या नेम-णुकीला विरोध दर्शविला. मेजर सावलखान यानी भारतीय फौजेत नोकरी करण्याचा मानस जाहीर केला होता. त्यानी कॅप्टन कुरेशी या मुसलमान ऑफि-सरचे नाव अॅड्जुटटच्या हुद्यासाठी सुचविले. कॅप्टन कुरेशी यानीही भारतीय सेनेत नोकरी करण्याचा निर्णय घेतला होता. पलटणीची कमाड करेपर्यंत त्यांच्याच इच्छेचा ऑफिसर अॅड्जुटट राहील, असे कर्नल शबीयरनी मेजर सावलखानना निःसदिग्ध शब्दात सागून टाकले. या निर्णयावर नाराज होऊन सावलखान आणि कुरेशी यानी आपले मानस बदलले आणि पाकिस्तानी फौजेत नोकरी करण्याचा फैसला केला.

त्यावेळेला ग्रिनेडियर पलटणीत एक 'कैमखानी राजस्तानी मुसलमानाची कंपनी' होती. त्या कपनीतील 'व्हाइसरॉयज कमिशड ऑफिसर्स' (आता याना ज्युनियर कमिशंड ऑफिसर म्हणतात) आणि जवानानी भारतीय सेनेत नोकरी करण्याचा निर्णय घेतला होता. या सर्वांनी तशी लेखी कबुलीही दिली होती. वरील लोकानी भारतीय सेनेत नोकरी करू नये, असा प्रचार आता मतपरिवर्तन झालेल्या कुरेशीनी चालवला, पण त्याना या कार्यात यश आले नाही. अशा या साऱ्या भानगडी होता होता जुलै महिन्याला सुरुवात झाली. आतापर्यंत बटवाऱ्यांचे पक्के निर्णय घेण्यात आले होते. भारतात जाणाऱ्या पलटणी हळूहळू हलू लागल्या होत्या. डोग्रा पलटणही थळहून हिंदुस्थानात परत गेली.

१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून मुक्रर करण्यात आला. ग्रिनेडियर पलटण ३१ ऑगस्ट रोजी हिंदुस्थानात जाण्यासाठी फ्रॉन्टीयर पोस्ट सोडेल असे खाजगीरित्या सागण्यात आले होते. या भागात असलेल्या आणि भारतीय सेनेत सामील होणाऱ्या पायदळ पलटणी (इन्फट्री बटालियन्स), चिलखती पथके (आर्मर्ड रेजिमेटस्), तोफखान्याची पथके (आर्टिलरी रेजिमेटस्) वगैरे १५ ऑगस्टपूर्वी हलविण्यात येणार होत्या. फक्त ग्रिनेडियर पलटण सर्वात शेवटी जाणार होती.




आपसातील हेवे-दावे आणि हिंदु-मुसलमानातील वैमनस्ये या कालात अगदी शिगेला पोचली होती. आकाशवाणी, वर्तमानपत्रे, आणि सुट्टीवरून व वेगवेगळ्या गावांना छोटे छोटे फौजी कोर्स करून येणाऱ्या जवानांकडून, लाहोर, रावळपिंडी, दिल्ली, अमृतसर, जालंधर वगैरे ठिकाणी हिंदु-मुसलमानांच्या कत्तली भरदिवसा सार्वजनिक ठिकाणी सर्रास करण्यात येत आहेत व नाना प्रकारचे अब्रू घेण्याचे

लांछनास्पद प्रकार होत आहेत, अशा मनाला विचलित करणाऱ्या आणि अंगावर शहारे आणणाऱ्या बातम्या कानावर पडत होत्या. १५ ऑगस्ट कसा उजाडतो आणि त्यानंतरचे १६ दिवस येथे कसे कटतात याची हुरहूर लागून राहिली होती.



## पाराचिनार

थळ आऊट पोस्टच्या उत्तरेला सुमारे ५० मैलावर ट्रायबल एरियात पाराचिनार या नावाचे एक छोटेसे देखणे थंड हवेचे ठिकाण आहे. नॉर्थ वेस्ट फ्रॉन्टीयर प्रॉव्हीन्स हा भारताचा भाग अफगाणिस्तानशी भिडला आहे. दोन्ही देशांच्या दरम्यानच्या पहाडी इलाख्यात (नो मॅन्स लँड) पठाण टोळचा धुमाकूळ घालत असल्यामुळे सरकारला या भागात डोळचात तेल घालून सतत जागरूक रहावे लागे. कधी कणखरपणाने तर कधी नरमाईने, प्रसंग पडेल त्याप्रमाणे मोका पाहून वर्तन करावे लागे. कोणत्याही देशाच्या सरहद्दीला भिडलेली राष्ट्रे खऱ्या अर्थाने मित्र-राष्ट्रे नसतात. त्यांच्याशी नेहमी जागरूकपणे, हातचे राखूनच संबंध ठेवावे लागतात. ब्रिटीश सरकारने हे बरोबर हेरले होते आणि त्याप्रमाणे धोरण आखले होते. म्हणूनच या भागावर बारीक नजर ठेवण्यासाठी पाराचिनार या मोक्याच्या पहाडीवर सरकारने पोलिटिकल एजंटची नियुक्ती केली होती. पोलिटिकल एजंटच्या वास्तव्यामुळे या भागात पाराचिनारला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. एजंटसाहेबांच्या व्यतिरिक्त काही मोजक्याच बड्या अधिकाऱ्यांचे बंगले, सरकारच्या मर्जीतील दोन चार शेलक्या अमीर उमरावांच्या कोठ्या, एक दोन मशिदी, छोटासा बाजार वगैरेनी सजलेले असे हे छोटेखानी टुमदार गाव होते.

पाराचिनारला एक छोटंसं चर्चही होतं. या चर्चचे पाद्री कर्नल शबीयर यांचे स्नेही होते. भारत सोडण्यापूर्वी शबीयरनी आपणास भेटून जावे, अशी त्यांनी आग्रहाची इच्छा व्यक्त केली होती.

दिनांक ७ ऑगस्ट रोजी कर्नल शबीयर व मी, दोन जवानांच्या सशस्त्र एस्कॉर्ट-सह जीपमधून पाराचिनारला गेलो.

नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या पहाडीच्या पश्चिम टोकावर ते चिमुकले रेखीव सुंदर चर्च मोठ्या दिमाखात उभे होते. तेथील वातावरण शांत, गंभीर आणि उदास होते. आमची जीप चर्चच्या फाटकाजवळ पोहचताच एक उंच, धिप्पाड बांध्याची शुभ्र वेषधारी व्यक्ती मंद स्मित करीत सामोरी आली. त्यांची लांब शुभ्र दाढी,

छोट्या तेजस्वी डोळ्यावर चढवलेला सोनेरी काड्यांचा चष्मा आणि गळ्यात अडकवलेल्या छातीशी हितगुज करणाऱ्या काळ्या रोझरीने त्याचे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलून दिसत होते. त्याच्याकडे पहाताच माझ्या मनात चटकन विचार आला की, अशा या शांत आणि पवित्र स्थानाला याच्यासारखी भारदस्त व्यक्तीच शोभून दिसते. हेच फादर या चर्चचे मुख्य होते. चर्चच्या अवती भवती छोटासा बगीचा होता. अधूनमधून उच, प्रचड वृक्षही या सौंदर्यात भर टाकत होते. आकाश स्वच्छ निरभ्र होते. कर्नल आणि फादर त्याच्या खोलीत बोलत बसले मी बागेतून फिरत होतो. इतक्यात एक वयस्कर आदमी माझ्याजवळ आला नि म्हणाला, 'कप्तान साब, इधर पधारिये. आपको एक नजाकत दिखाता हूँ.'

असे म्हणत तो मला एका अत्यत जुन्या, पाने झडून गेलेल्या झाडाजवळ घेऊन गेला. ते झाड कोणीतरी १८८० साली लावले होते. झाडाभोवती दगड-चुन्यांनी बाधलेला पसरट भक्कम असा चबुतरा होता. त्या चबुतऱ्यावर उभे राहून पाराचिनार आणि आसंमतातील प्रदेश मोठा मनोहारी दिसे. जवळूनच नागमोडी वळणे घेत गेलेला डाबरी रस्ता थळकडे गेलेला दिसत होता. झाडाच्या खोडावरच चाकूने कोरलेले खालील आशयाचे एक वाक्य इंग्रजीत लिहिले होते—

"हा वृक्ष जितके दिवस या धरतीवर उभा असेल तेवढा कालच ब्रिटिश लोक या भूमिवर राज्य करतील."

योगायोग म्हणा की काही म्हणा त्या झाडाला कीड लागून ते बरेचसे पोखरून निघाले होते. केव्हा कोलमडेल याचा नेम नव्हता. पाराचिनारच्या भेटीनंतर कित्येक दिवस माझ्या मनात विचार येत असे की, ते झाड अजून उभे असेल की १५ ऑगस्टला खतम झाले असेल?

ऑगस्ट महिन्यातील तारीख १४–१५ ची रात्र होती. या रात्री १२ वाजता ब्रिटीश सरकार शकले केलेला हिंदुस्थान, नवनिर्मित भारत आणि पाकिस्तान सरकार-कडे समारंभाने सोपविणार होते. थळ आऊट पोस्टच्या दगडी किल्ल्यात बरीच हालचाल दिसत होती. सर्व बराकी नि छोटे मोठे बगले विद्युद्दीपाने उजळले होते. आसपासच्या गढ्यातून फटाके उडत होते. त्याच्या स्फोटाने होणारा प्रचड आवाज त्या पहाडात नि दऱ्यात घुमत होता. अधूनमधून ढोलक, तुताऱ्या, पडघम वगैरेंचेही आवाज दुमदुमत होते.

१५ तारखेला सकाळी सर्व जवानांनी सेरिमोनियल ड्रेस पेहेनला. किल्ल्यामधल्या प्रशस्त पटांगणात पावणेसात वाजता ग्रिनेडियर पलटण "हॅलो स्क्वेअर" फॉर-मेशनमध्ये उभी राहिली. सारे जवान आपआपल्या हत्यारासह खडे होते. सहा वाजून एकूणसाठ मिनिटानी फलटणच्या पाच ब्युगुलरानी रिवालीचा कॉल वाजवला. त्या कॉलच्या इशाऱ्यावर बटालियन हवालदार मेजरने फ्लॅग पोस्टसमोर

अटेन्शन पोझिशन घेऊन सलाम केला आणि त्या निनादाच्या तालावर रस्सी खेचून पाकिस्तानचा झेंडा वर सरकवत नेला. अस्मानात फडफडणाऱ्या त्या झेंड्याला शस्त्र सलामी देण्यात आली. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जाईल असे सुनावण्यात येऊन परेड विसर्जन करण्यात आली. रात्री ८ वाजता किल्ल्यातील जवानांना बडा खाना देण्यात आला.

१५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाल्यावर आझादीची नशा चढली की काय कोण जाणे, पण थळ आणि आजुबाजूच्या टापूतील रहिवासी भारतात जाणाऱ्या लोकांबरोबर अत्यंत उर्मटपणे वागू लागेल. १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्टच्या दरम्यान फलटणला सर्व आवराआवर करायची होती. थळ येथील मिलिटरी इंजीनिअरींग सर्व्हिसच्या सब डिव्हिजनल ऑफिसरच्या ताब्यात बराकी व फर्निचर द्यायचे होते. पलटणचे आणि जवानांचे सामान भरण्यासाठी वॅगन्स घ्यायच्या होत्या. इलेक्ट्रीसिटी, टेलिफोन, पाणी वगैरेची बिले भागवून हे सामान त्या त्या डिपार्टमेन्टच्या ताब्यात द्यायचे होते. अशी असंख्य कामे होती. पण जेथे जेथे म्हणून पलटणच्या लोकांचा या लोकांशी संबंध येई तेथे तेथे आडमुठेपणा दिसून येई. चीड येण्यासारखे प्रसंग उभे रहात, पण परिस्थितीमुळे सारे सहन करणे भाग पडे. कुरेशी या भागातील रहिवासी होते. त्यांनीही या लोकांकरवी त्रास द्यायला सुरुवात केली. कुरेशींचे पोस्टींग पंजाब रेजिमेंटला झाले होते, पण

"मेरी पुरानी पलटन जबतक यहाँ है तबतक मै उसकी सेवा करूंगा, छोडूंगा नही."

या आवरणाखाली प्रत्येक बारीक सारीक गोष्टीत लक्ष घालून ती बाहेर फोडणे असे सर्रास चालू होते. आमची बटालियन ३१ तारखेला थळहून कूच करणार ही बातमी एका रेल्वे अधिकाऱ्याकडून २८ तारखेलाच बाहेर फुटली. त्याची फार मोठी, कधीही भरून न निघणारी किंमत आमच्या पलटणीला द्यावी लागली.



## पहला हमला

थळ ते कोहाट ही मिटर गेज रेल्वे लाईन आहे. त्यामुळे एका वेळेला आगगाडीतून फक्त अर्धी बटालियनच प्रवास करू शकते. ही अडचण लक्षात घेऊन कोहाट पर्यंतच्या प्रवासासाठी

बटलियनचे ऑफिसर्स, व्ही. सी. ओ.ज व जवान दोन हिश्यात वाटण्यात आले. पहिली आगगाडी ३१ तारखेस सकाळी साडेसात वाजता व दुसरी गाडी दुपारी साडेबारा वाजता सोडण्याचे ठरले. पहिल्या गाडीबरोबर जवानांच्या फॅमिलीज व मिलिटरी इंजिनियरींग सर्व्हिसचा भारतात जाणारा स्टाफही जाणार होता. मेजर सावलखान कोहाटपर्यंत पलटणबरोबर येणार असल्यामुळे पहिली ट्रेन पार्टी त्यांचे अधिपत्याखाली ठीक वेळेवर निघाली. जालंदर छावणीला पलटण जाणार असे कळले.

आमची दुसरी गाडी थळहून ठीक साडेबारा वाजता सुटली. कॅप्टन कुरेशी निरोप द्यायला आले होते. थळच्या स्टेशन मास्तर, गार्ड वगैरे रेल्वे स्टाफशी त्याची बरीच सलगी दिसून आली. रेल्वे अधिकाऱ्यांनी "ट्रेन अॅड्जुटट" म्हणून माझ्या ताब्यात आगगाडी दिली व माझी सही घेतली. तेवढ्यात कुरेशी निरोप घेण्यासाठी आले व हस्तादोलन करत म्हणाले,

> "जाधवसाहब रेलगाडी अच्छी तरहसे देखके लेना, नही तो कोहाटमे रेल्वेवालोंको ट्रेन वापस करते वक्त आपको तकलीफ होगी. आपकी सफर आरामसे गुजरे. खुदा हाफीझ."

कुरेशीच्या बोलण्यातील खोच माझ्या लक्षात त्यावेळी आली नाही, पण जिंदगी-भर याद राहील असा अनुभव मात्र चांगलाच आला.

थळपासून ३५ मैल दूर असलेल्या हंगू या स्टेशनवर सध्याकाळी चार वाजता आमची आगगाडी पोचली. तेथील हॉल्ट संपल्यावर उरलेल्या २५ मैलांच्या प्रवासाला सुरुवात झाली. हंगू ते कोहाट हा रस्ता चढ-उताराचा असल्यामुळे या भागातून गाडी मंद गतीने जाते. या २५ मैलापैकी ८ मैलाचा प्रदेश डोंगराळ आहे. डोंगर, नाले, दऱ्या वगैरे असल्यामुळे या भागातून जाणारा रस्ता वळणावळणाचा आहे.

डोंगराळ भागात साधारण तीन मैल आत शिरल्यावर एका वळणावर आगगाडी अकस्मात थांबली. का थांबली म्हणून पहायला खिडकीबाहेर तोंड काढतो न काढतो तोच चारी बाजूने आगगाडीच्या रोखाने बंदुकीच्या गोळ्यांचा मारा सुरू झाला. एका डोंगराच्या पायथ्यापासून जाणाऱ्या नाल्याच्या किनाऱ्याने जाणाऱ्या रुळांवर आमची गाडी उभी होती. सर्व बाजूने घेरलेल्या डोंगर आणि टेकड्यामध्ये ती पकडली गेली होती. दोन चार क्षणातच आगगाडी घेऱ्यात आल्याचे सर्वांच्या लक्षात आले. कमांडींग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल शबीयरनी आगगाडीतून बाहेर उड्या टाकून जागा मिळेल तेथे आपआपल्या हत्यारासह पोझिशन घेण्याचा हुकूम सर्वांना दिला. हुकूम मिळताच खिडक्या दारे जे जवळ दिसेल त्यातून जवानांनी खाली उड्या टाकल्या व मिळेल ती जागा पकडण्याचा प्रयत्न केला. जवानांवर गोळीबार करणारे लोक उंच जागेवर होते व पहिल्यापासूनच तयारीने बसले होते. खाली पडलेल्या जवानांवर नेम धरून त्यांना छानपैकी टिपता येत होते. पहिल्या पाच मिनिटातच आमचे पंधरा जवान जखमी झाले. पलटणचे एक मेजर स्टॅनले

मेनेंझिस बारा जवानांची एक तुकडी घेऊन एंजिनच्या दिशेने गेले. ड्रायव्हरचा पत्ताच नव्हता. एंजिनच्या पुढेच साधारण ३० पावलांवर मोठमोठे दगड एकमेकावर रचून रुळावर ठेवले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी ताबडतोब टोळी दोन हिस्यात वाटली. एक हिस्सा रस्ता साफ करू लागला. दुसऱ्या टोळीने त्यांच्या चारी बाजूला मोक्याची जागा पकडून नजरेत येणारा दुष्मन टिपायला सुरुवात केली. गोळ्यांच्या माऱ्याची पर्वा न करता रोड ब्लॉक काढायला मेनेंझिस स्वतः बेडरपणाने जवानाना मदत करत होते. तसेच संरक्षण देणाऱ्या टोळीला दिग्दर्शन करत होते. मेनेंझिग जवानांचे अत्यंत लाडके ऑफिसर होते. ते हुशार आणि कुशाग्र बुद्धीचे असून फौजेतील महत्त्वाच्या व जोखमीच्या जागांवर त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. त्यांची स्मरणशक्ती अचाट आहे. ही रिअली पझेसीस फोटोग्रॅफीक मेमरी. जवानाचा संपूर्ण विश्वास संपादन करून लढाईत ते उत्तम नेतृत्व करू शकतात. तसेच ॲडमिनिस्ट्रेशन आणि इन्स्ट्रक्शन या क्षेत्रात त्यांचा हात धरणारा ऑफिसर मिळणे विरळाच. सध्या ते मेजर जनरलच्या हुद्यावर असून एक इन्फंट्री डिव्हिजन कमाड करत आहेत. भारतीय सेनेत वयाने ते सर्वात लहान डिव्हिजनल कमांडर आहेत.

उरलेल्यापैकी एक तुकडी कॅप्टन कारवाल यांच्या नेतृत्वाखाली पूर्वेकडे असलेल्या पहाडीकडे, दुसरी तुकडी कॅप्टन कानन यांचे हुकमतीखाली पश्चिमेकडील टेकडीकडे, तिसरी तुकडी कॅप्टन बमला याचे बरोबर दक्षिणेकडील पठारावर आणि चौथी तुकडी माझे नेतृत्वाखाली उत्तरेकडील टेकडीवरून जाणारा थळ-कोहाट रस्ता काबीज करण्यासाठी पाठविण्यात आली. कर्नल शबीयरनी आपली कमांड पोस्ट, उत्तरेकडील माझ्या पथकामागेच बसवली. तेथून त्यांना सर्व टोळयांच्या हालचाली दिसत होत्या व वायरलेस वरून ते हुकूम देत होते. आता पलटणीने मोक्याच्या जागा पकडून गोळीचा जबाब गोळीने द्यायला सुरुवात केली. काही अवधी गेल्यानंतर कोहाटचे पोलीस कमिशनर मोटारीने कोहाटहून हंगूकडे जाताना दिसले. त्यांची मोटार जवळ आल्यावर कर्नल शबीयरनी रुमाल हलवून ती थांबविली. कमिशनरला पाहिले म्हणून की काय कोण जाणे, पण आमच्यावर होणारा गोळीबार एकदम थांबला. ठिकठिकाणाहून सफेत झेंडे पण नजर येऊ लागले. कर्नल शबीयर खूप संतापले होते. पोलीस कमिशनर ब्रिटिशच होते व ते कर्नलच्या चांगले पहचानीतले होते. कर्नलनी त्यांना ही काय भानगड आहे म्हणून विचारले. कमिशनर पण बुचकळयात पडले. त्यानी फ्रांटीयर मिलीशियाच्या ऑफिसरला आगगाडीवर गोळीबार का केला म्हणून विचारले. ऑफिसरने सॅल्यूट करून जबाब दिला,

> 'येथे पठाण टोळीवाले येऊन दबा धरून बसले होते. त्याना पिटाळून लावण्यासाठी आम्ही त्यांच्यावर गोळीबार केला. तर या मिलिटरीच्या जवानांनी उलट आमच्यावर गोळया झाडल्या.'

वास्तविक वस्तुस्थिती वेगळीच होती. यांच्याच लोकांनी पद्धतशीरपणे आमच्यावर गोळीबार केला होता. पण ती वेळ व प्रसंगच असा होता की कोणी कोणाला जाब विचारू शकत नव्हते. या चकमकीत आमचे कॅप्टन बूमला, कॅप्टन कारवाल, तीन व्ही. सी. ओ.ज व सोळा जवान जखमी झाले. अंधार पडू लागला होता. कोहाटला शक्य तितक्या लवकर पोचणे जरूर होते. पोलीस कमिशनरनी कर्नलना आमचे जवान आगगाडीत बसायला पाठविण्याची विनती केली व त्यांनी आमची आगगाडी या डोंगरी मुलुखातून पार होईपर्यंत स्वतः तेथे राहणार असल्याची ग्वाही दिली. कर्नलनी सीझ फायरचा हुकूम दिला. मी ब्युगलरला सीझ फायरचा कॉल वाजवायला सांगितले. त्यानंतर ताबडतोब आगगाडीत चढण्याचा इशारा देणारा टू जीज (Two G's) कॉल वाजवताच जखमींना घेऊन जवान आपआपल्या डब्यात परतले. हे सर्व होईपर्यंत इंजिन ड्रायव्हर व रेल्वे गार्डही आपआपल्या जागेवर येऊन पोचले. मी त्यांना हा काय प्रकार आहे असे विचारले. जर खरे सांगितले नाही तर गोळ्या घालण्याची धमकी दिली. त्यांनी सर्व हकीगत सांगितली. रेल्वेच्या मार्गावर दगड कोठे ठेवले होते, गाडी कोठे उभी करावयाची व त्यांनी कोठे दडायचे हे त्यांना सारे माहित होते असे ते म्हणाले. आम्हाला हे सारे आगावू का सांगितले नाही असे विचारल्यावर ते म्हणाले,


> ' हमे पाकिस्तानमे रहना है. अगर हम उपरवाले अफसरोंका हुकुम ना माने तो गोलीका निशान बन जायेंगे. '
>
> मी त्यांना विचारले, ' तुम लोगोंको यह सब किसने दिखाया ?'
>
> त्यावर ड्रायव्हर म्हणाला, ' कल सुबे मिल्ट्रीका एक साब हमे जीपमे बिठाके यहां ले आया था. उसने सब जगह दिखाई. '

हे ऐकून कुरेशींची मूर्ती माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली. थळ स्टेशनवर हस्तांदोलन करीत असताना त्याने उच्चारलेले --

> ' जाधव साहाब रेलगाडी अच्छी तरहसे देख लेना. नही तो कोहाटमे रेल्वेवालोंको ट्रेन वापस करते वक्त आपको तकलीफ होगी. आपकी सफर आरामसे गुजरे. खुदा हाफीझ. '

हे शब्द आठवले नि अंगाचा संताप झाला.

रात्री दहाच्या सुमाराला आमची आगगाडी कोहाटला पोचली. स्टेशनवरून टेलिफोन करून हॉस्पिटलमधून ॲम्ब्युलन्स मागायचा प्रयत्न केला. पण कोणी जबाब देईना. घायाळ जवानांचे हाल पहावत नव्हते. शेवटी मिळेल त्या वाहनात जखमी घालून त्याना मिलिटरी हॉस्पिटलमध्ये नेले. पलटणीच्या जवानांचा रहाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी मी जागा पाहू लागलो. इतक्यात रेल्वेचा एक अधिकारी आम्ही प्रवास केलेल्या गाडीचा डॅमेज रिपोर्ट घेऊन आला. आगगाडीवर वाटेत झालेल्या गोळीबारामुळे सर्व डब्यांना असंख्य भोके पडली होती. काही खिडक्यांच्या



पहला हमला - थळ कोहाट मार्ग - दिनांक ३१ ऑगस्ट १९४७
W
E
S
रस्ता
थळकडे
कोहाटकडे
उत्तर टेकडी
पश्चिम टेकडी
रस्ता
पूर्व टेकडी
रोड ब्लॉक
हंगू
४ मैल
थळकडे
दक्षिण टेकडी
कोहाटकडे
१० मैल

काचा व शटर्स फुटले होते. हे सारे नुकसान आमच्यामुळे झाले असा त्याचा दावा होता. मी भडकलो नि म्हणालो,

'येथे वीस पंचवीस जीवाची हानी झाली त्याबद्दल हमदर्दी तर राहिलीच पण साधी वैद्यकीय मदतही मिळू शकत नाही. आणि जे नुकसान आमच्यामुळे झालेच नाही त्यावर माझीच सही मागता? कमाल आहे.'

त्यावर ते महाशय बोलले,

'थळ स्टेशनसे चलते वक्त बाकायदा इन्सपेक्शन करके रेलगाडी आपने कब्जेमे ली और दस्तकत देदी. अब उसी हालतमे गाडी वापस करनी होगी वरना नुकसानीका डॅमेज देना होगा.'

पलटणीचे ऑफिशिएटिंग सुभेदार मेजर खेमचद माझ्याबरोबरच होते. रेल्वेच्या अधिकाऱ्याचे हे मासलेवाईक उत्तर ऐकताच ते संतापाने लाल झाले नि रागाच्या भरात त्यांनी त्याच्या गालफाडात एक सणसणीत ठेऊन दिली. त्याच्या हातातले रजिस्टर हिसकावून घेऊन फाडून चोळामोळा करून फेकून देता देता अस्सल जाटु भाषेतील शेलकी शिवी हासडून म्हणाले –

'...... अब तुमने जुबान खोली तो जानसे मारूंगा और इसी इंजिनके नीचे रगड दूंगा.'

त्यानतर तो अधिकारी जो गायब झाला तो परत आलाच नाही.

रात्री बारा वाजेपर्यंत मी जवानांची स्टेशन यार्डमध्ये रहाण्याची व सामान ठेवण्याची व्यवस्था केली. जमादार अॅड्जुटंट, जमादार उदेरामना सत्री व पहारे ठेवण्याच्या जागा दाखवल्या. त्यासाठी लागणाऱ्या जवानांच्या ड्युटीज वाटल्या व पुढील प्रवासाची माहिती घेण्यासाठी स्टेशन मास्तरच्या ऑफिसमध्ये गेलो. कोहाटहून रावळपिंडीला जाण्यासाठी दोन स्पेशल ट्रेन्स व सात वॅगन्स मिळाल्याचे तेथे कळले. पहिली ट्रेन सकाळी ७–३० वाजता व दुसरी ट्रेन त्यानंतर एक तासाने सुटणार होती. एवढ्यात कर्नल शबियर व मेजर मेनेझिस मिलिटरी हॉस्पिटलमध्ये जखमी जवानाची व्यवस्था लावून परत आले. मी त्याना पुढील प्रवासाबावत माहिती देताच कर्नल स्टेशन मास्तरला भेटले व म्हणाले –

'सकाळी ७–३० वाजता निघणे आम्हाला शक्य नाही. कारण जखमी जवानांची देखभाल व पुढील व्यवस्था इतक्या रात्री होणे अशक्य. ते उद्याच करता येईल. तरी एक दिवसाचा अवधी मिळावा.'

स्टेशन मास्तरनी सांगितले की ते एक दिवसही अधिक ही ट्रेन रोखू शकत नाहीत. कारण त्याना तसे अधिकार नाहीत. ते पुढे म्हणाले –

'आज ट्रॅफीक सुपरिंटेंडेंट रावलपिंडीसे यहाँ आये है. इस बारेमे आप उनके साथ बोल सकते हैं.'

कर्नल शव्हियरनी कोहाट इंडिपेंडंट ब्रिगेड व डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस याच्याशी सपर्क साधून रेल्वे अधिकाऱ्याशी वाटाघाटी केल्या.

रेल्वेच्या अधिकाऱ्यानी घडलेल्या अपघाताबद्दल हमदर्दी प्रकट केली. मुख्य विषयाला हात घालत कर्नल शवियर म्हणाले–

'उद्याच्या उद्या येथून निघणे आम्हाला शक्य होणार नाही. कारण जे जखमी हॉस्पिटलमध्ये ठेवले आहेत त्याना सकाळी हलवणे जमणार नाही.'

रेल्वे अधिकारी म्हणाले–

'कर्नलसाहेब, माफ करा पण या दोन्ही स्पेशल ट्रेन्स खास तुमची पलटण येथून उद्या सकाळी नेण्यासाठीच मुद्दाम मागविण्यात आल्या आहेत. मी त्या थाबवू शकत नाही. कारण पुढील १५ दिवसात बऱ्याच वाहतुकी करावयाच्या आहेत. ठरल्याप्रमाणे जर तुमची पलटण हलली नाही तर पुढचा सर्व प्रोग्रॅम अपसेट होईल. म्हणून उद्या ठरल्याप्रमाणे तुमची पलटण निघालीच पाहिजे. जखमी जवानाची आम्ही देखभाल करू. तुम्ही नि शकपणे जा.'

यावर कर्नल शवियर म्हणाले–

'जर उद्याच्या उद्या निघणे आम्हाला भागच असेल तर आजच्या प्रसगाची पुनरावृत्ती न होण्याच्या दृष्टीने कोहाट पासून १८ मैलावर असलेल्या ४ मैलाच्या डोगराळ भागातून आगगाडी बिनधोक जाण्याचे मला अभिवचन हवे. यासाठी ट्रेन कोहाटहून सुटण्यापूर्वी एक पायलट इजीन आमच्या जाणाऱ्या गाडीच्या पुढे जाऊ दे.'

'ते शक्य नाही.' रेल्वे अधिकारी बोलले.

'जर हे शक्य नसेल तर आगगाडीच्या इजीनपुढे तीन प्लॅट वॅगन्स जोडा आणि डोगराळ भागातून ट्रेन जाताना सरक्षणासाठी फौजी आणि पोलीसची पिकेट्स् लावावी अशी मी विनंती करतो.' कर्नल बोलले.

रेल्वे अधिकाऱ्यांनी प्लॅट वॅगन्सही देण्याचे नाकारले. पण ब्रिगेडीयर आणि डी. एस्. पी. याचेशी विचार विनिमय करून पंजाब रेजिमेंटची एक रायफल कपनी व फ्रांटीयर मिलिशियाची एक कपनी याचे डोगराळ भागातून जाणाऱ्या ट्रूप्स स्पेशल ट्रेनना सरक्षण द्यायचे अभिवचन दिले.

संरक्षण देणाऱ्या दोन्ही कंपन्यांनी फ्रांटीयर मिलीशियाचे कॅप्टन थॉमसन् याच्या नेतृत्वाखाली काम करायचे ठरले.

डोगराळ भागात शिरण्यापूर्वी १८ मैल स्टोन जवळ थॉमसननी स्वतःची खात्री करून घेऊन रेल्वे लाईन क्लीअर असून संरक्षणाचा कडेकोट बंदोबस्त असल्याचा

रिपोर्ट कर्नल शबियरना द्यायचा व कर्नल साहेबांची खात्री पटल्यावर आगगाडी पुढे नेण्याचा हुकूम त्यांनी द्यायचा असे ठरले.

हा बंदोबस्त करण्यासाठी वेळ पाहिजे म्हणून पहिली स्पेशल ट्रेन सकाळी १० वाजता व दुसरी ट्रेन सकाळी ११ वाजता कोहाटहून सोडण्याचे ठरले.

ब्रिगेड हेडक्वॉर्टर्सच्या बंदोबस्ताखाली पलटणचे सर्व जखमी हॉस्पीटलमधून सकाळी ८ वाजेपर्यंत स्टेशनवर पाठविण्याचे ठरले.

स्टेशनवर पोचल्यावर कर्नलनी सर्व ऑफिसर्स आणि व्ही. सी. ओजना ऑर्डर्स दिल्या. ते म्हणाले–

> 'आपल्या बटालियनसाठी दोन स्पेशल ट्रेन्स मिळाल्याचे तुम्हाला माहित आहेच. पलटणचा ऑर्डर ऑफ मार्च थळहून निघताना होता तोच राहील. पण मी स्वत. अॅड्जुटट कॅप्टन जाधव आणि थ्री इंच मॉर्टर प्लॅटून (उखळी तोफांचे पथक) पहिल्या स्पेशल ट्रेनमधून प्रवास करू. दुसऱ्या स्पेशल ट्रेनची कमांड मेजर मेनेंझिस करतील. पहिली आगगाडी सकाळी दहा वाजता निघेल. गाडीच्या इंजीनमधून लेप्टनट ठाकूर नागेंद्रसिंग एका जवानासह प्रवास करतील. फर्स्ट लाईन अॅम्युनिशन पर्सनल हत्याराबरोबर बाळगले जाईल. जरूर पडली तर थ्री इंच मॉर्टर उपयोगात आणण्यात येईल. पण माझ्या व्यक्तिशः हुकुमाखेरीज गोळीबार करायचा नाही. आगगाडीच्या प्रत्येक डब्यातून वायरलेस व टेलिफोन कम्युनिकेशन ठेवले जाईल. तसेच पहिल्या आणि दुसऱ्या ट्रेनमध्ये हाय पॉवर वायरलेस सेटनी मिलाप ठेवण्यात येईल. आपल्या-बरोबर असणारे सिव्हिलियन्स आणि जखमी जवान दुसऱ्या ट्रेनमधून प्रवास करतील. जवानाच्या फॅमिलीज पहिल्या ट्रेनमधून प्रवास करतील. दुपारचे व रात्रीचे अशी जवानाची दोन्ही जेवणे सकाळी आठपर्यंत पकऊन प्रत्येकाला वाटून दिली जातील. सर्व जवान फिल्ड सर्व्हिस मार्चींग ऑर्डरमध्ये आपआपल्या डब्यासमोर सकाळी ९–३० वाजता माझ्या इन्सपेक्शनसाठी फॉलइन होतील. आखरीमें मैं सिर्फ यह कहना चाहता हूँ केह मुझे पुरी उम्मीद है केह ग्रिनेडियर्सके झंडे कि इज्जत सब जवान आखरी दम तक रखेंगे. मेजर मेनेझिस–फॉल आऊट दि ऑफिसर्स अॅन्ड व्ही. सी. ओ. ज.'

मेजर मेनेंझिस म्हणाले–

> 'ऑफिसर्स अॅन्ड व्ही. सी. ओ.ज अटेन्शन. ऑफिसर्स अॅन्ड व्ही. सी. ओ. ज फॉल आऊट.'

या हुकुमाबरोबर सर्वजण सावधान झाले. एक स्टेपपुढे मार्च करून स्मार्ट सॅल्यूट करून राईट टर्न होवून आपआपली कामे करण्यासाठी निघून गेले. खेमचद आणि

मी तेथेच रेंगाळलो. खेमचंदच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनात काही तरी बोलायचे आहे असे मला वाटले म्हणून मी विचारले–

'साब, क्या सोच रहे हो. कुछ कहना चाहते हो क्या ?'

त्यावर खेमचद चटकन 'हा साब' म्हणत माझ्या कानाशी हलक्या आवाजात बोलला–

'गेल्या दोन तीन आठवड्यात मुसलमानांनी या भागात व हिंदु–शिखांनी भारताच्या इलाख्यात सिविलीयन्सनी भरलेल्या आगगाड्या अडवून त्यावर कैक हल्ले केले. गाड्या लुटल्या, कतली केल्या. पण मिलिटरी स्पेशल गाड्यावर आतापर्यंत एकदाही हमला झाला नव्हता. पहिला हमला आपल्याच रेलगाडीवर झाला. याच कारण या भागातून भारतात जाणाऱ्या पलटणीत आपली पलटण सर्वात शेवटी जात आहे आणि कालचा हमला होण्यामागे दुसरंही एक कारण असावं असं मला वाटतं. ते म्हणजे सहा महिन्यापूर्वी याच कोहाट शहरात गुंडानी दंगा केला होता. शांतता निर्माण करण्यासाठी आपली पलटण या गावात आठ दिवस तळ ठोकून बसली होती. तिने नाक्या नाक्यावर चौक्या लावल्या होत्या. आपल्या जवानाच्या टोळ्या शहरातून रात्रंदिवस गस्त घालत फिरत होत्या. गुड लोकांच्या स्वैर वर्तनाला आळा बसला होता थोडी जादा बदमाशी होताच एक दोन मोहल्यात गोळीबारही केला होता. काही धरपकडी झाल्या. या लोकांनी तो डूक मनात ठेवला आहे आपण कर्नल साहेबांबरोबर बाहेर गेला होतात त्या अवधीत मी थोडीशी कुजबूज ऐकली. आपल्या सध्याच्या सफरीत जरूर धोका होणार असा माझा अदाज आहे आपल्याला काळजीपूर्वक वागायला हवं.'

मलाही खेमचदचे म्हणणे पटले. आमच्या आगगाड्याना कोहाट-रावळपिंडी भागातील डोगराळ भागात धोका होईल अस माझ्या मनात सारखं येत होतं. आमच्या सरक्षणासाठी ठेवण्यात येणाऱ्या पाकिस्तानी फौजेबद्दल माझ्या मनात खात्री नव्हती खेमचंदला मी रेल्वेच्या अधिकाऱ्याबरोबर झालेल्या संभाषणाचा गोषवारा सागितला त्यावर चवताळून खेमचद म्हणाला,

'साब, या वेळेला हे हरामखोर रूल उखडून टाकायलाही कमी करायचे नाहीत, अस मला वाटत.'

जड सामान वहाण्यासाठी मालाचे सात डबे मिळाले होते. हे मालाचे सर्व डबे पहिल्या स्पेशल ट्रेनला शेवटी जोडले होते. हे मालाचे डबे पॅसेंजर बोग्याच्या पुढे जोडले तर आगगाडीला वरील प्रकारचा अपघात झाल्यास त्याचा जास्तीत जास्त भार या माल डब्यावर पडेल असा आम्ही दोघांनी विचार केला व ड्युटीवर असलेल्या असिस्टंट स्टेशन मास्तरकडे जाऊन त्याला तशी विनंती केली. त्याने ती

सरळ धुडकाऊन लावली नि म्हणाला,

'जनाब, शंटीग करणाऱ्या इजीनची ड्युटी संपली आहे. आता ते परत येऊ शकणार नाही. आगावू सागितले असते तर बंदोबस्त केला असता.'

मी म्हणालो,

'देखो, स्टेशन मास्तर साब, सात डबे राहू देत, पण निदान मालाचे चार डबे तरी जोडून द्याच. जर इंजीन मिळत नसेल तर आम्ही जवानांच्या मदतीने डबे ढकलत नेऊन आगगाडीला जोडू. केबीनमन आणि लाईनमनना मात्र काही करून तुम्ही सागाच.'

आमच्या सुदैवाने त्याने ही विनती मान्य केली. खेमचदने जवान एकठ्ठे करून चार वॅगन्स पहिल्या गाडीला आणि तीन वॅगन्स दुसऱ्या गाडीला जशा पाहिजे तशा लावून घेतल्या.

पहिल्या गाडीचा मधला डबा बायका आणि मुलाकरिता राखून ठेवला. सर्व जवानाच्या किट ब्यॅगा आणि बिस्तरे एकत्र करून डब्याच्या आतून चारी बाजूने तिहेरी लावून त्याची भित उभी केली. जर या डब्यावर गोळीबार झालाच तर डब्यात शिरणारी गोळी या बनवलेल्या भितीत रुतावी आणि आत बसलेल्या मडळीना इजा होऊ नये हा यामागील हेतू होता.

ऑफिसरासाठी फर्स्टक्लासचा वेगळा डबा होता. पण आजचा प्रवास 'टॅक्टीकल' पद्धतीचा असल्यामुळे सर्व ऑफिसर आणि व्ही. सी. ओज त्याच्या त्याच्या कंपनी आणि प्लटूनमधल्या जवानाच्या डब्यातून प्रवास करणार होते. कर्नल शबीयर, सुभेदार मेजर खेमचद, जमादार अॅड्जुटट, बटालियन हेड क्वॉर्टर्सचे जवान, पलटणचे पडतजी, मौलवीजी आणि माझ्या वायरलेस स्टेशनच्या जवानांसह मी एका 'मिलिटरी ट्रूप कॅरीइंग' डब्यातून प्रवास करणार होतो.

सकाळी नऊ वाजता बटालियन सिग्नल ऑफिसर कॅप्टन काननती सारे वायरलेस सेटस् नीट केले. त्यानी सर्व आऊट स्टेशन्सना फिक्वेन्सी आणि कोड वर्ड्स् दिले. अचानक हल्ला वा इतर गडबड झाली तर गाडीतून बाहेर पडण्याचा कोड वर्ड 'चमन' हा मुक्रर करण्यात आला. सर्व टर्युनिग झाल्यावर सहज गम्मत म्हणून काननने ऑल इडिया रेडिओवर इडीयन न्यूज लावली. त्यात पहिलीच खबर आली ती—

काल तारीख ३१ ऑगस्ट रोजी थळहून कोहाटला जाणाऱ्या मिलीटरी स्पेशल ट्रेनवर गोळीबार झाला. काही सैनिक जखमी झाले.'

ही बातमी काननने ताबडतोब सर्वांना सागितली. आमच्या मनात विचार आला की ही बातमी जर आपल्या कुटुबियानी ऐकली असेल तर ते अत्यत काळजी कर-

तील. तार, टेलिफोन वा पत्रद्वारासुद्धा आम्ही स्वतःची खुशाली त्यांना कळवू शकत नव्हतो. कारण आझाद हिंदुस्तान आणि पाकिस्तानमधील दळणवळण सर्वस्वी संपुष्टात आले होते.



## दुसरा हमला

सकाळी ९ वाजता तीन ॲम्ब्युलन्स कारमधून मिलीटरी हॉस्पीटलमध्ये ठेवलेले पेशंटस् जवान स्टेशनवर आणले गेले. त्यांच्याबरोबर मेजर आणि डॉक्टर मिसेस खान हे दाम्पत्यही आले. मेजर खान हे याच पलटणचे ऑफिसर असून पेशावर एरिया हेडक्वार्टर्समध्ये स्टाफ अॅटॅचमेन्ट करत होते. त्यांनी भारतीय फौजेत नोकरी करण्याचा निर्णय घेतला होता. मिसेस खान या ख्रिश्चन असून मलबारच्या रहाणाऱ्या होत्या. त्या मुंबई विद्यापीठाच्या एम. बी. बी. एस. होत्या. पलटणच्या सर्व पेशंटस्‌चा चार्ज त्यांनी मोठ्या आवडीने घेऊन त्यांच्या सुश्रूषेकडे जातीने लक्ष द्यायला सुरुवात केली. मेजर खान त्यांना मदत करत होते. या सर्व जखमींना खास त्यांच्यासाठी जोडलेल्या डब्यात ठेवण्यात आले.

दोन्ही स्पेशल ट्रेन्स प्लॅटफॉर्मला लागल्या होत्या. पलटणचे सर्व जवान फील्ड सर्व्हिस मार्चींग ऑर्डरमध्ये आपआपली हत्यारे पकडून ब्युगल कॉलच्या इशाऱ्याची वाट पाहू लागले. साडे नऊ वाजता ब्युगलरने रेजिमेंटल कॉल आणि फॉल इन ट्रूप्स कॉल वाजवताच जवान आपआपल्या डब्यासमोर दोन रांगात उभे झाले. ऑफिसर्स आणि व्ही. सी. ओज आपआपल्या जागी गेले. सर्व पलटण सावधान होताच कर्नल शबीयरनी इन्स्पेक्शन केली. कर्नल म्हणाले,

> ‘दक्षतेने वागा. जागरूक रहा. प्रत्येकाजवळ हत्यार आणि ॲम्युनिशन आहे ते जरूर पडेल तरच व योग्य ठिकाणीच वापरा. माझ्या हुकुमाशिवाय गोळीबार करू नका.’

एवढे बोलून कर्नल वेटींगरूममध्ये गेले. तेथे पलटणला भेटायला आलेले कोहाट ब्रिगेडचे ऑफिसर्स होते. ब्युगलरने ‘टू जी’ कॉल वाजवल्यावर पुढील रांग उजवी

कडे वळली. मागील रांग डावीकडे वळली. आगगाडीच्या डब्याच्या दोन्ही दरवाजाने जवान एका पाठोपाठ आत शिरले.

९ वाजून ५५ मिनिटाने ब्युगलरने अॅडव्हान्स काल वाजवताच सर्व ऑफिसर्स आणि व्ही. सी. ओज डब्यात शिरले. कर्नल शवीयरही पोचवायला आलेल्या ऑफिसरांचा निरोप घेऊन डब्यात शिरले. ठीक १० वाजता गार्डने हिरवी झडी हलवत इंजीन ड्रायव्हरला इशारा केला. इजीनने मोठी शीळ घालत गाडी ओढायला सुरुवात केली. गाडीत बसलेल्या जवानानी व दुसऱ्या स्पेशल गाडीने प्रवास करणाऱ्या प्लॅटफॉर्मवर उभे असलेल्या जवानानी पलटणचा जयजयकार केला. रेजिमेंटला बॅटल क्राय 'बोलो श्री रामचद्रजी की जय' चा ललकार पुकारला. या ललकाराने सारे कोहाट स्टेशन दुमदुमून गेले.

पावणे अकरा वाजता आगगाडी कोहाट–रावळपिंडी रस्त्यावर अठराव्या मैलाच्या दगडाजवळ ठरल्याप्रमाणे थांबली. येथून डोंगराळ प्रदेशाला सुरुवात होत होती. येथे कॅप्टन थॉमसन, मिलीशियाच्या दोन जवानांसह कर्नल शवीयरना भेटले आणि सॅल्युट करून म्हणाले–

'रेल्वेचा ट्रॅक ठीक आहे. ठिकठिकाणी पिकेटस् लावली आहेत. काही धोका नाही. आगगाडी पुढे जाण्यास हरकत नाही.'

कर्नल शवीयरनी थॉमसनचे आभार मानले व गाडी पुढे नेण्याचा इशारा दिला. आगगाडी पुन्हा चालू होताच जवानही आपआपली शस्त्रे व्यवस्थित पकडून पण खिडकीच्या बाहेर न दिसतील अशा ढंगाने तयारीत बसले. हळूहळू गाडी डोंगराळ भागात शिरली. वळणे घेत घेत चारी बाजूला असलेल्या पहाडामधून त्यांच्या पायथ्याच्या सहाय्याने ती जात होती. साधारण दोन अडीच मैल आत गेल्यावर एक पसरट नाला आला. तो कोरडा होता. त्यावर एक छोटासा पूल होता. त्या पुलाच्या आमच्या बाजूच्या टोकाला इजीन जेमतेम पोचले असेल नसेल तोच दोन तीन मोठमोठे धक्के देऊन गाडी थांबली एकमेकांवर आदळण्याऱ्या डब्यांचा, आतील प्रवासी एकमेकावर फेकले गेल्याचा, त्याच्या ओरडण्याचा, स्त्रिया आणि मुले याच्या किंचाळण्याचा, रडण्याचा, सामान इकडून तिकडे विखुरले गेल्याचा असे वेगवेगळ्या प्रकारचे चित्र–विचित्र आवाज त्या दरीत घुसळून, घुमून निनादले.

पुलावरील रुळावरच्या फिशप्लेटस् काढल्या असून आगगाडीचा पुढील भाग रुळावरून खाली घसरला आहे हे चटकन आमच्या लक्षात आले.

कर्नलनी मला फौरन इशारा दिला. मी तावडतोब वायरलेस कट्रोल सेटवरून सर्व आऊट स्टेशन वायरलेस सेटस्‌ना पुकारले–

'हॅलो, ऑल स्टेशन्स चार्ली. चमन. आय से अगेन चमन. ओव्हर.'

गाडीतील कपन्याकडून तावडतोब जवाब आले–

ए कपनी–'हॅलो चार्ली वन. विल्को आऊट.'

सी कंपनी–' हॅलो चार्ली थ्री. विल्को आऊट.'

मॉर्टर प्लटून–' हॅलो चार्ली एट. विल्को आऊट.'

कमाडीग ऑफिसर्स रोव्हर सेट– हॅलो चार्ली टेन, विल्को आऊट.'

कमाडर नबर टू ट्रेन–सेटवरून उत्तर आले नाही, कारण मिलाप तुटला होता.

एक दोन मिनिटातच सर्व डब्यातील सैनिक आपआपली शस्त्रे घेऊन बाहेर उड्या टाकण्याचे, दारे खिडक्या उघडण्याचे, हुद्देदारानी निरनिराळे हुकूम सोडण्याचे वगैरे असख्य आवाज येऊ लागले. नेमके याच वेळेस गाडीच्या चारी बाजूनी मशीन-गन्स, ब्रेनगन्स, टॉमीगन्स, स्टेनगन्स आणि रायफल्स याच्या माऱ्याचे पार्श्वसगीत सुरू झाले. त्या शस्त्राच्या गोळीबाराचा लयबद्ध कानठळ्या बसवणारा आवाज त्या दरीत चारो तरफ घुमून पहाड, टेकड्यांना धडक्या देत निनादत, गर्जत आस्मानाकडे फेकला जात होता. मुसड्या मारत होता. त्या गोळ्याचे निशाण बनलेल्या जवानाचे चीत्कार, ऐकणाऱ्याचे कान फाडून हृदयाला जाऊन भिडत होते. अनुभवाने आता माहित झाले होते की आमचे दुष्मन त्याचे मोर्चे पहाडावर मोक्याचे ठिकाणी लावून बसले असून त्यानी आगगाडीच्या डब्याची सर्व दारे हत्यारानी टिपून धरली आहेत. त्याच्या नजरा या लक्ष्यावर खिळल्या आहेत. हत्याराचे चाप ओढायला त्याच्या हातांची बोटे शिवशिवत आहेत. डब्याबाहेर उडी टाकणाऱ्या सैनिकाने बिजलीप्रमाणे निमिषार्धात उडी टाकून मिळेल तो आडोसा पकडला पाहिजे. एकानतर दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा असे एका पाठोपाठ एक बाहेर न पडता मधून मधून हरकत थाबवली पाहिजे. बाहेर उडी टाकण्याच्या वेळात फरक ठेवला पाहिजे म्हणजे दुष्मनला कोण केव्हा बाहेर निघत आहे याचा अंदाज लागू नये. कर्नल शवीयर त्याच्या रक्षक आणि वायरलेस तुकडी-सह आणि मी माझ्या वायरलेस सेट आणि बॅटमनसह डब्याबाहेर पडायला तयार झालो. डब्यातील दोन्ही बाकाच्यामधील जागेतून सरपटत येऊन मी दाराच्या टोकाशी आलो. तेवढ्या वेळात कैक देवाची नावे आठवली. मला वाटत दोनचार नवस, सत्यनारायण, जे काय मनात येईल ते बोलून गेलो. कोल्हापूरच्या जदुवन बंगल्याच्या गच्चीत उभ्या राहून आम्हा सैनिक मुलाच्या येण्याची आतुरतेने वाट पहाणाऱ्या माची करुणरम्य मूर्ती नजरेपुढे आली. सैनिकाची जीवनसाथी बनलेली पाणावलेल्या डोळ्यानी, हसतमुखाने निरोप देणारी नि मी बाहेर कामगिरीवर निघालो की नेहमी ' जपून जा. अबाबाई तुमच्या पाठीशी आहे. वडिलमडळीचा आशीर्वाद आहे. ' अस म्हणणारी उमाची मूर्ती डोळ्यापुढे आली. मन बेचैन झाल. कालवाकालव सुरू झाली. पण ती थोडा वेळच. फार तर मिनिट दोन मिनीटच.. त्यानतर पूज्य आबांची (भास्करराव जाधव) धीरगभीर, डोळ्यात जरब असलेली नि कोणत्याही कठीण प्रसगी मन अविचल, शात ठेवणारी नि एकटेच असले की सतत सस्कृत वचने पुटपुटणारी मूर्ती डोळ्यासमोर उभी राहिली. माझे ज्येष्ठ बंधू


ले. कर्नल बाबासाहेब दुसऱ्या महायुद्धात जेव्हा मध्यपूर्वेच्या आघाडीवर होते नि मी ब्रह्मदेशाच्या आघाडीवर होतो तेव्हा ते, माना नेहमी धीर देऊन म्हणायचे, 'बाईसाहेब फार मोठं पुण्य गाठी बाधलेली वीरमाता आहेस तू. तुझ्या डोळ्यात हे अश्रू शोभत नाहीत.' आबांनी उच्चारलेली ही वाक्ये आठवली नि मनात वीरश्री संचारली. 'श्रीछत्रपती शिवाजी महाराज की जय – हर हर महादेव' म्हणत मी एक जोराची मुसंडी मारून उडी ठोकली व रुळाच्या पलीकडील उतारावर एक खबदाड मिळाले त्यात बऱ्यापैकी आडोसा पकडून पोझिशन घेतली.

थोड्याच वेळाने कर्नल शवीयर माझ्या दिशेने उडी मारत असता एक बंदुकीची गोळी सणकन येऊन त्याच्या डाव्या पायाच्या घोट्यात सपकन रुतली. ते धाडकन कोलमडून खाली पडले. लागलीच वायरलेस ऑपरेटर मनफुलरामच्या मदतीने मी त्याचा उजवा पाय पकडून त्याना खाली आडोशाला ओढून घेतले. त्याच्या पायावर चढवलेले ॲन्कलेट झटकन उतरवले. ॲम्युनिएशन बूट काढला आणि फर्स्ट फील्ड ड्रेसिंगची पट्टी जखमेवर बांधली. एवढी तीव्र जखम होऊनही त्यानी एका शब्दानेही वेदना प्रगट केली नाही. डोळे मिटून आणि दोन्ही ओठ गच्च दाबून थोडा वेळ ते गप्प पडून राहिले. एवढ्यात जमिनीशी सरपटत खेमचदही आमच्याजवळ येऊन पोचले. तशाच स्थितीत पंधरा-वीस मिनिटे गेल्यावर कर्नल मला म्हणाले–

> 'बच,' (कर्नल मला नेहमी या नावाने पुकारीत असत.) "नाऊ यू कंडक्ट धिस ऑपरेशन. कॅपचर हाय ग्राउडस ऑफ टॅक्टीकल ॲडव्हाटेज ऑफ इस्ट ॲण्ड नॉर्थ फीचर्स. कॉन्टॅक्ट स्टॅनले मेनेझिस ऑन वायरलेस ॲण्ड टेल हिम टु सेड वन रायफल कपनी फ्रॉम वेस्टर्न डायरेक्शन. वी हॅव लिमिटेड क्वाटीटी ऑफ ॲम्युनिशन. युज इट स्पेअरिंगली. वुईश यू गुड लक.'

कर्नलच्या हुकुमाप्रमाणे ताबडतोब मी पुढच्या कार्याला लागलो. मेजर मेनेझिस-बरोबर लगाव करण्याचा प्रयत्न केला. पण दोन्ही वायरलेस सेटसमधील अतर वाढल्यामुळे बातचीत होऊ शकली नाही. त्याचेशी आमचा सपर्क संपूर्णपणे तुटला गेला होता. उत्तर आणि पूर्व भागात असलेल्या तुकड्याना कर्नलनी सागितल्याबर-हुकूम मी ऑर्डर्स दिल्या. बटालियन हेडक्वार्टर्स पोझिशनमध्ये लावले. चारी बाजूने जसा शक्य होता तसा डिफेन्स लावला. शक्य असेल त्या जागी मोर्चे खोदायला सुरुवात केली. काही ठिकाणी सगड उभे केले. जखमी झालेल्या लोकाना जो आड मिळेल त्या मार्गाने पुलाच्या खालील पोकळीत पोचविण्यास स्ट्रेचर बेअररना सागितले. ती जागा सुरक्षित होती. आमच्या आगगाडीबरोबरच ट्रेन कडक्टीग ड्युटीसाठी एक मेडिकल ऑफिसरही होते. त्यानी पुलाखाली एक छोटेखानी हॉस्पिटल (रेजिमेन्टल एड पोस्ट) उघडले. कर्नलनाही तेथे पोचविण्यात आले. जे जखमी येतील त्याची-देखभाल करायला डॉक्टरानी-ताबडतोब सुरुवात केली.

## दूसरा हमला - कोहाट रावळपिंडी मार्ग - दिनांक १ सप्टेंबर १९४७



आसमंतातील बहुतेक सारा प्रदेश कमांड पोस्टवरून (बटालियन हेडक्वार्टर्स) नजरेच्या टापूत येत होता. डीरेल झालेल्या गाडीचे दृश्य भयानक दिसत होते. गाडीचे एंजीन पुलावरून कोसळून मान टाकलेल्या बकऱ्याप्रमाणे पडले होते. त्याचे तोंड नाल्याच्या पात्राला टेकले होते. त्याच्या पाठीशीच असलेल्या चारी मालाचे डबे रुळावरून घसरले होते. पैकी पहिले दोन उजव्या कुशीवर पहुडले होते. उरलेले दोन डबे घसरून जमिनीवर आले होते. त्याना जोडूनच असलेली पहिली पॅसेंजर बोगी कसाबसा तोल सावरून जेमतेम रुळावर उभी होती. बाकीची उरलेली गाडी रुळावर व्यवस्थित खडी होती. ते दृश्य पाहताच खेमचंद म्हणाला—

'साब, देखा, कल रातकी मेहनत हमे आज काम आयी.' बायका–मुलाचा डबा सोडून इतर सर्व डब्याना भोके पडून त्याची अक्षरशः चाळण झाली होती. बायकाचा डबा सपूर्ण सुरक्षित होता.

पूर्वेकडील पहाडीवर हमला करणाऱ्या तुकडीने त्याच्या ऑबजेक्टीव्हचा कबजा घेतला. या इलाख्यातील बराच दुष्मन मारला गेला. कारण या पथकापैकी एक टोळी लपत छपत जाऊन लावचा वळसा घेऊन पिछाडीकडून वर चढली आणि पहाडावरील दुष्मनला त्यांनी कोंडीत पकडले. कबजा घेतल्यावर या पथकाने उत्तरेकडील पहाडावर चढणाऱ्या पथकाला त्यांच्या ऑबजेक्टीव्हवर पोचता यावे म्हणून फायर सपोर्ट द्यायला सुरुवात केली. त्या पथकाचे कमांडर जमादार गिरीधारीराम पायाला गोळी लागून जखमी झालेले मला दिसत होते पण जखमेची फिकीर न करता बसल्या बसल्याच ते जवानाना जोष देत होते. हुकूम सोडत होते. अस्सल जाटु भाषेत दुष्मनला गाली देत होते सहा फूट उंचीचा, भरलेल्या अगाचा, गव्हाळी रंगाचा हा देखणा जमादार डोक्यावरची स्टील हेलमेट काढून टाळूवरून हात फिरवून घाम पुसत होता. त्या रखरखीत उन्हात संपूर्ण मुंडन केलेले आणि भरघोस शेंडी राखलेले त्याचे डोके तळपत होते. पहाडीवर हुकमत गाजवणारा शेरच दिसला मला तो.

इंजीन डिरेल होत असताना लेफ्टनंट नागेन्द्रसिंग आणि त्याच्याबरोबरच्या जवानानी खाली उडी टाकली. ताबडतोब आड पकडून सभोवारची परिस्थिती पहात असताना उत्तरेकडील पहाडीवरून त्याच्या दिशेने फायर केलेला ब्रेनगनचा एक बर्स्ट आला नि त्यातील तीन चार गोळ्या नागेंद्रच्या पाठीला लागल्या. जवळ असलेल्या जवानानी ताबडतोब त्याला एका आडोशाच्या जागी नेले व पुढे थोड्याच वेळात रेजीमेन्टल एड पोस्टला आणले. डॉक्टरनी त्याच्याजवळ असलेल्या जुजबी साहित्यातून उपचार करावयास सुरुवात केली. नागेन्द्रला झालेल्या जखमा अजमावता त्यांच्या लग्जना इजा झाली असेल की काय अशी भीती डॉक्टरना वाटत होती. नागेंद्र जबरदस्त जखमी झाल्याची वार्ता ऐकताच त्याला पहायला मी रेजीमेंटल एड पोस्टकडे गेलो. तो बेहोष होता. इतर जखमी पाहिले. त्याना दिलासा दिला.

कर्नल शबीयरना घडलेल्या घटनाची माहिती दिली. मी परत माझ्या कमाड पोस्टला जाऊन पहातो तो वायरलेस ऑपरेटर मनफुलराम आणि इटेलिजिन्स हवालदार गोवर्धन जखमी झालेले. आता माझा धीरच खचला इकडे कर्नल शबीयर जखमी, तिकडे नागेन्द्र जखमी. कालच्या हल्ल्यात कॅप्टन बूमला आणि कॅप्टन कारवाल घायल झालेले. जमादार गिरीधारीराम आणि सुभेदार शेरसिंग जखमी झालेले. अर्धी बटालियन मेजर मेनेझिसबरोबर दूर पाठीमागे त्याच्याशी मिलाप तुटलेला. उरलेल्यापैकी एक एक कमाडर ऐन मोक्याच्या आणीबाणीच्यावेळी जायवदी होत होता. जखमी जवानाची सख्या ३० वर गेली होती. ॲम्युनिशनचा साठा कमी होत चाललेला. नागेन्द्रची हालत फारच नाजूक होती. डॉक्टरनी आशा सोडलेली होती. त्याचे लग्न होऊन अवघे सहाच महिने झाले होते. त्याचे काही बरेवाईट झाले तर त्याच्या वडिलाना आणि पत्नीला कसे तोड दाखवायचे हा विचार मनात सारखा येत होता. तिकडे बायका–मुलाचा त्याच्या डब्यात आक्रोश चाललेला. चारी कोपऱ्यातील खिडक्या सोडून बाकीच्या सर्व बद होत्या. मुलानी ठो ठो चालवलेला. अगदी वेड लागायची पाळी आली. एकट्याने काय करावे सुचेना. त्या वेळेला प्रथमच माझ्या मनात विचार आला की, आत्ताच्या आत्ता येथल्या येथे आपल्याला एखादी गोळी लागावी आणि मरण यावे म्हणजे या व्यापातून कायमची मुक्ती तरी मिळेल. तो विचार क्षणभरच टिकला. त्यातून भानावर येऊन पहातो तर उत्तरेकडील टोळीसुद्धा त्याच्या ऑबजेक्टीव्हवर पोचली होती. पण पश्चिम आणि दक्षिण दिशेकडील गोळीबार आता वाढला होता. दुपारचा एक वाजला होता. त्या रखरखीत उन्हात दगड–धोड्यात सर्व वातावरण तापून निघाले होते. जवान ॲम्युनिशन अत्यत जपून वापरत होते त्यानी उत्तर आणि पूर्व भागातील दुष्मनला कोडीत पकडून चांगलाच झोडपून काढला होता. त्यातून जगले वाचलेले दक्षिण आणि पश्चिमेकडील पहाडीवर एकत्र झाले. त्या बाजूला असलेल्या आमच्या तुकड्याचे बरेच नुकसान झाले होते. कारण त्याच्या ऑबजेक्टीव्हवर जाण्याचा मार्ग उघड्या प्रदेशातून जात होता. वर चढायला योग्य छुपी वाट मिळत नव्हती. पूर्वेकडील तुकडीने त्यांची अर्धी टोळी लावचा वळसा घेऊन मागच्या बाजूने दक्षिण पहाडीवर पाठवून दुष्मनवर हल्ला चढवावा असा मी हुकूम दिला. त्याप्रमाणे सुभेदार परमानद एक टोळी घेऊन निघाले, पण दुर्दैवाने अर्ध्या वाटेत तेही जखमी झाले व दुष्मनचा फार मोठ्या प्रमाणात गोळ्याचा मारा आल्यामुळे त्याची टोळी ऑबजेक्टीव्हवर पोचू शकली नाही. आतापर्यंत अडीच वाजले होते. रायफल कंपन्याचे ॲम्युनिशन सपुष्टात येऊ लागल्याची खबर मला वायरलेसवरून मिळत होती. मोठी कठीण परिस्थिती आली. आमच्याकडील गोळीबार अगदीच थडावला. कधी कधी एखादी गोळी मारल्याचा आवाज येई.

गेली दोन वर्षे या ट्रायबल प्रदेशात राहिल्यामुळे टोळीवाल्याचा स्वभावधर्म

मला चांगला अवगत झाला होता. आमच्या जवळच्या दारूगोळ्याचा साठा संपत आला असल्याची कल्पना त्यांना जरूर आली असेल. रात्र पडताच सुरा पार्टी घेऊन ते मोठ्या संख्येने आमच्यावर हल्ला करून कापाकापी आणि लूटमार करण्याची शक्यता होती. आता शेवटचा एकच उपाय म्हणजे त्यांच्या गावावर जर उखळी तोफांनी (थ्री इंच मॉर्टर) बंबारी केली तर ते त्यांना सहन होणार नाही आणि येथून ते मागे हटण्याचा संभव आहे, अर्थात त्यांची गावे म्हणजे क्वचित कोठे पंधरावीस घरांचा एक छोटासा पुंजका. आमच्या जागेपासून सुमारे दीड मैलावर एक छोटेसे खेडे नजरेत येत होते. मी मॉर्टर प्लटून कमांडर जमादार बखतावर सिंगला बोलावून ते खेडे दाखवले आणि म्हणालो –

‘साब, सामने गांव. टारगेट. सिर्प छे बम्ब फायर करना. गांवपर नही. उसके नजदिक.’

बख्तावरचे हात शिवशिवतच होते. तो चटकन म्हणाला –

‘बहोत अच्छा साब. अभी वन टू मे तमाशा देखो.’

त्याने चटकीने सॅल्युट केला नि मॉर्टर पोझिशनमध्ये लावायला धावतच गेला. प्रत्येक वाक्यात संधी सापडेल तेव्हा वन टू हा शब्द वापरायची त्याला खोड होती. त्याच्या जाणाऱ्या आकृतीकडे मी बराच वेळ पाहत राहिलो.

**पूर्वार्ध समाप्त**

---

# सत्तेचाळीस सालातील सत्तेचाळीस दिवस



## उत्तरार्ध

## माणूस

## १५ ऑगस्ट

## विशेषांक

---

 पृष्ठ १५ वरून

कोणीतरी तेवढ्यात सागतो, राव, पैले झूट झाली ती तीच बारी की.

का-य ? पहिली, आपण जरा उशीराच आत येऊन बसलो तेव्हा चालू होती ती-तीच हिरा कोल्हापूरकरणीची बारी ? ती-नाचत होती-तीच कोल्हापूरकरीण ? ती...बऱ्यापैकी बाधेसूद...टपोरे डोळे···जयश्री गडकरची आठवण... झालेच तर...तशी दिसायलाही बरीच...

आपल्याला काहीच नीटसे आठवत नाही. नीटसे पाहिलेच नाही तर आठवेल तरी कुठून ? समजलो की हिरा कोल्हापूरकरीण नतर नाचणार-दहानतर. आणि ती चक्क नाचून गेली ! ती-आपल्या दोस्ताचा हार्टथ्रॉब-लाजवाब-आय हाय हाय हाय हाय-सुरुवातीलच नाचून गेली. बेमालूम, अ ! आमचा चकचकीत मामा झाला ! आम्ही मोठ्या तयारीने ती स्वर्गीय नृत्य सुदरी पहाण्यासाठी मोर्चे बांधून राहिलो आणि सुदरी आरंभीच नबर लावून गेली. आम्ही आपले गारफळलो. पाने खात, चहा रिचवीत, जाभया देत. छे छे छे. वैताग येतो.

समोर रंगमचावर प्रशस्त देहाची रोशन सातारकर आता येते. तिच्या विलक्षण बालिश, गोड गळ्याने तमाम प्रेक्षकाचा तळीराम गार करते. आपण मात्र गरम असतो.

अखेर हिरा कोल्हापूरकरीण नाहीच !
नाचली, पण नीटशी पाहिलीच नाही.
दगाबाज ! प्रथमच नाचून गेली.

दुसऱ्या दिवशी 'त्या' मित्राचा फोन. काय, पाहिली का नाय काल रात्री हिरा ? आहे का नाय लाजवाब ?

आपण दातओठ खात रिसीव्हरमध्ये म्हणतो, बाय ऑल मीन्स ! शी इज जस्ट ग्रेट ! ग्रेट, आय टेल यू !

मग ? आम्ही काय म्हणत होतो ? साला लिहा तिच्यावर. ते रविशंकर नि बादल सरकारवर लिहिता तर च्यायला हिच्यावर एकदा लिहा हिंमत असेल तर- हिरावर लिहा—मित्र.

लिहितोच—आपण.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

manoos (weekly) eighty paise regd no.m-h 649

शत्रूने केलेल्या
वचनभंगाची
भारतीय जवानांच्या
धीरोदात्त प्रतिकाराची
एक सजीव सत्यकथा..

– कर्नल जाधव



